
मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

# अर्थसंवाद

भारतीय सौर आषाढ - भाद्रपद 1927

जुलै - सप्टेंबर 2005, / खंड 29, अंक 2

- आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत - एक सिंहावलोकन
- कृषी विपणनाचे विविध पैलू
- मूल्यवर्धित कर व त्याची अंमलबजावणी
- महाराष्ट्रातील मानव विकासाची वास्तविकता
- उपभोग, बचत व गुंतवणूक विषयक सवयींचा अभ्यास
- पाणी व्यवस्थापनाची आदर्श पद्धत



मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।


लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये।
शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः ।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक


# अर्थसंवाद


जुलै - सप्टेंबर, 2005 / खंड 29, अंक 2



**प्रमुख संपादक**

विनायक श्रीधर देशपांडे

**सहायक संपादक**

रवीन्द्र शंकर जोशी

**सल्लागार मंडळ**

(2003-06)

कमलाकर हणवंते

रामकृष्ण सोळुंके

आशुतोष रारावीकर

वंदना दांडेकर



**संपादकीय पत्रव्यवहार**

विनायक श्रीधर देशपांडे

'श्रीकमल', 48 विद्या-विहार

प्रतापनगर, नागपूर - 440022

दूरध्वनी क्र.(95712) 2237042


## अनुक्रमणिका


- संपादकीय ....................97
- आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत - एक सिंहावलोकन
  सु.गो. भानुशाली ....................99
- कृषी विपणनाचे विविध पैलू
  रवीन्द्र जोशी ....................117
- मूल्यवर्धित कर व त्याची अंमलबजावणी
  आ. गो. पुजारी ....................126
- महाराष्ट्रातील मानव विकासाची वास्तविकता
  रामकृष्ण सोळुंके / गणेश मांगडे ....................140
- उपभोग, बचत व गुंतवणूक विषयक सर्वेक्षणांचा तुलनात्मक अभ्यास
  विजय ककडे / ए. बी. पाठक ....................150
- पाणी व्यवस्थापनाची आदर्श पद्धत
  श्रीराम जोशी / कारभारी विवटे ....................167
- नव्या पेटंट कायद्यातील बदलांचे संभाव्य परिणाम (संकीर्ण)
  दिपक भामरे ....................176
- ही तर कंगालवस्था महागाई नव्हे (अनुवाद)
  शि. ना. भावे ....................184
- भारताचा आर्थिक ताळेबंद (ग्रंथ परीक्षण)
  दि. वा. जहागिरदार ....................187

मराठी अर्थशास्त्र परिषद

कार्यकारी मंडळ (2005-06)

- अध्यक्ष

**सर्जेराव ठोंबरे (औरंगाबाद)**

- कार्याध्यक्ष

**ज.फा. पाटील (कोल्हापूर)**

- कार्यवाह, खजिनदार

**चारुदत्त गोखले (जळगाव)**

- प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'

**विनायक श्रीधर देशपांडे (नागपूर)**

- सदस्य

1 रवीन्द्र जोशी (नागपूर)
2 राम देशमुख (नांदेड)
3 दिनकर टकले (जालना)
4 केशव धोरूडे (ठाणे)
5 सुभाष दगडे (सांगली)
6 बबन आदिक (अहमदनगर)
7 हिरालाल चव्हाण (जळगाव)
8 वसंत पाटील (जळगाव)
9 राजेन्द्रकुमार गव्हाळे (बुलढाणा)
10 जगन्नाथ पाटील (सातारा)
11 श्रीराम जोशी (जळगाव)
12 मनिषा काकडे (पुणे)

- अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार :

1) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली.
2) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
(टिप : म. रा. सा.सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असतीलच असे नाही.)

- कार्यालयीन पत्रव्यवहार

(वर्गणी व जाहिरात पाठविणे, सदस्यत्वाची नोंदणी करणे, आणि अर्थसंवाद वितरणाविषयी)

**चारूदत्त गोखले**
कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
'अक्षय' प्लॉट नं. 10, प्रोफेसर्स कॉलनी,
जिल्हा उद्योग केंद्राचे मागे, जळगाव - 425001
(दूरध्वनी : 95257 - 2252375)

- परिषदेचे प्रमुख कार्यालय

मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेंज, एम.एन.रॉय ह्यूमन डेव्हलपमेंट कॅंपस, फ्लॅट क्रमांक 6 'एफ' ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र. 323 समोर, बांद्रे(पूर्व), मुंबई 400 051

**वर्गणी**

| | |
|---|---|
| अ) परिषदेचे सदस्य | |
| ● आजीव सदस्य | : रु. 1200 (एकरकमी) |
| ● साधारण सदस्य | : रु. 250 (वार्षिक) |
| आ) संस्था सदस्य : | |
| ● शैक्षणिक संस्था | : रु. 250 (वार्षिक) |
| ● व्यावसायिक संस्था | : रु. 250 (वार्षिक) |
| इ) अर्थसंवाद वर्गणीदार | |
| ● ग्रंथालये | : रु. 250 (वार्षिक) |
| ई) वर्षगणना | : 1 एप्रिल ते 31 मार्च |

- परिषदेच्या सदस्यांना अर्थसंवाद त्यांच्या वर्गणीतच दिला जातो.
- कृपया वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्ट ने 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने कार्यवाहांकडे पाठवावी. संपादकांकडे पाठवू नये. रीतसर पावती कार्यवाहांमार्फतच प्राप्त होईल.

# संपादकीय

अर्थशास्त्र विषयक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध असलेल्या इंग्रजीतील साहित्याचे अवलोकन केल्यास असे निदर्शनास येते की, आर्थिक घडामोडींविषयक माहितीचे विविध पद्धतींने विश्लेषण करणारे संशोधनपर लिखाण हे ग्रंथ, संशोधनपर नियतकालिके, किंवा लेखांच्या रूपात प्रकाशित होत आहे. तसेच इंग्रजी माध्यमातून होणाऱ्या परिसंवाद, चर्चासत्रे व परिषदांमधून मोठ्या प्रमाणात अर्थशास्त्रातील विविध विषयांचा उहापोह होतांना दिसतो. मराठी ही ज्ञानभाषा व्हावी व इंग्रजींप्रमाणेच मराठीतून अर्थशास्त्र विषयक भरपूर शास्त्रीय लिखाण व्हावे, ते ग्रंथरूपात व शास्त्रीय नियतकालिकांतून प्रकाशित व्हावे, अर्थशास्त्रातील विविध ज्ञानशाखांबद्दल मराठीतून मोठ्या प्रमाणात चिंतन मनन व्हावे, चर्चासत्रे व्हावीत या उद्देशाने मराठी अर्थशास्त्र परिषद व अर्थसंवाद हे नियतकालिक आपल्या ज्येष्ठ तज्ज्ञ मंडळींनी सुरू करून एक नवा व उचित पायंडा पाडला. या माध्यमातून गेल्या 28 वर्षांच्या काळात लक्षणीय असे कार्य झाले व अर्थशास्त्रीय संकल्पना व सिद्धांतांची उत्तम मांडणी करण्याएवढी मराठी भाषा समृद्ध करण्याचेही प्रयत्न झालेत. इंग्रजीतील अर्थशास्त्र विषयक मांडणीची व्याप्ती व स्वरूप लक्षात घेता त्या तुलनेत मराठीतील अर्थशास्त्रविषयक लिखाणाचे स्वरूप व व्याप्ती ही आजच्या आव्हानांच्या संदर्भात पुरेशी आहे का ? आज उपलब्ध असलेल्या सोयी व साधनांचा किती प्रमाणात मराठीतून लिहितांना उपयोग केला जातो ? मराठीत अर्थशास्त्र विषयक साहित्य मोठ्या प्रमाणात प्रकाशित होत असले तरीही अर्थशास्त्राची एक ज्ञानशाखा म्हणून विकास करण्यासाठी ते किती प्रमाणात पुरेसे आहे ? ते केवळ माहितीकेंद्री झाले आहे का ? अर्थशास्त्र विषयक मूलभूत स्वरूपाची मांडणी करणारे ते आहे का ? पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त इंग्रजीतील अर्थशास्त्र विषयक साहित्याच्या दर्जाचे साहित्य मराठीतूनही निर्माण व्हावे या दृष्टिने जाणीवपूर्वक कोणते प्रयत्न होत आहेत अशा काही प्रश्नांचा विचार करणे गरजेचे वाटते. मराठीतील अर्थशास्त्र विषयक बरेचसे लिखाण आजकाल वर्तमान पत्रात प्रकाशित होते. काही अपवाद वगळता त्या लिखाणाचे स्वरूप हे बऱ्याच अंशी तात्कालिक आर्थिक घडामोडींचे विश्लेषण करण्यापुरतेच मर्यादित असते. सखोल व विस्तृत विवेचन करण्यास वर्तमानपत्रीय लिखाणात वावही नसतो व वर्तमानपत्राला त्या स्वरूपाच्या लिखाणाची अपेक्षाही नसते.

अशा परिस्थितीत अर्थशास्त्र विषयक सखोल सैद्धांतिक स्वरूपाच्या लिखाणाची अधिक आवश्यकता आहे अन्यथा माहितीकेंद्री लिखाणापुरतेच अर्थशास्त्रीय लिखाण मर्यादित होईल. आज विपूल प्रमाणात उपलब्ध असलेल्या माहितीचे सखोल विश्लेषण करणारे साहित्य प्रकाशित व्हायला

हवे आहे. अन्यथा परिश्रमपूर्वक गोळा केली जाणारी अर्थशास्त्र विषयक माहिती अनुपयुक्त ठरेल. अर्थशास्त्राचे स्वरूप हे फक्त माहिती गोळा करणारे शास्त्र न राहता त्या पलिकडे जाऊन अर्थकारणाची दशा व दिशा जाणून घेण्यात, समाजात साधनसंपत्तीचे न्याय्य वाटप होण्यास पूरक असे अर्थकारण सुचविण्यात व अर्थकारणाची भावी वाटचाल निश्चित करण्यासाठी उपयुक्त ठरली पाहिजे.

महाराष्ट्रात पदवी आणि पदव्युत्तर स्तरावर अनेक विद्यार्थी मराठीतून अर्थशास्त्राचा अभ्यास करीत आहेत. तर हजारावर प्राध्यापक अर्थशास्त्राचे अध्यापन करीत आहेत. या विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना अर्थशास्त्राच्या पाठ्यपुस्तकांशिवाय पूरक साहित्य म्हणून मराठी अर्थशास्त्र विषयक असे दर्जेदार संशोधनपर साहित्य खूप मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणे गरजेचे आहे. त्यामुळे इंग्रजीतील साहित्यावर संपूर्णपणे अवलंबून रहावे लागणार नाही. विविध कारणांनी इंग्रजीतील अर्थशास्त्रविषयक लिखाण समजून घेण्यात मराठी भाषिकांना येणारे अडथळे टाळता येतील. शिवाय उपलब्ध माहितीचा अधिक सहजपणे उपयोग कसा करायचा याबाबत मार्गदर्शन मिळेल. इंग्रजीतील संशोधनपर साहित्यात ज्या चोखपण व विपुलतेने विश्लेषणाचा अत्याधुनिक तंत्राचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. त्या विकसित शास्त्रीय मांडणीचा मराठीतील नव्या पिढीतील अभ्यासकांना परिचय होईल. महाराष्ट्राच्या स्तरावर शासकीय व निमशासकीय आणि स्वयंसेवी संस्थांच्या वतीने उपलब्ध होणाऱ्या आर्थिक घडामोडींसंबंधीत माहितीचे विश्लेषण अधिक सखोलपणे व चिकित्सकपणे करता येऊ शकेल.

अर्थसंवाद व मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या माध्यमातून अनेक ज्येष्ठ अर्थतज्ज्ञांनी मराठीतून अर्थशास्त्र विषयक दर्जेदार लिखाण केलेले आहे. ती समृद्ध परंपरा नव्या संदर्भात, नव्या साधनांसह अधिक समृद्ध करीत अर्थशास्त्र विषयक सिद्धांत निर्मितीच्या दिशेने अर्थशास्त्राचा विकास करण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे. आजचे आपले अर्थशास्त्राचे अभ्यासक हे आव्हान पेलण्यास समर्थ आहेत असा विश्वास वाटतो. 'अर्थसंवाद' अधिक दर्जेदार, विश्लेषणात्मक, धोरणाभिमुख होण्यात या मंडळीचे योगदान महत्त्वपूर्ण ठरू शकेल. अर्थात् त्यादृष्टिने प्रयत्न करण्याची नितांत आवश्यकता आहे.

**विनायक श्रीधर देशपांडे**
प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'

# आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत-
# एक सिंहावलोकन(लेखांक-1 चा उर्वरित भाग)

✦ सु.गो. भानुशाली, पुणे.
*माजी सहायक संपादक अर्थसंवाद*

5

**अतिनवअभिमत अर्थशास्त्र संप्रदाय**

स्थायीदानाच्या तौलनिक तफावतीमुळे आंतरराष्ट्रीय व्यापार निर्माण होतो हे हेक्स्चर-ओहलीन यांचे प्रमेय व्यापार करणाऱ्या देशातील ग्राहकांची पसंती सारखीच असते या गृहितावर आधारलेले आहे. व्यापार करणाऱ्या देशामधील ग्राहकांची पसंती सारखीच आहे असे घटकाभर मानले तरी विविध देशातील लोकांचे दरडोई उत्पन्न वेगवेगळे असल्यामुळे मागणीची परिस्थिती वेगवेगळी असते. दोन देशातील उत्पादन साधनांचे स्थायीदान सारखे असले तरी ग्राहकांची आवड वेगवेगळी असल्यास त्या देशांमध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार निर्माण होतो. व्यापार पूर्व स्थितीत ग्राहकांच्या आवडीतील फरकामुळे वस्तुंच्या किंमती वेगवेगळ्या असतील हे असा व्यापार निर्माण होण्याचे प्रमुख कारण होय. दोन्ही देशातील रुपांतरण वक्र (Transformation Curves) सारखे असले तरी तटस्थतावक्र (indifference Curves) वेगवेगळे असतील. दोन्ही देश आपल्या देशात कमी किंमत असलेल्या वस्तुंच्या उत्पादनात वैशिष्टीकरण साधतील. रुपांतरण वक्रावर दोन्ही देश वेगवेगळ्या बिंदुवर आल्यामुळे व्यापारशर्ती बदलतील. त्याकारणाने दोन्ही देश वरच्या तटस्थता वक्रावर सरकतील आणि दोन्ही देशांचा लाभ होईल. या विवेचनावरुन असे स्पष्ट होते की हेक्सचर-ओहलीन यांच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या नवअभिमत अर्थशास्त्र संप्रदायातील सिध्दांतात व्यापार ठरविण्यातील एक घटक म्हणून मागणीच्या बाजूचा समावेश करणे सहज शक्य आहे. दोन देशातील लोकांच्या वस्तुबद्दलच्या पसंतीमध्ये लक्षणीय फरक असेल तर उत्पादन साधनांचे स्थायीदान समान असले तरी ते दोन


देश मोठ्या प्रमाणावर व्यापार करु शकतात. याच बरोबर हेही खरे असू शकेल की दोन देशातील उत्पादन घटकांचे स्थायीदान वेगवेगळे असले तरी उत्पादन घटकांच्या किंमतीतील तफावत त्या दोन देशातील लोकांच्या पसंतीतील तफावतीमुळे निष्प्रभ ठरेल आणि त्या दोन देशात व्यापार होणार नाही.

आणखी एक मुद्दा मांडावयाचा आहे; तो असा की, उत्पादन वाढताना उत्पादनाचा सरासरी परिव्यय वाढतो हे गृहीत नेहमीच खरे असेल असे नाही. उत्पादन वाढत असताना उत्पादनाचा सरासरी परिव्यय घटत असेल तर आंतरराष्ट्रीय व्यापार निर्माण होण्यातील मागणीच्या बाजूच्या घटकांचे महत्त्व जास्त अधोरेखीत होते. मागणीच्या बाजूच्या घटकांचा व्यापारावरील प्रभाव आंतरराष्ट्रीय व्यापाराचा हा नवअभिमत अर्थशास्त्र संप्रदायातील सिध्दांत आपल्यात सामावून घेऊ शकत असला तरी ग्राहकांच्या पसंती मधील तफावत आंतरराष्ट्रीय व्यापार ठरविण्यातील महत्त्वाचा घटक आहे याचे स्पष्टीकरण देऊ शकत नाही. याचे स्पष्टीकरण 1961 मध्ये स्टॅफन लिंडर (Linder staffan) यांनी आपल्या परस्परव्यापी मागणीच्या सिध्दांतातून देण्याचा प्रयत्न केला आहे.

### 1) परस्परव्यापी मागणीचा सिध्दांत

स्टॅफन लिंडर यांचे प्रतिपादन असे होते की, प्राथमिक वस्तुंच्या व्यापाराचा आकृतीबंध ठरविण्यात उत्पादन घटकांचे स्थायीदान महत्वाची भूमिका बजावीत असले तरी उत्पादित वस्तुंच्या व्यापारात उपभोक्त्यांची पसंती जास्त महत्त्वाची असते. उत्पादित वस्तुंच्या व्यापारात उत्पादन घटकांचे स्थायीदान कमी महत्त्वाची भूमिका बजावते असे प्रतिपादन करण्याचे कारण असे की उत्पादित वस्तुंचा व्यापार करणाऱ्या देशामधील उत्पादन घटकाचे स्थायीदान जवळ जवळ सारखेच असते. मागणीची संरचना व्यापाराचा आकृतीबंध ठरवित असते. कुटुंबे आपल्या सरासरी उत्पन्नाचा विविध वस्तुंवर खर्च करीत असलेल्या प्रमाणावर व्यापाराचा आकृतीबंध ठरत असतो आणि ते प्रमाण देशाच्या दरडोई उत्पन्नाच्या पातळीवर अवलंबून असते. लोकांचे सरासरी दरडोई उत्पन्न जास्त असल्यास उच्च प्रतीच्या आणि परिष्कृत (Sophisticated) वस्तुंसाठी जास्त मागणी असते. या विरुध्द कमी दरडोई उत्पन्न असलेल्या देशांमध्ये कमी प्रतीच्या आणि सर्वसाधारण वस्तुंसाठी जास्त मागणी असते.

स्टॅफन लिंडर यांचे हे प्रतिपादन आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट करता येते. 'क्ष'आणि 'य'या दोन देशात उत्पादन घटकांचे स्थायीदान सारखेच आहे. साहजिकपणे दोन्ही देशातील रुपांतरण वक्र सारखेच असतील. आकृती-3 मध्ये 'अ'विभागात 'क्ष' देश व 'ब' विभागात 'य' देश यामधील 'अब' हे सारखेच रुपांतरण वक्र दाखविले आहेत. दोन्ही देशातील ग्राहकांची पसंती वेगवेगळी असल्यामुळे तटस्थता वक्र वेगवेगळे आहेत. 'क्ष' देशातील लोकांना तांदूळ जास्त आवडतो तर 'य' देशातील लोक गहू जास्त पसंत करतात. 'क्ष' देशात व्यापार पूर्व समतोल 'स' बिंदूत तसेच 'य' देशातही 'स' बिंदूत दाखविला आहे. '$क_{अ}क_{३}$' ही 'क्ष' देशातील व '$क_{ब}क_{ब}$' ही 'य'देशातील सापेक्ष किंमत रेषा आहेत. 'क्ष'देशातील तांदळाची किंमत 'य' देशातील तांदळाच्या किंमतीपेक्षा जास्त आहे. कारण 'क्ष' देशातील लोकांची तांदळाची मागणी 'य' देशातील लोकांच्या तांदळाच्या मागणीपेक्षा जास्त तीव्र आहे. या विरूद्ध 'य' देशात गव्हाची किंमत 'क्ष' देशातील गव्हाच्या किंमतीपेक्षा जास्त आहे. कारण 'य' देशातील लोकांची गव्हाची मागणी 'क्ष' देशातील लोकांच्या गव्हाच्या मागणीपेक्षाजास्त तीव्र आहे. या दोन वस्तुंच्या




आकृती 3

किंमतीतील फरक हाच या दोन देशांमधील व्यापाराचा पाया होय. प्रत्येक देश आपल्या देशात दुसऱ्या देशापेक्षा ज्या वस्तुंची किंमत कमी आहे त्या वस्तुच्या उत्पादनाचे विशेषीकरण करील. म्हणजेच 'क्ष' देश गव्हाच्या व 'य' देश तांदळाच्या उत्पादनात विशेषीकरण करतील.

व्यापारामुळे वस्तुंच्या किंमतीचा नवीन संच(set) तयार होईल. आकृती-3 मधील 'अ' आणि 'ब' भागात हा संच 'क$_{ब}$क$_{ब}$' या रेषांनी दाखविला आहे. त्यामुळे दोन्ही देश आपापल्या देशातील वस्तुंच्या उत्पादनाचा हिस्सा बदलण्यासाठी रुपांतरण वक्रावर 'स$_1$' या बिंदूकडे सरकतील 'क्ष' देश आता तांदळाच्या तुलनेत जास्त गहू पिकवेल तर 'य' देश आता गव्हाच्या मानाने जास्त तांदूळ पिकवेल. किंमतींच्या या नव्या संचाला 'क्ष' देश तांदळासाठी गहू देऊन वरच्या पातळीवरील तटस्थता वक्रावर पोहोचेल. म्हणजे 'ग$_1$ग$_2$' गव्हासाठी त$_0$त$_2$, तांदूळ देऊन 'क्ष' देश 'स$_2$'या वरच्या पातळीवर असलेल्या तटस्थता वक्राच्या समतोलन बिंदुला पोहोचेल. त्याच न्यायाने, किंमतींच्या या नव्या संचाला 'य' गव्हासाठी तांदूळ देऊन वरच्या पातळीवरील तटस्थता वक्रावर पोहोचेल. म्हणजे 'त$_1$ त$_2$' तांदळासाठी 'ग$_0$ग'$_2$गहू देऊन 'य' देश 'स$_2$' या वरच्या पातळीवर असलेल्या तटस्थता वक्राच्या समतोलन बिंदूला पोहोचेल.

व्यापारामुळे दोन्ही देशाना लाभ होईल. अशा रीतीने व्यापाराचे निर्धारक (determinant) म्हणून मागणीच्या घटकांचा नवअभिमत अर्थशास्त्र संप्रदायाच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिध्दांतात अंतर्भाव करुन तो सिध्दांत व्यापक करता येईल. या लेखांकाच्या चौथ्या भागातील आकृती-2 मध्येही समानता पाहता येईल. लोकांच्या पसंतीमध्ये खूप मोठा फरक असल्यास उत्पादन साधनांचे समान स्थायीदान असणाऱ्या देशातही आंतरराष्ट्रीय व्यापार होऊ शकतो; होतो.

स्टॅफन लिंडर यांचे पुढे म्हणणे असे होते की, ग्राहकांची पसंती समान असलेल्या देशात व्यापार जास्त प्रमाणात होतो. त्यांचे हे प्रतिपादन नवअभिमत अर्थशास्त्र संप्रदायातील सिध्दांताच्या

पूर्णपणे विरोधी होते. लिंडर यांची कारण मीमांसा अशी होती की, समान मागणी आकृती बंध असलेल्या देशांकडे निर्यात जास्त होते. मागणीचा आकृतीबंध दरडोई उत्पन्नाच्या पातळीवर अवलंबून असल्यामुळे अशा देशांमधील व्यापार जास्त असतो. साधारणपणे उत्पादक देशांतर्गत मागणी पूर्ण करण्यासाठी वस्तुंचे उत्पादन करतात. साहजिकच, ज्या वस्तुंसाठी स्थानिक मागणी जास्त प्रबळ असते त्याच वस्तुंचे उत्पादन उत्पादक करीत असतात. असे होण्याची दोन कारणे आहेत. पहिले कारण असे की, उत्पादकांना परदेशातील मागणीची फारशी माहिती नसते. ( ही 1961 ची परिस्थिती, आजची नव्हे.) दुसरे कारण असे की, उत्पादकांना ग्राहकांकडून प्रतिपोषण (feed back)मिळवून त्यांच्या पसंतीप्रमाणे उत्पादन करण्यासाठी त्यांच्या संपर्कात रहाणे जास्त लाभदायक असते. पण काही कालानंतर देशांतर्गत मागणी परितृप्त (satiate) झाल्यावर परदेशी बाजारपेठेकडे उत्पादकांना वळावे लागते. साहजिकपणे आपल्या देशातील मागणीच्या आकृतीबंधासारखी मागणी असलेल्या म्हणजेच आपल्या देशातील दरडोई उत्पन्नाइतकीच उत्पन्न पातळी असलेल्या देशांकडे ते वळतात. यालाच लिंडर परस्परव्यापी मागणी (overlapping demand) म्हणतात. परस्परव्यापी मागणीच्या संकल्पनेची ते अशी व्याख्या करतात. ''व्यापार करणाऱ्या देशांमध्ये ठराविक प्रतीच्या आणि परिष्कृततेच्या (sophistication) वस्तुंसाठी असणारी सामायिक (common) मागणी म्हणजे परस्परव्यापी मागणी होय.'' प्रत्येक देशामध्ये कुटूंबाचे उत्पन्न सरासरी दरडोई उत्पन्नाच्या जवळपास असते. त्यामुळे विविध प्रतीच्या वस्तुंसाठी मागणी राहते. सरासरी उत्पन्नाच्या खालच्या आणि वरच्या पातळीवरील अंतरावर मागणीचे पसरणे (spread) अवलंबून असेल. व्यापार करणाऱ्या देशातील ग्राहकांची या वस्तुसाठी असलेली मागणी या किमान व कमाल मर्यादेच्या आत पण सामायिक राहील. यालाच लिंडर परस्परव्यापी मागणी म्हणतात. दोन देशांमधील उत्पन्नाची पातळी जितकी मिळती जुळती असेल तेवढी मागणी जास्त परस्परव्यापी असेल. आणि या परस्परव्यापी मागणीच्या पल्ल्यातील (range) वस्तू उत्पादन करणारे उत्पादक वस्तू निर्यात करु शकतील. परस्परव्यापी मागणीच्या या पल्ल्यातील वस्तुंचाच व्यापार होईल. यावरुन असा निष्कर्ष निघतो की साधारणपणे दरडोई उत्पन्न समान पातळीवर असणाऱ्या देशातील मागणी जास्त प्रमाणात परस्परव्यापी असेल. आणि म्हणून समान पातळीवर दरडोई उत्पन्न असलेल्या देशांमध्ये जास्त व्यापार होईल. प्राथमिक वस्तुंच्या व्यापारात उत्पादन साधनांचे स्थायीदान हा निर्धारक घटक असला तरी उत्पादित वस्तुंच्या व्यापारात ग्राहकांची पसंती महत्त्वाची भूमिका बजावते.

लिंडर यांचा हा निष्कर्ष आपल्याला प्रत्यक्षात अनुभवाला येतो. उत्पादन साधनांचे समान स्थायीदान आणि दरडोई उत्पन्नाची पातळी समान असणाऱ्या विकसित देशांमध्ये उत्पादित वस्तुंचा व्यापार मोठ्या प्रमाणात होतो. त्याच वस्तुंच्या विविध प्रकारांच्या नमुन्यांचा (models)हा व्यापार असतो. समान स्थायीदान असणाऱ्या दोन देशांमध्ये या उत्पादन साधनांचा वेगवेगळ्या प्रमाणात उपयोग करुन उत्पादन केलेल्या वस्तुंचा व्यापार होतो. समान सीमारेषा असलेल्या दोन देशांमध्ये वस्तुंवर प्रक्रिया करताना वजन वाढणाऱ्या (weight gaining) वस्तुंचा व्यापार होतो. ठराविक हंगामात उत्पादन होणाऱ्या वस्तू वेगवेगळ्या देशात हा हंगाम वेगवेगळ्या वेळी येत असल्यामुळे आयात-निर्यात केल्या जातात. सांस्कृतिक मूल्यांचा लोकांच्या पसंतीवर प्रभाव पडत असल्यामुळे समान संस्कृती

मूल्ये असलेल्या देशांमध्ये जास्त व्यापार होणे सहाजिक आहे. तसेच भौगोलिकदृष्ट्या जवळ असलेल्या देशांमध्ये जास्त व्यापार होतो

स्टॅफन लिंडर यांच्या प्रतिमानाची परिकल्पना पडताळण्याचा एम्.एलीस [13] (Ellis)व एस्.बी. कोलहॅगन [14] (kohlhagan S.B.) यांनी केलेला प्रयत्न अयशस्वी ठरला. तर, अमेरिकेतील परस्परांशी संलग्न असलेल्या अठ्ठेचाळीस राज्यांमधील व्यापाराच्या डी.ग्रेटॅक व यु.तुचिंदा [15] (Greytak D. and Tuchinda U.) यांनी केलेल्या अभ्यासातून लिंडर यांच्या परिकल्पनेला उचलून धरणारे निष्कर्ष प्राप्त झाले.


असे असले तरी स्टॅफन लिंडर यांच्या परस्परव्यापी मागणीचा व्यापाराचा सिध्दांत आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिध्दांत म्हणून मान्यता पावू शकत नाही. कारण व्यापार सुरु झाल्यावर देश कोणती वस्तू निर्यात करील व कोणती वस्तू आयात करील याचे हेक्सचर-ओह्लीन सिध्दांतासारखे स्पष्टीकरण हा सिध्दांत देऊ शकत नाही. तरी सुध्दा, उत्पादित वस्तुंचा व्यापार कोणत्या घटकांवर अवलंबून असतो याचे महत्वपूर्ण स्पष्टीकरण लिंडर देत आहेत. विकसित औद्योगिक देशांमधील उत्पादित वस्तुंचा व्यापार त्या देशांमध्ये उत्पादन घटकांचे समान स्थायीदान असताना आणि सर्वसाधारपणे समान दरडोई उत्पन्न असतांना होत असतो हे वास्तव आहे. आणि नव-अभिमत अर्थशास्त्र संप्रदायाच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या प्रतिमानात प्रतिपादन केलेल्या मतांच्या हे पूर्ण विरोधी आहे.

## 2) अनुमापी अनुकूलता सिध्दांत

नव-अभिमत अर्थशास्त्र संप्रदायाचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिध्दांत उत्पादन वाढीबरोबर सरासरी परिव्यय वाढतो या गृहितावर आधारलेला आहे. याचा अर्थ रुपांतरणवक्र आरंभस्थानाला आंतरवक्र असतो. घटत्या सरासरी परिव्ययाची परिस्थिती तौलनिक दृष्ट्या गौण अपवाद म्हणून हा सिध्दांत त्याच्याकडे दुर्लक्ष करतो. परिव्ययवक्र इंग्रजी 'U'आकाराचा असला तरी उत्पादन संस्था किमान सरासरी परिव्ययाच्या बिंदुला उत्पादन करीत असल्यामुळे उत्पादन वाढविल्यास सरासरी परिव्यय वाढतो असे त्यांचे प्रतिपादन होते. प्रत्यक्षात उत्पादन संस्थांना देशातील बाजारपेठेच्या मर्यादित आकारमानामुळे उत्पादनाची पर्याप्त पातळी गाठता येत नाही. नवअभिमत अर्थशास्त्र संप्रदाय, परिव्यय ऱ्हासक बाह्य अनुकुलतेची (external economies of scale) संकल्पना ग्राह्य मानतो. त्यामुळे एका ठिकाणी केंद्रीत झालेल्या उद्योगांमधील, अथवा एकाच उद्योगातील सर्व उत्पादन एककांमधील सरासरी परिव्यय वक्रांचे उत्पादन वाढीबरोबर अवदोलन (down ward swing) होईल. त्यामुळे त्या ठिकाणच्या अथवा त्या उद्योगातील सर्व एककांना तसेच त्याना सुटे भाग पुरविणाऱ्या दुय्यम एककांनाही उत्पादन वाढविताना घटत्या सरासरी परिव्ययाचा लाभ मिळेल. त्यामुळे त्या देशातील उद्योगांचा रुपांतरण वक्र आरंभ स्थानाला आंतरवक्र राहील. उत्पादन वाढविताना परिवर्तन वक्र अक्ष अक्षाला सपाट होत गेल्यामुळे आयात केल्या जाणाऱ्या वस्तुचे जास्त नग मिळविण्यासाठी कमी नग निर्यात करावे लागतील.

हा मुद्दा आकृती-4 मध्ये स्पष्ट करुन दाखविला आहे.

मोटारी व संगणक उत्पादन करणारे असे दोन उद्योग विचारात घेतले. देशातील उद्योग 'अब'या रुपांतरण वक्रावर खालच्या दिशेने प्रवास करीत असताना रुपांतरण वक्र 'अक्ष' अक्षाला सपाट होत




आकृती 4
घटत्या परिव्ययाला होणारा व्यापार

जाईल. याचा अर्थ असा की देशाला संगणकाचे जादा नग मिळविण्यासाठी कमी मोटारी द्याव्या लागतील. 'कक'ही किंमत रेषा 'अब' या रुपांतरण वक्राला 'स' या बिंदुत स्पर्श (tangential) करीत असल्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारपूर्व परिस्थितीत 'स' हा समतोलन बिंदू असेल. उत्पादन साधनांचे समान स्थायीदान असणाऱ्या पण लोकांची पसंती वेगळी असणाऱ्या देशाबरोबर यादेशाने व्यापार सुरु केल्यास परिस्थितीत होणारा बदल आकृती-4 मध्ये पुढे दाखविला आहे. दुसऱ्या देशातील ग्राहकांची पसंती संगणकापेक्षा मोटारींना जास्त आहे असे मानले तर दोन देशातील किंमत रेषा वेगवेगळ्या असतील. आणि मग 'अब' या रुपांतरण वक्रावर वेगळ्या ठिकाणीं समतोलन बिंदू निर्माण होईल. दुसऱ्या देशातील ग्राहकांची पसंती मोटारींसाठी असल्यामुळे मोटारींचे उत्पादन वाढविले जाईल. या उद्योगाला घटत्या परिव्ययाचा लाभ मिळत असल्यामुळे उत्पादन वाढत असताना परिव्यय कमी झाल्यामुळे किंमतीही कमी होत जातील.

या दोन देशांनी व्यापार करण्यास सुरुवात केल्यावर प्रत्येक देश एका वस्तुच्या उत्पादनाचे पूर्ण वैशिष्टीकरण करील. आकृती-4 मध्ये दर्शविल्या प्रमाणे हा देश आपल्याबरोबर व्यापार करणाऱ्या देशापेक्षा संगणक जास्त स्वस्त दराने विकत आहे. व्यापारात उतरल्यामुळे या देशाला मोटारीच्या बदल्यात संगणक व्यापारापूर्वी पेक्षा चांगल्या किंमतीला देता येतील. याचा अर्थ असा की 'कक' ही किंमत रेषा जास्त उतरती (steeper) होईल. 'स' बिंदूशी किंमत रुपांतरणाच्या सीमांत दरापेक्षा जास्त झाल्यामुळे हा देश 'अब' या रुपांतरण वक्रावर 'ब' या बिंदुकडे सरकेल. परिणामी संगणाकाचा रुपांतरण सीमांत दर कमी होत जाईल. याचा अर्थ असा की, मोटारींचे उत्पादन कमी करत जाऊन संगणकाचे उत्पादन वाढविणे या देशाला जास्त फायदेकारक असेल. हा देश समतोलन बिंदू पासून दूर जात आहे. आणि दूरदूर जात या देशाला आकृती-4 मध्ये दाखविलेल्या रुपांतरण वक्रावरील 'ब' बिंदुशी थांबावे लागेल. येथे देशाला मोटारींचे उत्पादन कमी करुन संगणकाचे उत्पादन पुढे वाढविण्याची संधी नाही, पुढे वाढविण्यास वाव नाही. देशाने संगणक उत्पादनाचे पूर्ण वैशिष्टीकरण केले आहे.

दुसरा देश मोटारींच्या उत्पादनाचे पूर्ण वैशिष्टीकरण करील. व्यापारशर्ती 'अब' या तुटक सरळ रेषेने दाखविल्या आहेत. '$स_१$ ब' संगणकांची 'क्षम' मोटारींबरोबर देवाण घेवाण (exchange) होईल. यांचा जोडण बिंदू '$स_१$' 'अब' या व्यापारशर्ती दर्शविणाऱ्या रेषेवर असला तरी रुपांतरण वक्राच्या बाहेर पण वरच्या पातळीवरील तटस्थता वक्रावर आहे.

दोन्ही देशांमधील उत्पादन साधनांच थायीदान सारखे असले तरी दोन्ही देशामधील ग्राहकांची पसंती वेगवेगळी असल्यास आणि संबंधित उद्योगांना घटत्या परिव्ययाचा म्हणजेच वाढत्या परताव्याचा लाभ मिळत असल्यास, हे देश प्रत्येकी एका वस्तुच्या उत्पादनात विशेषीकरण का करतात या प्रश्नाचे स्पष्टीकरण वाय-यंग

(Y-Young) यांच्या सिध्दांतातून मिळते.[16] एखाद्या देशात ठराविक उद्योग अगोदर सुरु झाला म्हणून त्या उद्योगाला उत्पादन वाढविताना दीर्घकालीन घटत्या सरासरी परिव्ययाचा लाभ मिळतो. हाच उद्योग उशीरा सुरु करणाऱ्या देशात आपल्या वस्तू निर्यात करुन त्या देशाला प्रथम उद्योग सुरु करणारा देश नामोहरम करु शकतो.

### 3) तंत्रज्ञान पश्चायन आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिध्दांत

येथे आपण मायकेल पोस्नर यांच्या 'तंत्रज्ञान पश्चायन' तसेच ' मागणीतील अथवा प्रतिक्रियेतील पश्चायन' या परिकल्पनेवर आधारलेला तसेच जी.सी.हफबाउर यांचा नक्कल करण्याच्या क्रियेतील पश्चायन' या परिकल्पनेवर आधारलेला असे दोन आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिध्दांत अभ्यासणार आहोत. नवअभिमत अर्थशास्त्र संप्रदायाच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिध्दांतात असे विवेचन मांडले जाते की, आंतरराष्ट्रीय व्यापार हा स्थितिक आकृतीबंधाच्या (static framework) परिस्थितीत केला जातो. विविध उत्पादनांचा देशातील पुरवठा ठराविक आणि स्थिर असतो. उत्पादन साधनांची सापेक्ष मुबलकता अथवा दुर्मिळता बदलत नाही असे मानले गेले आहे. त्यामुळे व्यापाराच्या आकृतीबंधात आणि देशातील उत्पादनाच्या वैशिष्टीकरणात बदल होत नाहीत. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा असा की, नवअभिमत अर्थशास्त्र संप्रदायाच्या सिध्दांतात, तंत्रज्ञानातील बदलाचे व्यापारावर आणि वैशिष्टीकरणावर होणाऱ्या परिणामांकडे पूर्ण दुर्लक्ष करण्यात आले आहे. हा सिध्दांत पुढे असे मानतो की, संशोधनातून अथवा नवप्रवर्तनातून एखाद्या देशात नवीन तंत्रज्ञान उदयाला आले तर आंतरराष्ट्रीय पातळीवरील विकिरणामुळे (diffusion) ते तंत्रज्ञान इतर देशाना सहज प्राप्त होते. त्यामुळे तंत्रज्ञानातील बदलामुळे एखाद्या वस्तुच्या उत्पादनात निर्माण होणारा तौलनिक लाभ त्या देशाला फार काळपर्यंत उपभोगता येत नाही. आजच्या परिस्थितीत ही गृहीते आणि विवेचन पध्दती समाधानकारक वाटत नाही. तंत्रज्ञान,व त्याची निर्मिती, त्याचे आंतरराष्ट्रीय पातळीवरील विकीरण यांचा व्यापाराच्या आकृतीबंधावर प्रबळ प्रभाव पडतो असे सिद्ध करण्यासाठी खूप उदाहरणे दिली जातात; पण ती फसवी आहेत. महायुध्दोत्तर काळात तंत्रज्ञानातील श्रेष्ठतेवर आधारित अनेक उत्पादनांमध्ये अमेरिकेला तौलनिक लाभ प्राप्त झाला. इतर देशाना हे तंत्रज्ञान ताबडतोब आत्मसात करुन त्याची नक्कल करता आली नाही पण हे तंत्रज्ञान ज्ञात झाल्यावर इतर देशातील उत्पादकानी त्याची नक्कल करुन त्या वस्तू उत्पादन करण्यास सुरुवात केली. काही उद्योगांच्या बाबतीत तर अमेरिकेला या वस्तुंच्या उत्पादनात असलेला तौलनिक लाभ गमवावा लागून या वस्तू आयात करण्याची पाळी आली. दूरचित्रवाणी संच उत्पादन करणाऱ्या मोटोरोला व यॉर्न या व्यवसाय संस्थानी 'दूरचित्रवाणीसंच' हे उत्पादन पूर्णत्वाला पोहोचले आहे असे मानून 1970 च्या सुमारास या क्षेत्रातून अंग काढून घेऊन 'चित्रवाणी' आधारित (Video based) 'गाभा प्रभुत्व' गमावले. परिणामी या 200 कोटी डॉलर्सच्या बाजारपेठेतून अमेरिका बाहेर फेकली गेली. [17]

मायकेल पोस्नर (Posne, Michael) यांनी तंत्रज्ञानविषयक बदलांचा आंतरराष्ट्रीय व्यापारावर प्रभाव पडतो हे सिध्द करणारे प्रतिमान [18] 1961 मध्ये मांडले. आंतरराष्ट्रीय पातळीवर तंत्रज्ञानात विकरण होण्यात लागणाऱ्या वेळेतील पश्चायनामुळे (time lag) नवप्रवर्तन करणाऱ्या देशाला काही वस्तू उत्पादन करण्यात तौलनिक लाभ तसेच परिव्यय कमी असण्याचा लाभ काही काळ उपभोगता येतो. असे

तंत्रज्ञान अथवा नवप्रवर्तन यांचे आंतरराष्ट्रीय पातळीवर विकरण होण्यास वेळ लागतो. वेळेतील ही पश्चायने दोन प्रकारची असतात असे पोस्नर यांचे म्हणणे आहे

पोस्नर यांनी मांडलेले पहिले पश्चायन 'मागणीतील अथवा प्रतिक्रियेतील पश्चायन' (demand or reaction lag) होय; ग्राहकांना नवीन आणि स्वस्त वस्तू स्वीकारावयास लागणारा वेळ. दुसऱ्या देशातील ग्राहक नवीन आणि स्वस्त वस्तू जितक्या लवकर स्वीकारतील तेवढी पहिल्या देशातील निर्यात जास्त प्रमाणात वाढेल. त्याचबरोबर दुसऱ्या देशातील उत्पादक अशा आयातीला तितकाच प्रखर प्रतिकार करतील.

पहिल्या देशातील नवप्रवर्तित वस्तुंची नक्कल (imitation) करावयास दुसऱ्या देशातील उत्पादकांना लागणारा कालावधी किंवा पश्चायन (lag) हे दुसरे पश्चायन होय. या पश्चायनाचा कालावधी स्वत:च्या आणि परदेशात नवप्रवर्तनाना एकस्व कायद्याखाली (under patent law) मिळणाऱ्या संरक्षणावर अवलंबून असतो. या दोन्ही प्रकारच्या पश्चायनातून तंत्रज्ञानातील पश्चायन निर्माण होऊन त्यातून व्यापाराच्या संधी उपलब्ध होतात. दुसऱ्या देशातील उत्पादकांपर्यंत हे तंत्रज्ञान पोहोचेपर्यंत लागणारा कालावधी म्हणजे 'तंत्रज्ञानातील पश्चायन' (technological lag)होय. अर्थात हे पश्चायन काही काळापुरतेच मर्यादित असते. साधारणपणे प्रत्येक अठरा महिन्यांनी 'मायक्रोचिपची' कार्यक्षमता दुप्पट होते. त्यामुळे दूरसंचार साधने आणि सेवा यांच्या किंमती कमी होतात. त्याकारणाने दूरसंचार साधनांची नक्कल करणे आणि आपल्या देशात प्रसार करणे सुलभ होते. भारतात टेलिफोनच्या प्रसारात 1987-88 नंतर निर्माण करण्यात आलेल्या स्पर्धेमुळे दूरचित्रवाणी केबल जोडण्यांमध्ये चार वर्षात अडीच कोटी जोडण्या एवढी वाढ झाली.[19] भारतात 1998 पर्यंत माहितीजाल प्रवेश (internet access) बाजारात विदेश संचार निगमची मक्तेदारी होती. त्यावेळी माहितीजाल सेवा वापरणाऱ्यांची संख्या फक्त पाच लक्ष होती. 7 नोव्हेंबर 1998 रोजी[20] ही बाजारपेठ खाजगी क्षेत्राला खुली करण्यात आली, त्यानंतर माहिती जाल सेवा (internet services) जोडण्यांची संख्या 2004 च्या अखेरीस त्रेचाळीस लक्ष होती.

एखाद्या देशात वस्तू उत्पादन करण्याची नवीन पध्दती शोधून काढली गेली अथवा नवीन वस्तू उत्पादन केली गेली तर 'मागणीतील अथवा प्रतिक्रियेतील पश्चायनानुसार' त्या देशाची निर्यात वाढेल. दुसऱ्या देशातील उत्पादकांनी 'नक्कल करण्याचा पश्चायन' कालावधी ओलांडून ती वस्तू उत्पादन करण्यास सुरुवात केली की पहिल्या देशाची निर्यात कमी होईल. म्हणजे, पहिल्या देशाच्या नवप्रवर्तनानंतर निर्यात वाढीचा कालावधी' मागणी अथवा प्रतिक्रिया पश्चायनावर' अवलंबून असेल. या पश्चायनाचा कालावधी जेवढा कमी तेव्हढी लवकर निर्यात वाढेल. पहिल्या देशाच्या नवप्रवर्तनाच्या निर्यात वाढीचा कालावधी' नक्कल करण्याच्या पश्चायन' कालावधीवर अवलंबून असेल. दुसऱ्या देशातील उत्पादक या वस्तुची नक्कल करण्यास जितका जास्त कालावधी घेतील तेवढी पहिल्या देशाची निर्यात जास्त काळ वाढलेली राहील. पण दुसऱ्या देशातील उत्पादकांची हे तंत्रज्ञान आत्मसात करुन या वस्तू उत्पादन करण्यास सुरुवात केल्यास पहिल्या देशाची निर्यात कमी होईल. मग त्या देशाला निर्यात वाढीसाठी नवीन वस्तू निर्माण करावी लागेल अथवा नवीन तंत्रज्ञान विकसित करावे लागेल. 'नक्कल'करण्याच्या पश्चायनाचा' कालावधी जितका जास्त तितकी नवप्रवर्तनानंतरची निर्यात वाढ जास्त

असेल.

जी.सी. हफबाउर (Hufbauer G.C.) यांनी पोस्नर यांच्या विश्लेषणाला आणखी एक मुद्याची जोड देऊन नवीन प्रतिमान मांडले आहे. [21] हफबाउर यांच्या म्हणण्याप्रमाणे 'गतीशील अनुमापी अनुकूलतेमुळे' (dynamic economies of scale) 'नक्कल करण्याचा पश्चायन' कालावधी वाढतो. ज्या देशामध्ये एखादी नवीन वस्तू संशोधित करुन उत्पादन केली जाते अथवा नवीन उत्पादन तंत्र विकसित केले जाते त्या देशातील श्रमिकांची कार्यक्षमता ते कार्य सतत जास्त केल्यामुळे वाढते व उत्पादन परिव्यय वाढत्या उत्पादनाबरोबर जास्त प्रमाणात घटतो. इतर देशांनी ही नवीन वस्तू अथवा नवीन उत्पादन तंत्र आत्मसात केले तरी तेथील श्रमिकांची कार्यक्षमता कमी असल्यामुळे उत्पादन परिव्यय जास्त रहातो व पहिल्या देशाला निर्यातीतील वाढ जास्त काळ उपभोगता येते.

हफबाउर यांच्या म्हणण्याप्रमाणे मजुरीचे दर जास्त असलेल्या देशात तंत्रज्ञानातील सुधारणा जास्त लवकर अमलात आणल्या जातात. उत्पादकांना श्रमांची बचत करण्याचे तंत्रज्ञान शोधावेच लागते. मजुरीचे दर जास्त असलेल्या देशात 'फुरसतीचा विकल्पी परिव्यय' (opportunity cost of leisure) जास्त असल्यामुळे धुलाई यंत्रे, व्हॅक्युम क्लिनर्स, स्पिन ड्रायर्स, मायक्रोवेव्हज यासारखी श्रमांची बचत करणाऱ्या घरगुती उपकरणांना जास्त मागणी असते. यावरुन असा निष्कर्ष निघतो की 'तंत्रज्ञान पश्चायनांची' निर्यात मजुरीचे दर जास्त असलेल्या देशांकडून मजुरीचे दर कमी असलेल्या देशांकडे होत असते. 1966 मध्ये प्रकाशित केलेल्या पुस्तकात हफबाउर यांनी आपल्या प्रतिमानाच्या पुष्ट्यर्थ कृत्रिम कच्च्या मालापासून उत्पादन केल्या जाणाऱ्या वस्तुंच्या व्यापाराचे उदाहरण दिले आहे. 1991 पासूनच्या दशकात दक्षिण कोरियात होणारी वस्त्रप्रावरणांची आयात सतत वाढत आहे. 1991 मध्ये ही आयात 18.3 कोटी डॉलर्सची होती; 1992 मध्ये ती 2.7 कोटी डॉलर्स पर्यंत वाढली.[22] हेक्सचर-ओहलीन प्रतिमानाप्रमाणे दक्षिण कोरियामधील कृत्रिम धाग्याच्या उद्योगाला तौलनिक लाभ मिळत होता.[23] पण पुढे दक्षिण कोरियातील मजुरीचे दर वाढू लागल्यावर श्रम-धन उद्योगातील तौलनिक लाभ नष्ट होत गेला. आणि त्या जागी भांडवल-तंत्रज्ञानधन इलेक्ट्रॉनिकस उद्योगाचा विकास झाला.

### 4 ) वस्तू अस्तित्व चक्र सिध्दांत

रेमंड व्हेर्नोन (VernonReymond)यांनी तंत्रज्ञानातील बदलानुसार व्यापाराचे आकृतीबंध बदलतात याचे विश्लेषण करणारा दृष्टिकोन मांडला.[24] (Kuznets S.) एस. कुझनेटस् यांच्या 1953 मध्ये मांडलेल्या तसेच एस्.हर्ष (Hirsch S.)यांच्या 1965 मध्ये मांडलेल्या 'वस्तू अस्तित्व चक्राच्या ' विविध घटकांच्या (anatomies)आणि मायकेल पोस्नर (Posner Michael) यांच्या 1961 मध्ये विकसित केलेल्या ' वस्तुची अथवा तंत्रज्ञानाची नक्कल करावयास लागणारे पश्चायन' (imitation gap)या सिध्दांतावर रेमंड व्हेर्नोन यांचा सिध्दांत आधारलेला आहे. औषध उत्पादनासारख्या उद्योगात वस्तू प्रवर्तनाचे स्थान महत्त्वाचे असते कारण औषधांचे बाजारपेठेतील अस्तित्व अल्पकालीन असते. अस्तित्वात असलेल्या उत्पादकांना नवीन औषध विकसित करण्यासाठी अथवा जास्त परिणामकारक पर्यायी औषध विकसित करण्यासाठी किती कालावधी लागतो यावर औषधाचे आयुष्य अवलंबून असते. असे औषध अथवा अशा वस्तू अस्तित्वाच्या तीन प्रावस्थांमधून (Phases) जात असतात. या प्रावस्थांना उत्पादनाचे अस्तित्व चक्र

(Product life cycle)असे म्हणतात. व्हेर्नोन या तीन प्रावस्थांचे विवेचन खालील प्रमाणे करतात.

**अ) नवीन उत्पादन प्रावस्था (The New Product Stage)**


या प्रावस्थेमध्ये विविध कारणांमुळे वस्तुचे उत्पादन नवप्रवर्तन करणाऱ्या देशांमध्ये केंद्रीत झालेले असते. याचे पहिले कारण असे की बहुतेक सर्व उत्पादन देशांतर्गत बाजारपेठेसाठी केले जाते. निर्यात केलीच तर ती दुय्यम स्वरुपाची असते. दुसरे कारण असे की, उपभोक्त्यांना मान्य होतील असे बदल वस्तुमध्ये घडवून आणण्यासाठी उत्पादकांना ग्राहकांकडून प्रतिपोषण (feedback) मिळविण्या करीता ग्राहकांसमीप जास्त रहाता येईल असा उत्पादक प्रयत्न करतात. तिसरे कारण, नवीन उत्पादन प्रावस्थेमध्ये वस्तुला असलेली मागणी किंमत अलवचिक असते. त्याचे कारण असे की उत्पादक एक अथवा दोनच असल्यामुळे त्यांना स्पर्धेला तोंड द्यावे लागत नाही. शिवाय एकस्व कायद्याचे (Patent law) त्याला संरक्षण असते. परिणामी जास्त उत्पादन परिव्यय ग्राहकाकडे ढकलता येतो. रेमंड व्हेर्नोन यांनी आपल्या पुस्तकात दिलेल्या आकृतीत [25] बदल करुन आकृती 5 मध्ये नवीन उत्पादन प्रावस्था आकृतीच्या पहिल्या विभागात दाखविली आहे. उत्पादन परिव्यय वाढत आहे. सर्व उत्पादन देशात वापरले जात आहे.

**ब) परिपक्व उत्पादन प्रावस्था (The Maturing Product stage)-**

उत्पादनाच्या परिपक्व (maturity) प्रावस्थेत उत्पादकाला आपल्या देशातील तसेच परदेशातील उत्पादकांच्या स्पर्धेला तोंड द्यावे लागते. एकस्वाचे संरक्षण संपल्यामुळे इतर देशातील उत्पादकही या वस्तुचे उत्पादन सुरु करतात. मागणी किंमत लवचिक (Price-elastic) झाल्यामुळे उत्पादकांना परिव्यय कमी करण्याचे मार्ग शोधावे लागतात. या परिस्थितीत परदेशातील विस्तारत जाणाऱ्या बाजारपेठेत वस्तू निर्यात केली जाते. वाहातुकीचा खर्च वाचविण्यासाठी आणि परदेशातील प्रशुल्क व प्रशुल्केतर अडथळे पार करण्यासाठी अशा व्यवसाय संस्था परदेशातच उत्पादन सुविधा प्रस्थापित करतात. त्यामुळे पहिल्या देशाची निर्यात वाढण्याचे प्रमाण कमी होते अथवा निर्यात प्रत्यक्षात कमी होते. आकृती 5 मध्ये ही परिस्थिती विभाग दोन मध्ये दाखविली आहे. वस्तुची केली जाणारी निर्यात रेखांकीत भागाने दाखविली आहे.

**3) प्रमाणीकरण प्रावस्था (Standardisation product stage)**

उत्पादित वस्तू प्रमाणीकरण प्रावस्थेत आल्यावर उत्पादन संस्थेचा मागणी-वक्र किंमत लवचिक होतो. वस्तुसाठी आकारल्या जाणाऱ्या किंमतीवर आणि किंमत स्पर्धेच्या तीव्रतेवर अवलंबून रहाते. त्यामुळे उत्पादक संस्था किमान परिव्यय ठिकाणी उत्पादनाच्या सुविधा विकसित करतात;




आकृती - 5

व्यापाराचे वस्तु अस्तित्व चक्र प्रतिमान

किंवा अशा देशात दुय्यम उत्पादन संस्था स्थापन करतात. मूळ देशातील उत्पादन प्रत्यक्षात घटते. परिणामी निर्यात घटते.

विकसित देशात परिष्कृत (Sophisticated)वस्तुंसाठी फार मोठी बाजारपेठ उपलब्ध असते. या बाजारपेठेतील मागणीही फार वेगाने वाढत असते. त्यामुळे नवीन वस्तुंचे प्रवर्तन करण्यासाठी वातावरण पोषक असते. अशा वस्तू प्रवर्तित करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या संशोधकाचा आणि अभियांत्रिकींचाही मोठा वर्ग कार्यप्रवण असतो. एका बाजूला मजुरीचे दर जास्त असल्यामुळे श्रमबचतकारी उत्पादन तंत्रज्ञान विकसित करण्याची गरज आणि अशा परिष्कृत वस्तू नवप्रवर्तित करण्यास पोषक असलेले वातावरण यामुळे सतत नवनवीन वस्तू बाजारात आणल्या जातात.

संशोधन आणि विकास यावरील खर्च अवाढव्य असतो. त्यात धोकाही खूप असतो. फार मोठ्या व श्रीमंत असलेल्या उत्पादन संस्थांनाच या गोष्टी शक्य होतात. त्यामुळे नवीन वस्तुंचे प्रवर्तन, नवीन तंत्रज्ञानाचा शोध या गोष्टी विकसित देशातच होत असलेल्या दिसून येतात. या देशांमध्ये परिष्कृत वस्तुंसाठी मोठी बाजारपेठ उपलब्ध असते; आणि ती सतत वाढत असते. त्यामुळे उत्पादकांना बाजारपेठांच्या व ग्राहकांच्या संपर्कात रहाणे शक्य होते. विकसित देशातील उत्पादन संस्था उत्पादनाच्या सुविधा विकसनशील देशात स्थापन करते. उत्पादनाची प्रक्रिया प्रमाणीकृत झाल्यामुळे तौलनिक दृष्ट्या कमी कुशल कामगार या वस्तुंचे उत्पादन करु शकतात व विकसनशील देशात इतर उत्पादन साधने तुलनेने स्वस्त असतात. सुट्या भागांचे उत्पादन आणि त्यांची जुळणी वेगवेगळ्या ठिकाणी करुन उत्पादन मोठ्या प्रमाणावर करता येते. या परिस्थितीत विकसित देशात नवप्रवर्तीत झालेल्या वस्तू विकसनशील देशातून परत विकसित देशात निर्यात केल्या जातात. रेमंड व्हेर्नोन यांच्या वस्तू अस्तित्व चक्र प्रतिमान, व्यापाराचा ओघ आणि परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक यांचे एकात्मीकरण करते. बहुराष्ट्रीय उत्पादन संस्था विकसनशील देशात उत्पादनाचा परवाना देण्यापेक्षा प्रत्यक्ष गुंतवणूक करणे जास्त श्रेयस्कार मानतात. त्यामुळे निर्णय प्रक्रियेवर नियंत्रण राखता येते. टोयाटो मोटार कंपनी आणि किर्लोस्कर यांच्या सहभागातील टोयाटो किर्लोस्कर मोटर यांची बंगलोर येथील उत्पादन सुविधा याचे उदाहरण होय.एकस्व असलेल्या वस्तुंचा उत्पादनावर व तंत्रज्ञानावर निर्बंध राखता येतात. पण त्याचबरोबर व्यापार चिन्हाच्या (brand name)व्यापक प्रसाराचा लाभ उठविता येतो.

कोरियाने मात्र परदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीच्या बाबतीत वेगळे धोरण स्वीकारले. तंत्रज्ञान हस्तांतरित करण्याच्या अटीवरच परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक स्वीकारली व उद्योग संस्थेचे नियंत्रण स्वत: हातात ठेवले. त्यामुळे कोरियन उद्योग संस्थांना स्वायत्तता प्राप्त होऊन व्यवस्थापनाची नवीन व जास्त कार्यक्षम पध्दती विकसित करता आली. 'वस्तू अस्तित्व चक्राच्या' या प्रतिमानाच्या आधारे रेमंड व्हेर्नोन पूर्वेकडील व पश्चिमेकडील व्दिमार्गी व्यापाराच्या आकारबंधाचे स्पष्टीकरण देऊ शकतात.

'वस्तू अस्तित्व चक्राच्या' तीन प्रावस्था आणि बाजारपेठेतील व संशोधनातील प्रोत्साहक वातावरण यांच्या विवेचनातून निर्माण होणारे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे प्रतिमान गतीशील आहे. तंत्रज्ञानाच्या पश्चायनातून मिळणाऱ्या तौलनिक लाभाचे प्रतिमान त्यामानाने वस्तुस्थितीचे विश्लेषण करण्यात कमी पडते. रेमंड व्हेर्नोन यांच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या 'वस्तू अस्तित्व चक्र' सिध्दांतात परदेशी

प्रत्यक्ष गुंतवणूक अंगिभूत असल्यामुळे तंत्रज्ञानाचे हस्तांतरण, उत्पादनाच्या सुविधांचे दुसऱ्या देशात होणारे अंतरण (shift) या बाबी सिध्दांताच्या चौकटीत सामावून जातात.


धुलाई यंत्रे, दूरचित्रवाणी संच या गृहोपयोगी इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे या तीन प्रावस्थांमधून झालेले स्थित्यंतर आपण प्रत्यक्ष अनुभवले आहे. सेमीकंडक्टरच्या उत्पादनातून मिळालेला तौलनिक लाभ काही काळानंतर विरुन गेल्यावर सिलीकॉन चिप्सच्या प्रवर्तनामुळे परत प्राप्त झाल्याचे आपण पाहिले आहे. कृष्णधवल दूरचित्रवाणी संच, रंगीत दूरचित्रवाणी संच आणि आता हायडेफिनिशन दूरचित्रवाणी संचही नवप्रवर्तनातून 'उत्पादन अस्तित्व चक्र पुनर्निर्मित करण्याची प्रक्रियाही उद्बोधक आहे.

बहुराष्ट्रीय उत्पादन संस्थांनी उत्पादन सुविधा विविध देशात विकसित केल्यामुळे संशोधित नवीन वस्तू जवळ जवळ एकाच वेळी बऱ्याच देशात उपलब्ध केली जाते. त्यामुळे या प्रतिमानात वर्णन केलेली तंत्रज्ञान प्रेरित तौलनिक लाभाची परिस्थिती आज दिसून येत नाही. गेल्या पंधरा वर्षात उत्पादनाचे जागतिक पातळीवर फार मोठ्या प्रमाणावर सुसूत्रीकरण (rationalisation) केले जात असल्यामुळे बऱ्याच वस्तू पूर्वीसारख्या एकाच ठिकाणी पूर्णपणे उत्पादन केल्या जात नाहीत. हल्ली वस्तुंचे नवप्रवर्तन इतक्या वेगाने होत आहे की ती वस्तू प्रमाणीकरण प्रावस्थेला (standardisation stage) एवढेच काय, परिपक्व उत्पादन प्रावस्थेला (maturity product stage) पोहोचण्यापूर्वीच तिचा नवीन आविष्कार बाजारात पोहोचत असतो. वस्तू अस्तित्व चक्र लांबविल्यामुळे परिपक्व उत्पादन प्रावस्था विसंगत ठरत आहे. अशा प्रकारे उत्पादन सुधारण्याच्या प्रक्रियेतून विकसित देश आपले तंत्रज्ञान नेतृत्व अमर्याद काळपर्यंत आपल्या हातात राखून ठेवण्याचा प्रयत्न करतात. मजुरीचे दर जास्त असल्यामुळे उत्पादक श्रमबचतकारी नवप्रवर्तने अंमलात आणतात हे रेमंड व्हेर्नोन यांचे स्पष्टीकरण आजच्या परिस्थितीत अपुरे वाटते. आयातीतील कच्च्या मालावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी, प्रदुषण नियंत्रणाचा परिव्यय कमी करण्यासाठी, वातावरणाला अनुकूल (environment friendly) वस्तू उत्पादन करुन ग्राहकांना संतोष प्राप्त करुन देण्यासाठी नवप्रवर्तन करणे आज जास्त महत्त्वाचे ठरत आहे. रेमंड व्हेर्नोन यांच्या प्रतिमानात या बाबी समाविष्ट करणे शक्य असले तरी त्यांनी तसे केले नाही. रेमंड व्हेर्नोन यांनी 1979 मध्ये अमेरिका आणि इतर विकसित देशातील (विशेषतः युरोप व जपान) तंत्रज्ञान तफ़ावत कमी होत चालली आहे असे निरीक्षण नोंदविले आहे. व्हेर्नोन यांनी 1974 मध्ये अल्पजनाधिकार व्यवसाय संस्थांच्या वर्तणुकीचे विश्लेषण वस्तु अस्तित्व चक्र सिध्दांताने केले आहे.

### 5) मक्तेदारीचा सिध्दांत

जेकब वायनर [26] आणि डब्ल्यू. मॅक्स कॉर्डन[27] (Viner Jacob and Corden W. Max) यांनी असे प्रतिपादन केले की, उत्पादक आपल्या देशात ती वस्तू उत्पादन करणारा एकटा म्हणजे मक्तेदार असला तरी आंतरराष्ट्रीय बाजारात तो अनेकविक्रेत्यांपैकी एक असतो. तेथे त्याचे स्थान पूर्णस्पर्धात्मक बाजारपेठेतील एका विक्रेत्याचे असते. देशांतर्गत बाजारात उत्पादकाचा मागणीवक्र (म्हणजेच सरासरी प्राप्तीचा वक्र) उजवीकडे उतरता असतो. आकृती-6 मध्ये तो वक्र 'सप' या रेषेने दाखविला आहे. सीमांत प्राप्तीचा वक्र (सप्ररेषा) सरासरी प्राप्तीच्या वक्राच्या डावीकडे असतो. उत्पादक सीमांत प्राप्ती (सप्रा) सीमांत परिव्ययाच्या

(सीप) बरोबर होईल इतके उत्पादन देशांतर्गत बाजारपेठेसाठी करतो. अशा परिस्थितीत उत्पादन फारच मर्यादित असेल. पण सरासरी प्राप्ती सरासरी परिव्ययापेक्षा जास्त असल्यामुळे जादा नफा मिळेल. आंतरराष्ट्रीय व्यापारात उतरल्यावरही उत्पादकाला दोन्ही (देशातील व देशाबाहेरील) बाजारपेठेतील सीमांत प्राप्ती (देशातील बाजारपेठेत 'दप', आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत - 'अब) सीमांत परिव्ययाइतकी होईल इतके उत्पादन करावे लागेल. म्हणजे एकूण उत्पादन 'धब' इतके असेल त्यापैकी देशात 'धप' आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत 'पब' एवढे उत्पादन विकेल. उत्पादकाने उत्पादन कोठेही विकले तर सीमांत परिव्यय सारखाच (दप अथवा अब) असेल पण सरासरी प्राप्ती (किंमत) वेगवेगळी असेल. मक्तेदार स्वदेशातही वस्तू 'तप' (म्हणजे 'कध') किंमतीला विकेल. त्यात त्याला 'कतदग,' इतका जादा नफा मिळेल. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत ही वस्तू 'अब' (म्हणजेच 'क, ध') किंमतीला विकली जाईल. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी पूर्ण लवचिक असल्यामुळे मागणीची रेषा ('क,म') हीच सरासरी व सीमांत प्राप्तीची रेषा असल्याकारणाने उत्पादकाला जादा नफा मिळणार नाही. स्वदेशातील बाजारपेठेत मागणीची रेषा ('सप') उजवीकडे उतरती असल्यामुळे देशातील वक्री निर्बंधित केल्याकारणाने विक्रेत्याला जादा नफा मिळेल. देशातील बाजारपेठेत वस्तू जास्त किंमतीला आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तीच वस्तू कमी किंमतीला विकण्याच्या धोरणाला मूल्यावपातन असे म्हणतात.




आकृती - 6
मक्तेदारी अवस्थेतील निर्यातीचे धोरण

मूल्यावपातन ही अवाजवी (unfair) स्पर्धा असल्यामुळे मुल्यावपातन विरोधी कायदे करुन अंतर्गत किंमतीपेक्षा मूल्यावपातन किंमत जितक्या फरकाने कमी असेल तेव्हढे आयात प्रशुल्क अथवा प्रतिशुल्क (Countervailing duty) त्या वस्तूवर बसविले जाते. काही देश वस्तुंची निर्यात वाढावी म्हणून निर्यात अनुदानही देतात. जागतिक व्यापार संघटनेने मूल्यावपातन विरोधी संहिता तयार केली असून जागतिक व्यापार संघटनेच्या सभासद देशांचे मूल्यावपातन विरोधी कायदे या संहितेच्या कलमाना धरुन असले पाहिजेत. लेखांक दोन मध्ये लेखाच्या सहाव्या भागात अन्योन्य मूल्यावपातनाचे विश्लेषण मांडले आहे. अंतर-उद्योग (intraindustry) आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या परिस्थितीत दोन्ही देशातील उत्पादक परस्परांच्या देशात बाजारपेठेतील किंमतीपेक्षा कमी किंमतीला वस्तू विकून अन्योन्य मूल्यावपातन (reciprocal dumping) करतात. ते दोन्ही देशातील उपभोक्तांना लाभकारी ठरते.

अशा परिस्थितीत, मक्तेदार उत्पादक, किंमत-स्वीकारणारा (Price taker) न रहाता किंमत-कर्ता (Price maker) होतो. आंतरराष्ट्रीय बाजारात स्पर्धात्मक परिस्थितीत सुध्दा तो काही प्रमाणातही भूमिका काही काळापुरती का होईना पार पाडीत असतो. अमेरिका, कॅनडा या देशानी प्रथमत: व नंतर मेक्सिकोसह स्थापन केलेला उत्तर अमेरिका मुक्त व्यापार संघ (North American Free Trade Association) आणि मुक्त व्यापार संघ (Customs Union) यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात प्रादेशिक वादाचा शिरकाव झाला. प्रादेशिक वाद ही एखाद्या भौगोलिक विभागातील देशांनी निर्माण केलेली अधिमान्य व्यापार व्यवस्थेची (Preferential Trading Arrangement) प्रवृत्ती होय. मुक्त व्यापारक्षेत्र (free trade areas) आणि मुक्त व्यापार संघ (customs union) ही अधिमान्य व्यापार व्यवस्थेची रुपे होत. अशा व्यवस्थेतील देश एखाद्या संलग्न भौगोलिक विभागातील असतात. आजुबाजुचे लहान देश व्यापारातील लाभ पदरात पाडून घेण्यासाठी मोठ्या शेजारी देशांबरोबर अशा व्यवस्थेत स्वत:ला सामावून घेतात. अशा प्रकारच्या अधिमान्य व्यापार व्यवस्था निर्माण झाल्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात नवीन परिमाण निर्माण झाले आहे. प्रादेशिक व्यवहार व्यवस्थेमुळे (regional trading arrangements) व्यापार जास्त मुक्त होतो अशी समजूत होती. पण जेकब वायनर (Viner Jacob) यांनी असे प्रतिपादन केले की अशाव्यवस्थेचे व्यापार निर्मिती (trade creation) आणि व्यापार अपवाहन (trade diversion) असे दोन परस्परविरोधी परिणाम होत असतात.[28] डब्लू-मॅकस कॉर्डन (Corden W.M.)यांनी बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थांच्या व्यापाराचे स्थान निश्चयन प्रतिमान (Locational Model) मांडले.[29]

या लेखांकाच्या दोन, तीन, चार आणि पाच या विभागात अभ्यासलेल्या व्यापारवादी, अभिमत, नव अभिमत आणि अतिनवअभिमत अर्थशास्त्र संप्रदायातील आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिध्दांतात आपण असे पाहिले की आपल्याला तौलनिक लाभ असलेल्या वस्तुंच्या उत्पादनात विशिष्टीकरण करुन, ते उत्पादन निर्यात करुन दुसऱ्या देशाकडून त्या देशाला तौलनिक लाभ असलेल्या उत्पादनांची आयात करतो. हा तौलनिक लाभ वस्तुंच्या श्रममूल्यातील फरकावर, प्रस्ताव वक्रातील रकावर, उत्पादन साधनांच्या स्थायीदानातील फरकावर, उपभोक्त्यांच्या पसंतीतील (परस्परव्यापी मागणी) फरकावर, अनुमापी अनुकुलतेतील फरकावर, तंत्रज्ञान विकरणातील पश्चायन, गतीशील अनुमापी

अनुकुलतेतील पश्चायन तसेच देशातील मक्तेदारी व अन्य देशातील त्या उत्पादकाची स्पर्धात्मक परिस्थिती यासारख्या विविध घटकांवर अवलंबून असतो. या लेखकांनी आपल्या सिध्दांतात/प्रतिमानात तौलनिक लाभाचे विविध पैलू विचारात घेतले. मात्र तौलनिक लाभाच्या तत्त्वाचा मूलस्रोत तसाच राहिला.

असा व्यापार दोन देशातील वेगवेगळ्या उद्योगातील (inter-industry) होता. त्यातून वेगवेगळ्या उद्योगातील वैशिष्टीकरणाचे महत्त्व विशद करण्यात येत होते. एकाच उद्योगातील उत्पादनात व्यवसाय संस्था वैशिष्टीकरण करुन त्यांचा आयात निर्यात व्यापार करीत असल्याचे 1975 नंतर जास्त प्रकर्षाने जाणवू लागले. अगोदरच्या आंतरउद्योग वैशिष्टीकरणापेक्षा हे वैशिष्टीकरण संकुचित स्वरुपाचे होते. एकाच उद्योगातील विविध वस्तुंची आयात-निर्यात खूप वाढली. या लेखांकाच्या दोन ते पाच विभागात अभ्यासलेल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या विविध सिध्दांतात तसेच प्रतिमानात अंतर-उद्योग (intra-industry) आयात-निर्यात व्यापाराचे विश्लेषण समाविष्ट होत नव्हते. याचा अर्थ, हे सिध्दांत आंतरराष्ट्रीय व्यापाराचे हे नवीन पैलू (dimension) आपल्यात सामाबून घेत नव्हते. ही त्यांच्यामधील त्रुटी होती. एकाच उद्योगातील वस्तुंची देश आयात-निर्यात का करतात याचे स्पष्टीकरण या सिध्दांतांच्या-प्रतिमानांच्या चौकटीत देता येत नाही.

अतिनव अभिमत अर्थशास्त्र संप्रदायातील आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या प्रतिमानात आंतर-उद्योग वैशिष्टीकरणापर्यंत विश्लेषण पुढे नेण्यात आले. पण ते पूर्ण स्पर्धात्मक बाजारपेठेच्या अस्तित्वाच्या गृहीतात अडकून बसल्यामुळे अंतर-उद्योग आयात-निर्यात व्यापाराचे स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत. पूर्ण स्पर्धात्मक बाजारपेठेतील दोन गृहीते या दोन बाजारपेठांमधील (म्हणजे आंतर उद्योग व अंतर उद्योग) विश्लेषणात महत्त्वाची ठरतात. बाजारपेठेत अनेक विक्रेते असून त्यापैकी प्रत्येक विक्रेता किंमत स्वीकारणारा (Price-taker) असतो, हे त्यापैकी एक गृहीत होय. दुसरे गृहीत असे की, उपभोक्त्याच्या दृष्टीने एका उत्पादकाचे उत्पादन दुसऱ्या उत्पादकाच्या उत्पादनापेक्षा वेगळे नसते. पण ही दोन्ही गृहीते प्रत्यक्षात अस्तित्वात नसल्यामुळे आंतर-उद्योग आंतरराष्ट्रीय व्यापारापेक्षा अंतर-उद्योग आंतरराष्ट्रीय व्यापार जास्त महत्त्वाचा ठरतो.

आंतर-उद्योग आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या लाभापेक्षा अंतर-उद्योग आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ मूलतः वेगळे आहेत. आंतर-उद्योग आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे व्यापार करणाऱ्या देशातील लोकांचे उत्पन्न वाढते, त्यांना वस्तुंचे जास्त प्रमाणात सेवन करता येते. व्यापार करणारे देश वरच्या पातळीवरील तटस्थता वक्रावर सरकतात. काही प्रकारचे उद्योग वाढीला लागत असताना काही उद्योग उतरतीला लागतात. अर्थव्यवस्थेतील समायोजन जास्त त्रासाचे ठरते. अंतर-उद्योग आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे किंमती घटतात; त्यामुळे लोकांच्या वास्तव उत्पादनात वाढ होते. पण महत्त्वाचा लाभ असा की उपभोक्तांना विविध प्रकारच्या वस्तुंमधून निवड करण्याची संधी प्राप्त होते. उत्पादन करीत असलेल्या वस्तुंची उत्पादक विविधता वाढवितात. काही प्रकारांच्या उत्पादनावर भर देऊन इतर प्रकार आयात करतात. अर्थव्यवस्थेतील समायोजन कमी त्रासाचे ठरते.

आंतर राष्ट्रीय व्यापारात अंतर-उद्योग व्यापार आणि अंतर-संस्था (intra-firm) व्यापार म्हणजेच परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक (foreigndirect investment) अशा दोन वेगळ्या मिती (dimensions) उभरुन येत असून त्यांचा स्वतंत्र अभ्यास

करण्याची गरज निर्माण झाली आहे. त्या दृष्टीने मांडलेल्या सिध्दांतांचा तसेच प्रतिमानांचा अभ्यास लेखांक-दोन मध्ये केला आहे.

## संदर्भ सूची


13) Ellis M - An Alternative Interpretation and Empirical Test of the Linder Hypothesis, Quarterly Journal of BusinessEconomics, Vol. 22, 1983.

14) Kohlhagen S.B. - Income Distribution and Representative Demand in International Trade Flows; An Empirical Test of Linder's Hypothesis, Southern Economic Journal, Vol.44, 1977.

15) Greytak D.and Tuchinda V.- The Composition of Consumption and Trade Intensities. An Alternative Test of Linder Hypothesis, Weltwirt Schaftliches Archiv Band, 126 Heft 1, 1990.

16) Young A - Learning by Doing and the Dynamic Efforts of International Trade, quarterly Journal of Economics, Vol 106, 1928.

17) Prahalad C.K. and Hamel Gary - The core competence of the corporation - Harvard Business Review, May-June 1990, PP.79-91.

18) Posner Michacl- International Trade and Technical Change, Oxford Economic Papers, No.13, 1961.

19) Chowdary T. - Telecom Liberalisation and Competition in Developing Countries, Telecommunications Policy Vol. 22 Nos. 4-.5 PP. 259-65.

20) Nicholson M.and Taylor P.- 'India Throws Market Open to all comers to provide Internet Access; Financial Times, November 11, 1998 p.6.

21) Hufbauer, G.C. - Synthetic Materials and the Theory of International Trade, London, Duckworth 1966. Hufbouer G.C.' The Impact of National Characteristics and Technology on the Commodity Composition of Trade in Manufactured Goods' in Vernon Reymond (Ed.)- The Technology Factor in International Trade, New York, Columbia University press, 1970.

22) GATT Handbook 1993.

23) UN Handbook of Industrial Statistics, 1992, P. 523.

24) Vernon Reymond- International Investment and International Trade in the product Cycle, Quarterly Jourmal of Economics, Vol. 80, May 1966.

25) Vernon Reymond- Economics of International Business, 3rd edition, London, Prentice-Hall, 1981.

26) Viner Jacob- Dumping: A problem in International Trade, Chicago Chicago University Press, 1923.

27) Corden W.M. The Theory of International trade: In Dunning J.H. (Ed) International Investment; selected Readings, Harmondsworth: Penguin.

28) Viner Jacob- The Customs Union Issue- Camegie Endowment for National Peace, 1950

29) Corden W.M. Trade Policy and Economic Welfare, Oxford, Clarendon Press, 1974.


✦✦✦

आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या प्रमुख सिध्दांतांचा सारांश.

लेखांक - एक

| अर्थशास्त्र संप्रदाय | सिध्दांत | सिध्दांत मांडणारे अर्थशास्त्रज्ञ | सन |
|---|---|---|---|
| व्यापारवादी संप्रदाय | व्यापार वाढाव्याचे संचयन | | |
| अभिमत अर्थशास्त्र संप्रदाय | संपूर्ण लाभाचा सिध्दांत | ॲडॅम स्मिथ | 1776 |
| | तौलनिक लाभाचा सिध्दांत | डेव्हिड रिकार्डो | 1816 |
| | अन्योन्य मागणीचा सिध्दांत | जॉन स्टुअर्ट मिल | |
| नवअभिमत अर्थशास्त्र संप्रदाय | प्रस्ताव वक्र | आल्फ्रेड मार्शल, एफ.वाय.एजवर्थ | |
| | उत्पादन साधनांचे स्थायीदान | एली हेक्सचर, बर्टिल ओलीन | 1919,1933 |
| | उत्पादन साधनांच्या किंमतीचे समानीकरण | पॉल सॅम्युअलसन, डब्ल्यू स्टॉल्पर | 1941 1948 |
| | सर्वसाधारण समतोल | आल्फ्रेड मार्शल, एफ्.वाय.एजवर्थ, गॅटाफ्रिड हॅबर्लर. | 1954 |
| | लि ऑनटिएव्ह विरोधाभास | वॅसिली लिऑनटिएव्ह | 1954 |
| अतिनव अभिमत अर्थशास्त्र संप्रदाय | परस्परव्यापीमागणीचा सिध्दांत | स्टॅफन लिंडर | 1961 |
| | अनुमापी अनुकुलता सिध्दांत | ए. यंग | 1928 |
| | तंत्रज्ञान पश्चायन आधारित सिध्दांत | मायकेल पोस्नर,जी.सी. हर्फबाउर | 1961 1966 |
| | उत्पादन अस्तित्वचक्र सिध्दांत | रेमंड व्हेर्नोन | 1966 |
| | मक्तेदारीचा सिध्दांत | जेकब वायन, डब्लू.मॅक्स कॉर्डन | 1974 |

### श्रद्धांजली

## डॅडी देशमुख

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य बाबूराव उर्फ डॅडी देशमुख यांचे वयाच्या 70 व्या वर्षी दिनांक 21 जुलै 2005 रोजी हृदयविकाराने दु:खद निधन झाले.

समाजसेवा, नाट्य, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात डॅडी देशमुख यांचे योगदान महत्त्वपूर्ण होते. संत गाडगेबाबांच्या जीवनावर आधारित 'देवकीनंदन गोपाला' तसेच महाराष्ट्र राज्य शासन, फाळके पुरस्कार प्राप्त 'राघुमैना' या चित्रपटाची निर्मिती देखील डॅडी देशमुख यांनी केली होती.

अकोला येथे 25 ते 27 ऑक्टोबर 1986 या दरम्यान दहाव्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाचे आयोजन त्यांनी उत्कृष्टरित्या केले होते.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने डॅडी देशमुख यांना विनम्र श्रद्धांजली.

**प्रमुख संपादक**
'अर्थसंवाद'

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### वार्षिक वर्गणीची मुदत संपली असल्यास

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे वार्षिक सदस्य आणि अर्थसंवाद चे वार्षिक वर्गणीदार यांना आम्ही आठवण करून देऊ इच्छितो की, अर्थसंवादच्या जानेवारी-मार्च 2005 या अंकाबरोबर ज्यांची वार्षिक वर्गणीची मुदत संपली आहे त्यांनी 1 एप्रिल 2005 ते 31 मार्च 2006 या वर्षासाठी आपल्या सदस्यत्वाचे आणि अर्थसंवादच्या वर्गणीदाराचे नूतनीकरण करून घ्यावे ही विनंती. ही वर्गणी कार्यवाह-खजिनदार चारूदत्त गोखले, जळगाव यांच्या पत्त्यावर पाठवावी.

**चारूदत्त गोखले**
कार्यवाह-खजिनदार

# कृषी विपणनाचे विविध पैलू

✦ रवीन्द्र दोशी. कोल्हापूर

*भूतपूर्व प्राध्यापक व प्रमुख, अर्थशास्त्र विभाग,*
*शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.*

## 1. कृषी उत्पादनाची वैशिष्ट्ये

कृषीमालाच्या विपणनाची प्रक्रिया त्याच्या उत्पादन कार्याशी साखळी पध्दतीने जोडलेली आहे. उत्पादन झालेला बव्हंशी शेतीमाल बाजारात विकला जातो. कारण तो सर्व उपभोक्त्यांची अन्नाची मूलभूत गरज भागवितो. तसेच कारखान्यांसाठी कच्चा माल पुरवितो. शेतीमालाच्या उत्पादनाच्या काही मूलभूत वैशिष्ट्यांचा मालाच्या विक्रीवर प्रभाव पडत असतो. म्हणून विपणनाचे विविध पैलू जाणून घेण्यासाठी या मूलभूत वैशिष्ट्यांचा परिचय करुन घ्यायला हवा.

शेतीमालाच्या उत्पादनाबाबत प्रादेशिक केन्द्रीकरणाची सामान्य प्रवृत्ती आढळते. तरीही सर्वच शेतीमालाचे उत्पादन विशिष्ट अथवा भिन्नभिन्न प्रदेशात मोठ्या प्रमाणावर विखुरलेले असते. प्रत्येक शेतकऱ्याचे उत्पादन एकूण उत्पादनाचा अतिशय लहान भाग असतो. जमिनीच्या पोतानुसार आणि निविष्टींच्या उपयोगानुसार वेगवेगळ्या शेतातील एकाच मालाची प्रत वेगवेगळी असते. शेतीतील उत्पादन निसर्गाच्या व्यवहाराशी निगडित असल्याने शेतीमालाचा पुरवठा मौसमी असतो आणि त्याचा परिणाम शेतीमालाच्या वर्षभरातील किंमतींवर होतो. तसेच निसर्गाच्या अनुकूलतेनुसार वा प्रतिकूलतेनुसार एकूण उत्पादनात चक्रीय बदलही घडतात. शेतीमाल नाशवंत स्वरुपाचा असतो; काही माल शीघ्रनाशी तर काही कालान्तरनाशी असतो. भारतासारख्या शेतीअधिष्ठित विकसनशील राष्ट्रात शेतीचे स्थान एक व्यवसाय म्हणून आहे, त्याचबरोबर कुटुंबाचा जीवनाधार म्हणूनही आहे. त्याकारणाने शेतीमालाच्या एकंदर उत्पादनावर जैविक, तंत्रवैज्ञानिक (technological), सामाजिक, राजकीय, आर्थिक, कौटुंबिक इत्यादी घटकांचा मिश्र परिणाम होत असतो. कुटुंबातील माणसांच्या मूलभूत गरजा भागविण्याचा अग्रक्रमाने विचार करतानाच बाजारासाठीही

शक्य तेवढे उत्पादन करण्यासाठी शेतकऱ्याची धडपड असते. म्हणजेच भारतासारख्या देशात शेती ही व्यवसाय घटक(business unit) आणि कुटुंबाची जीवनपध्दती (family unit) या दोन भूमिकांमधून कसली जाते. याचा परिणाम शेती उत्पादनव्यवस्थेच्या संरचनेवर होतो. शेतीतील बरीच गुंतवणूक स्थिर स्वरुपाची आणि उत्पादनपूर्व कालापासून केली जात असल्याने शेतीमालाचा पुरवठा अलवचिक राहतो आणि किमतीतील बदलांना कालान्तराने प्रतिसाद देतो.

### 2. उत्पादनाबरोबर विपणन व्यवस्थेचा विचार आवश्यक

शेतीमालाच्या उत्पादनाची खास वैशिष्ट्ये ध्यानात घेतल्यास असंख्य शेतात पिकलेला शेतीमाल त्याच्या असंख्य ग्राहकांपर्यंत पोचविण्यासाठी मालाचे संकलन, प्रमाणीकरण व प्रतवारी, साठवण, वाहतूक, प्रक्रिया, पतपुरवठा, इत्यादी सेवा कार्यक्षम रीतीने उपलब्ध करुन देण्याची नितांत गरज असते. शेतीमालाच्या विपणनव्यवस्थेचे हे अविभाज्य घटक आहेत. 'सुगीपश्चातचे तंत्रविज्ञान' (post-harvest technology) परिपूर्ण असणे आता निकडीचे बनले आहे. या व्यवस्थेच्या परिपूर्णतेवर आणि कार्यदक्षतेवर (efficiency) शेतकऱ्याला मिळणारा परवाना/प्रत्याय (returns) अवलंबून असतो.

शेतीमालाच्या विपणन व्यवस्थेत पूर्ण स्पर्धेला बराच वाव असला तरी प्रत्यक्षात ही व्यवस्था अनुसरणे शक्य नसते; कारण, उत्पादक शेतकऱ्याच्या विपणन प्रक्रियेतील दुर्बलतेमुळे त्याच्या मालाला योग्य परतावा मिळण्याचा संभव नसतो. त्यामुळे विपणन व्यवस्थेच्या मूळ उद्दिष्टांनाच काटशह बसतो. याकरिता शेतीमालाच्या मुक्त बाजाराऐवजी (free market) अंगीकृत उद्दिष्टपूर्तीसाठी अंशतः आणि/किंवा पूर्णतः सरकारी हस्तक्षेप असणारी व्यवस्था उदयाला आली आहे. तिला सहकारी विपणन व्यवस्थेची जोड देण्यात आली आहे.

शेती क्षेत्रातील उत्पादन आणि उत्पादित मालाची विपणन व्यवस्था यांचा परस्परांशी घनिष्ट संबंध आहे. शेतीमालाला योग्य भावाची हमी देणे, त्यातून भविष्यकालात उत्पादनवाढीची प्रेरणा शेतकऱ्यांमध्ये जागती ठेवणे, शेतीमालाचा पुरवठा अखंड आणि रास्त भावात ग्राहकांना होणे ही उद्दिष्टे बाजार व्यवस्थेच्या माध्यमातूनच साध्य करता येतात. कार्यदक्ष विपणन व्यवस्था ही कृषी उत्पादनवाढीचा मूलभूत आधार आहे. ती उत्पादकाला प्रेरणादायी असते तसेच अर्थव्यवस्थेच्या स्थैर्याला पोषक असते असा आपल्या देशाचा अनुभव आहे.

### 3. शेतीमाल विपणनाची सद्यःकालीन संरचना

भारतामध्ये शेतीमालाच्या प्रत्यक्ष विपणन प्रक्रियेशी निगडित असलेली व्यवस्था बहु-आयामी (Multi-dimensional) आहे.त्यामध्ये शासनाच्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभागाच्या यंत्रणांबरोबरच उत्पादक शेतकऱ्यांच्या सहकारी विपणन संस्था तसेच विविध पातळ्यांवर खाजगी व्यापारीही कार्यरत आहेत. प्रत्यक्ष सहभागात महाराष्ट्रातील कापूस एकाधिकार योजना, राज्य व्यापार महामंडळ, नाफेड यांचा उल्लेख करता येईल. विशिष्ट शेतीमालांसाठी स्वतंत्र वस्तू मंडळे (Commodity Boards) (जसे, Coffee Board, Tobacco Board,Coin Board, इत्यादी) कार्यरत आहेत. विनियमित बाजार (regulated markets) हे अप्रत्यक्ष सहभागाचे उदाहरण आहे. सहकारी क्षेत्रात विशिष्ट वस्तूंसाठी स्वतंत्र तसेच सर्वसाधारण स्वरुपाच्या सहकारी संस्थांची साखळी निर्माण झालेली आहे. उत्पादकांच्या मालकीच्या सहकारी प्रक्रिया संस्था(जसे, साखर

कारखाने, दुग्धशाला, सूत गिरण्या, फळ प्रक्रिया संस्था) यांनी उत्पादन व विपणनाची सांगड घातली आहे. खाजगी व्यापारी खेडेगावापासून ते मोठ्या शहरापर्यंत कार्यरत आहेत. कृषी परिव्यय आणि मूल्य आयोग 24 प्रमुख शेतीमालांच्या किमान आधार किमती निश्चित करुन त्यांची शिफारस केन्द्र सरकारला करते. शासन त्यावर निर्णय करुन योग्य वेळी किमान आधार किंमती जाहीर करते. ऊसाच्या बाबतीत केन्द्र शासनच किंमत रचना ठरविते. त्याला प्रशासित किंमत (administered price) म्हणतात. सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून सरकारच्या वतीने अन्न महामंडळाने प्राप्त केलेले गहू व तांदूळ दारिद्र रेषेखालील लोकांपर्यंत पोचविले जाते. शेतीमालाच्या निर्यातीसाठी राज्य व्यापार महामंडळ; नाफेड आणि वस्तू मंडळे यांच्याबरोबरच खाजगी व्यापारी संस्थाही सक्रिय असतात. APEDA चाही सहभाग असतो.

### 4. संस्थात्मक व्यवस्थेचा आजवरचा अनुभव

शेतकऱ्यांना शेतीमालाची विक्री करतांना भेडसावणाऱ्या प्रश्नांवरचा खात्रीशीर उतारा त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना मालाच्या उत्पादन खर्चावर आधारित किंमत मिळवून देण्याचा हमखास उपाय म्हणून महत्त्वाच्या शेतीमालाची एकाधिकार खरेदी राज्य शासनाने करावी अशी मागणी वेळोवेळी शेतकरी संघटनांकडून केली जाते. शासनाने देखील वेळप्रसंगी त्याला अनुकूल प्रतिसाद देऊन एकाधिकाराची जबाबदारी स्वीकारली. याबाबतीत संपूर्ण देशात महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे. शेतकऱ्यांकडून संघटितरीत्या अशा व्यवस्थेची मागणी येण्यापूर्वी महाराष्ट्राने एकाधिकार धान्य खरेदीचा प्रयोग एक दशकभर राबविला होता. त्यानंतर शेतीमाल उत्पादकांना दिलासा म्हणून गेल्या काही वर्षांपासून कापूस, गवत, तेंदू-पान आणि आदिवासी विकास क्षेत्रात धान्ये यांची एकाधिकार खरेदी केली जाते. यामध्ये महाराष्ट्रातील संस्थेने मोठ्या असलेल्या कापूस उत्पादकांच्यासाठी राबविली जाणारी कापूस एकाधिकार योजना ही संपूर्ण भारतातील केवळ एकाच राज्यात राबविली जाणारी योजना आहे. म्हणून तिचा थोडा अधिक विचार करण्याची गरज आहे. तो राज्यात एक जिव्हाळ्याचा विषय आहे.

धान्याची एकाधिकार खरेदी व्यवस्था अंतिम टप्प्यात असताना 1972-73 पासून महाराष्ट्र राज्य शासनाने स्वत:ला कापूस एकाधिकारात गुंतवून घेतले. कापसाला योग्य भाव मिळावा, मध्यस्थांचे उच्चाटन व्हावे, कापसाच्या उत्पादनाला चालना मिळावी, कापूस उत्पादनाचा पतपुरवठा, विपणन व प्रक्रिया यांच्याशी मेळ घालावा अशा बहुउद्दिष्टांनी प्रेरित होऊन प्रामुख्याने कापूस उत्पादकांच्या जबरदस्त दबावाखाली राज्य शासनाने ही जबाबदारी स्वीकारली. त्यासाठी केन्द्र सरकार आणि भारतीय रिझर्व्ह बँक यानी उपस्थित केलेल्या अनेक तांत्रिक अडचणींना तोंड देत असतानाच कापूस व्यापाऱ्यांनीही निर्माण केलेल्या दबावाला शासनाला सतत सामोरे जावे लागले. राजकीय आणि आर्थिक प्रतिकूलतेतून शासनाने ही योजना आजपर्यंत कशीबशी रेटली आहे खरी. तथापी, ती अजूनही राजकीय आणि आर्थिक दृष्ट्या स्थिरावलेली नाही. प्रथमत: 10 वर्षापुरतीच म्हणून निर्माण केलेली व्यवस्था 1981 नंतर सातत्याने दोलायमान स्थितीतच राहिलेली आहे. केवळ राजकीय कारणास्तवच त्यानंतरच्या काळात सर्वच केंद्र शासनांनी या योजनेला प्रत्येक वेळी वर्ष-दोन वर्षांचे अभयदान दिले असून आजमितीसही भविष्यकाल असाच अनिश्चित राहिलेला आहे. आर्थिकदृष्ट्या अडचणीचे प्रसंग तर अनेक वेळा उद्भवले. ही योजना एकंदरीने आतबट्ट्याचीच राहिली आहे.

देशात केवळ एकाच राज्याने कापूस एकाधिकार खरेदी योजना राबवावी याबद्दल इतर कापूस उत्पादक राज्ये नाराज आहेत. तर शासन देत असलेली हमी किंमत/अंतिम किंमत ही कमी आहे अशी शेतकरी संघटनांची भूमिका असल्याने उत्पादक वर्ग या किंमतीबद्दल समाधानी नाही. तसेच शेजारील राज्यात कापसाच्या किंमती वाढलेल्या असतात तेव्हा त्याचा फायदा कापूस उत्पादकांना घेता येत नाही. ही त्यांच्या मनातील खंत आहे. परिणामी राज्याच्या कापूस उत्पादन क्षेत्रातून एकूण उत्पादनाच्या साधारणत: 50 ते 60 टक्के कापूस बेकायदेशीरपणे शेजारच्या राज्यात पाठविला जातो आहे असा नित्याचा अनुभव आहे. राजकीय स्नेहसंबंधाच्या ठिसूळ पायावर आधारलेली विपणनाची ही व्यवस्था सातत्याने भविष्याच्या अनिश्चिततेच भरकटत राहणार हे स्पष्ट आहे.

काहीसा साकल्याने विचार केल्यास धान्याची एकाधिकार खरेदी धान्य टंचाईवर मात करण्यासाठी स्वीकारली होती आणि त्या व्यवस्थेत काही अंगभूत उणीवा होत्या तरी सरकारच्या दृष्टीने तो व्यवहार आतबट्ट्याचा झाला नाही. याउलट, त्यानंतरच्या एकाधिकारांची निर्मिती उत्पादकांच्या हितसंबंधाची जपणूक करण्यासाठी झालेली आहे आणि हे सर्व व्यवहार शासनाची तिजोरी हलकी करण्याला कारणीभूत होत आहेत. वर्षानुवर्षे हे असेच घडत राहणे कितपत योग्य आहे ? ही खरोखरच कल्याणकारी राजस्वनीती मानायची काय ? करदात्यांकडून सरकारी तिजोरीत जमा होणाऱ्या मर्यादित निधीची इतक्या सोळढाळपणे दरवर्षी विल्हेवाट लावण्यात नेमके कोणाचे हित साधले जाते? या योजनांतील उत्पादक वर्ग खरोखरच समाधानी आहे काय ? प्रश्न अनेक आहेत; उत्तर एकच आहे. सर्व एकाधिकार शेतीमाल खरेदी योजनांचा साकल्याने पुनर्विचार होण्याची निकड आहे. तो करताना एका गोष्टीचे आवर्जून भान राखले पाहिजे आणि ती म्हणजे कोणत्याही शेतीमालाची व्यापारी दृष्टिकोनातून खरेदी-विक्री करण्यासाठी आवश्यक असलेले कौशल्य आणि व्यापारी वृत्ती प्रशासकीय कामकाजासाठी उभ्या केलेल्या शासकीय यंत्रणेत नसते. त्यामुळे अशी यंत्रणा व्यापाराच्या जबाबदाऱ्या कार्यदक्षपणे पेलण्यास असमर्थ असते. यास्तव एक तर शासनाने या भानगडीत पडू नये अथवा काही अपरिहार्य कारणास्तव शेतीमालाच्या विपणनात हस्तक्षेप करण्याची गरज निर्माण झाल्यास शासकीय यंत्रणेची जबाबदारी कमीत कमी राहावी हे कटाक्षाने पाळावे. शेतीमालाची एकाधिकार खरेदी करणे ही एक टोकाची उपाययोजना अपरिहार्य परिस्थितीतच अंगीकारली पाहिजे.

आता विचार करु या किमान आधार किंमतींचा. शेतीमालाच्या मुक्त बाजारातील विविध घटनांमुळे शेतकऱ्यांच्या पिळवणुकीला पायबंद घालण्यासाठी गरजेनुसार किमान आधार किमतीच्या (minimum support price) साधनाव्दारे शासन शेतकऱ्यांना मदतीचा हात देते. महत्त्वाच्या निवडक शेतीमालांसाठी दरवर्षी किमान आधार किंमतींची शिफारस कृषी परिव्यय आणि किंमत आयोग केन्द्र सरकारला करते. त्यावर अंतिम निर्णय केन्द्र सरकारकडून घेतला जातो. किमान आधार किंमत ही एका परीने उत्पादकासाठी हमी किंमतच असते आणि ती संबंधित शेतीमालाचा हंगाम सुरु होण्यापूर्वी जाहीर होते. सुगीनंतर खुल्या बाजारातील किंमत या किंमतीपेक्षा खाली गेल्यास शासनाकडून आधार किमतीला तो शेतीमाल खरेदी करते. त्यामुळे उत्पादकाला एवढ्या किमतीची तरी शाश्वती असते. बाजारातील प्रत्यक्ष किंमत यापेक्षा अधिक असल्यास उत्पादकाला त्याचा फायदा घेता येतो.

याबाबतीत महाराष्ट्रात काय घडले आहे ?

महाराष्ट्रात किमान आधार किंमतींचा वापर ज्वारी, बाजरी व भात या धान्यांच्या खरेदीसाठी 1977-78 पासून अस्थायी पध्दतीने केला गेला आहे. शासनाचे प्रतिनिधी म्हणून योजनेची कार्यवाही महाराष्ट्र राज्य सहकारी विपणन महासंघ आणि महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ यांच्यामार्फत होते. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर आणि अहमदनगर या जिल्हयांत शेतकऱ्यांनी आधार किंमतीनुसार धान्य देऊ केल्यास जिल्हाधिकारी त्याची खरेदी करुन सर्व माल शासकीय गोदामात जमा करतात. हे जिल्हे आणि आदिवासी विकास क्षेत्र वगळता राज्याच्या उर्वरित प्रदेशात धान्य खरेदीची जबाबदारी विपणन महासंघ सांभाळतो. अशी व्यवस्था असली तरी ती उणिवांनीच भरलेली आहे. या धान्यांची प्रतिवर्षी नियमितपणे खरेदी होत नाही; त्यात वर्षानुवर्षे खंड पडतो. खरेदीमध्ये अधिक भर ज्वारीवरच आहे; तोही काळ्या ज्वारीची समस्या उद्‌भवते तेव्हाच. बाजरीची खरेदी अल्पांशानेच कधीतरी तर भाताची खरेदीही कधीतरी तोकडीच. होणारी खरेदी विक्रीत वाढाव्याच्या (Marketed surplus) जेमतेम टक्का दोन टक्के एवढीच ! याचा अर्थ, बहुसंख्य शेतकरी या धान्यांच्या चढत्या किंमतींचा फायदा घेण्यासाठी आपल्याकडील वाढावा खुल्या बाजारात विकणे पसंत करतात; आधार किंमती त्याना किफायतशीर वाटत नाहीत. आपल्याकडील हलक्या प्रतीचा माल (उदाहरणार्थ, काळी ज्वारी) विकण्यासाठी मात्र त्यांना आधार किंमती उपयुक्त वाटत असाव्यात !

आधार किमतीच्या योजनेत गेल्या 25 वर्षात कांद्याचाही समावेश केलेला आहे. 1978-79 पासून त्याची सुरुवात झाली खरी. परंतु हा उपक्रमदेखील सातत्याने न चालविता अडचणीच्या काळातच अनियोजित पध्दतीने, आणि कित्येकदा तर, अत्यंत घाईगडबडीने राबविला गेला. विपणन महासंघ आणि नाफेड यांच्या मदतीने खरेदीची कार्यवाही होत राहिली. कांद्याच्या उत्पादनाच्या बाबतीत आवश्यक ते नियोजन करण्याकडे ना शासनाचे लक्ष ना शेतकरी संघटनेचे ! त्यामुळे अधुनमधुन नाशिक व पुणे जिल्ह्यातील कांदा सर्वांच्याच डोळ्यात पाणी आणतो !

सार्वजनिक वितरण व्यवस्था हा शेतीमाल बाजार व्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग मानला जातो. अन्न महामंडळाच्या माध्यमातून धान्य खरेदी, धान्यांचा शिलकी साठा (buffer stock) आणि रास्त भाव दुकानांमधून त्यांचे वितरण अशी रचना आहे. ही व्यवस्था भारतात तीन प्रकारे कार्यान्वित आहे. (1) सर्वसाधारण व्यवस्था, (2) सुधारित व्यवस्था आणि (3) पश्चिम बंगालच्या काही भागात असलेली विधिसिध्द वितरण व्यवस्था. सार्वजनिक वितरण व्यवस्था ही विशेषत: दारिद्र्य रेषेखाली लोकांच्या भल्यासाठी आहे. तिच्या कार्यवाहीतील काही त्रुटी दूर करण्याची आवश्यकता आहे.

सहकारी विपणन संस्था या भारताच्या शेतीमाल विपणन व्यवस्थेचा दीर्घकाळ अस्तित्वात असलेला एक महत्त्वाचा घटक मानला जातो. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रात शेतीमालाच्या विपणन व्यवस्थेला संस्थात्मक स्वरुप देण्यात जेवढी प्रगती होईल तेवढी विपणन व्यवस्था अधिकतर स्थायी स्वरुप धारण करु शकेल. त्या दृष्टीने सहकारी विपणन व्यवस्थेला विशेष महत्त्व आहे. सहकारी संस्था या खाजगी व्यापाराला एक परिणामकारक पर्याय म्हणून पुढे येऊ शकतात. तसेच विनियमित बाजारांच्या यशात त्या विशेष योगदान देऊ शकतात. त्या शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष संपर्कात असल्यामुळे त्यांच्याकडील शेतीमाल एकत्रित करुन, मालाची प्रतवारी करुन आणि साठवणुकीच्या सुविधा देऊन किफायतशीर किंमतींना मोठ्या प्रमाणावर मालाची

विक्री करु शकतात. जर या संस्थांनी विक्रेय मालापैकी मोठ्या हिश्श्यावर कब्जा मिळविला तर पुरवठ्याचे योग्य विनियमन करुन त्या माध्यमातून शेतीमालाच्या किंमतीची अपेक्षित उंची निर्माण करु शकतील.

देशातील सहकारी विपणन संस्था या अपेक्षांपासून खूप दूर आहेत. कारण, त्यानी शेतकरी वर्गाला फारसे व्यापले नाही. शेतकऱ्यांमध्ये त्यांच्याविषयी फारशी आस्था नाही. शेतीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यापुरताच संबंध, सामान्यतः त्यानी या संस्थांशी ठेवलेला दिसतो. त्यामुळे त्यांच्याकडील अधिकतर मालाची विक्री खाजगी व्यापाऱ्यांच्या माध्यमातूनच होत असते. अशी विक्री करणे त्यांच्या दृष्टीने अधिक सोईस्कर असते. त्याचप्रमाणे या संस्थांच्या बाबतीत शेतीसाठीच्या निविष्टींचा पुरवठा आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील ग्राहकोपयोगी वस्तूंची विक्री या बाबीच प्रमुख बनल्या असून शेतीमालाचे विपणन करण्याची प्राथमिक जबाबदारी दुय्यम बनली आहे. या संस्थांनी व्यापारी धोरणे अनुसरुन शेतीमालाच्या उलाढालीकडे जास्त लक्ष द्यायला हवे. ही जबाबदारी पार पाडण्यात या संस्था मागे राहिल्या तर व्यापारी वर्गाच्या मगरमिठीतून शेतकऱ्याला सोडविण्यात आणि त्याच्या मालाला योग्य भाव मिळवून देण्यात इतर योजनाही अपेक्षित यश देऊ शकणार नाहीत.

शेतीमालाच्या विक्रीमध्ये शेतकऱ्याला चांगल्या परताव्याची शाश्वती मिळायची असेल तर ज्या मालावर प्रक्रिया करणे शक्य आहे त्यासाठी प्रक्रिया संस्थांची निर्मिती व्हायला हवी. त्यामुळे शेतीमालाचे उत्पादन आणि विपणन यांची उत्तम सांगड बसेल. साखर कारखाने हे याचे उत्तम उदाहरण आहे. कापूस, फळे व भाजीपाला, तेलबिया, कडधान्ये, अशा पिकांच्या बाबतीत हे शक्य आहे. यातून मूल्यवर्धनाचे (value addition) तसेच निश्चित बाजाराचे फायदे उत्पादकांना मिळतील. जागतिकीकरणाच्या प्रचलित वातावरणात कृषी-उद्योगाना वाढीसाठी चांगला वाव आहे.

विनियमित बाजार (regulated markets) ही शेतीमाल विपणनातील महत्त्वाची व्यवस्था देशात शतकभर कार्यरत आहे. परंतु कृषीमाल बाजारांनी ठराविक चाकोरीबाहेर जाण्याचे टाळले आहे. बाजार आवारे स्थापन झाली खरी, परंतु काही अपवाद वगळता, बहुसंख्य आवारांमध्ये पुरेशा आणि सुस्थितीतील पायाभूत सुविधा अभावानेच आढळतात. बऱ्हंशी शेतीमालाची प्रतवारी न लावताच विक्री होते. वजनमापात लबाडी होण्याच्या तक्रारी सातत्याने येतात. लहान शेतकरी आवारांच्या कुंपणाबाहेरच आहे. थोडक्यात, या आवारांमध्ये कृषीमाल विपणनासाठी शिस्त लावण्याचे कार्यही पूर्ण कार्यदक्षतेने होत नाही. बहुसंख्य बाजार समित्या या बाजार शुल्क जमा करणाऱ्या संस्थाच राहिल्या आहेत. जागतिकीकरणाच्या आणि उदारीकरणाच्या नव्या जमान्यात त्यांची उपयुक्तता वाढावयाची असेल तर त्याना आपल्या कार्यात आणि कार्यपध्दतीत आमूलाग्र बदल करावे लागतील. त्यादृष्टीने देशात विचार व्हायला हवा. बाजाराचे 'विनियमन' एवढीच मर्यादित भूमिका न राखता बाजाराचा 'विकास' करण्याचे माध्यम म्हणून त्याना पुढे यावे लागेल.

### 5 भविष्याकडे दृष्टिक्षेप :

वरील सर्व विश्लेषणातून स्पष्ट होते की, संपूर्ण भारतातील कृषी विपणन व्यवस्था शेतीमालाच्या विपणनाच्या गरजा समाधानकारकपणे भागवू शकत नाही. महाराष्ट्रात तर उपलब्ध वितरण व्यवस्थेत प्रादेशिक असमतोल प्रकर्षाने जाणवतो. त्यामुळे प्रचलित विपणन व्यवस्थेत काही मूलगामी बदल करण्याची निकड आहे. वाढत्या लोकसंख्येला पोसण्यासाठी आणि अन्न सुरक्षिततेसाठी, कृषी-उद्योगांना पुरेसा कच्चा माल पुरविण्यासाठी,

दारिद्र्याची तीव्रता कमी करण्यासाठी, अधिक रोजगार निर्मितीसाठी, तसेच शेतीमालाची निर्यात वाढविण्यासाठी याची गरज आहे.

शेतीमालाच्या बाबतीत पूर्णपणे मुक्त बाजार शेतकऱ्याला न्याय देऊ शकत नाही हे स्पष्ट आहे. याचे दुसरे टोक म्हणजे सरकारचा एकाधिकार. त्याचाही अनुभव समाधानकारक नाही. कारण, सरकारी व्यापारात, व्यापाराची जबाबदारी घेणारी शासकीय यंत्रणा मूलत: प्रशासकीय कामासाठी प्रशिक्षित केलेली असते. त्यातील व्यक्तींमध्ये उद्योजकतेचा अभाव असतो. ती यंत्रणा वेळ प्रसंगानुसार कोणत्याही शेतीमालाच्या विपणनासाठी वापरली जाते. यंत्रणेतील कोणालाही नफा-नुकसानीचे सोयरसुतक नसते. यंत्रणेला भ्रष्टाचाराची कीड लागलेली असते आणि शासनकर्त्यांना फक्त राजकीय सोय म्हणून या उपक्रमांचा पाठपुरावा करायचा असतो. शेतीमालाचा व्यापार करणे हे एकट्या शासनाकडून जमणारे नाही. वास्तव शेतकऱ्यांच्या कल्याणाच्या नावाखाली कोणत्याही शासनाने संपूर्ण एकाधिकाराच्या मोहात पडून सरकारी तिजोरीतील पैशाची निरर्थक उधळपट्टी न करणे बरे. शेतीमालाच्या विपणनासाठी आर्थिकदृष्ट्या सक्षम, कामकाजाच्या दृष्टीने सक्रिय आणि इष्ट परिणामाच्या दृष्टीने गरजेइतके कायद्याचे नियंत्रण असणारी संस्थात्मक व्यवस्था निर्माण करणे फायद्याचे ठरेल. व्यवस्था कसलीही असली तरी तिच्या सुव्यवस्थित कार्यवाहीसाठी शासनाचे पाठबळ अनिवार्य आहे.

एकाधिकारातून शेतकऱ्याला मुक्त केल्यास तो बाजारातील जास्त किंमतीचा लाभ उठवू शकेल आणि बाजारातील आपत्तीच्या काळात आधार किंमतीचा आश्रय घेऊ शकेल. या व्यवस्थेमुळे बाजारातील एखाद्या वस्तूंचा संपूर्ण साठा खरेदी करून त्याची व्यवस्था लावण्याची प्रचंड मोठी जबाबदारी शासनावर पडणार नाही. त्यातील बरीच जबाबदारी अनेक व्यापारी उचलतील. त्यामुळे शासनावरील बोजा खूपच हलका होईल. शासनाने खरेदी केलेल्या मालाची व्यवस्था कशी करावयाची याचा अधिक वास्तववादी निर्णय शासन करु शकेल. यासाठी शासनाने संबंधित शेतीमालाच्या विपणनातील जाणकारांचे सहकार्य घेऊन एक संयुक्त क्षेत्रातील (joint sector) विपणन संस्था स्थापन करावी. इथे सरकारी व खाजगी क्षेत्रे एकत्रित आलेली असतील. यामुळे शासकीय व्यवस्थेच्या अज्ञानी कारभाराला बगल मिळेल त्याचप्रमाणे व्यापारी कौशल्याची सर्व निर्णयांना जोड मिळेल. संस्थेत व्यापाऱ्यांचेही हितसंबंध गुंतल्याने ती संस्था फायद्यात चालण्याबद्दल ते दक्ष राहतील. अशी संस्था बाजारामध्ये खाजगी व्यापाऱ्यांची स्पर्धक म्हणून काम करेल.

सहकारी विपणन संस्था या शेतकऱ्यांसाठी निकटच्या संस्था ठरावयाला हव्यात. गावोगावी प्राथमिक संस्था आढळतात खऱ्या, परंतु त्या शेतीमाल विपणनाच्या बाबतीत बऱ्याच उदासीन आहेत. त्यांनी आता सक्रिय बनायला हवे आहे. एवढेच नव्हे तर जुनी कात टाकून नवा अवतार धारण करायला पाहिजे. गावागावातील लहान लहान संस्थांनी एकत्रित येऊन जिल्हा विपणन संघाच्या अधिपत्याखाली काम करायचे. जिल्हा संघाने व्यापारी दृष्टिकोनातून शेतीमालाची उलाढाल करण्यासाठी शेतकरी सभासदांकडील शेतीमालाचे संकलन व प्रमाणीकरण करुन तो माल मोठ्या प्रमाणात विनियमित बाजारात विकायचा. जोखीम टाळण्यासाठी कमिशनवर हे काम करायचे. काही माल शेतकऱ्यांकडून खरेदीही करता येईल. गावागावातील सक्रिय विपणन संस्थांनी आपापल्या परिसरातील लहान शेतकऱ्यांचा माल संकलित करावा आणि जिल्हा संघाकडे पाठवावा. यातून लहान शेतकरी गावातल्या व्यापाऱ्याच्या

कचाट्यातून बाहेर पडेल. दूध संकलनाच्या पध्दतीने लहान शेतकऱ्याचा माल संकलित करावा. सहकारी संस्थांनी आणि जिल्हा संघाने मालाची साठवणूक आणि स्वीकारलेल्या मालापोटी अग्रिम रक्कम देण्याची व्यवस्था केल्यास शेतकऱ्याला गावातील व्यापाऱ्याकडे कमी किंमतीला आपला माल विकावा लागणार नाही. हे सारे परिणामकारक रीतीने करण्यासाठी सहकारी जिल्हा संघांचा आकार वाढला पाहिजे. त्यानी व्यापारी वृत्ती धारण करुन तज्ज्ञ माणसांकडे कारभार सोपविला पाहिजे. नव्या व्यवस्थापन पध्दती स्वीकारल्या पाहिजेत. प्रसंगी शेतीमालाची साठवणूक, वाहतुक, प्रतवारी, वित्तपुरवठा, बाजाराची माहिती या सेवांबरोबरच शेतीमालाच्या प्रक्रियेची सांगडही घातली पाहिजे. सहकारी संस्थांना जागतिकीकरण व उदारीकरणाच्या नव्या परिस्थितीत एक प्रभावी स्पर्धक म्हणून स्वत:चे अस्तित्व निर्माण करणे आता अपरिहार्य आहे. स्वाहाकारासाठी सहकार ही वृत्ती यातील धुरंधरांनी बदलली तरच नव्या रुपातील मोठ्या आकाराच्या सहकारी विपणन संस्था या शेतकऱ्यांना संजीवनी प्राप्त करुन देऊ शकतील, अन्यथा नाही.

पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे विनियमित बाजारांचाही कायापालट करुन त्यांना 'विकास संस्था' (Development Agency) बनवायला हवे. यासाठी देशातील सर्व बाजार समित्यांच्या कामाचे आणि प्रगतीचे पुनर्विलोकन (Review) करुन त्यांच्या नव्या वाटचालीचा आराखडा बनवावा लागेल. बदललेल्या आर्थिक धोरणांच्या पार्श्वभूमीवर याची नितांत गरज आहे.

विनियमित बाजारांनी आपल्या आश्रयाखाली दररोज ग्राहक बाजार (consumer market) तीन-चार तासांपुरता भरवावा. लहान शेतकरी आपला अल्प माल इथे आणतील आणि सरळसरळ ग्राहकांना विकतील. इथे खरेदी-विक्रीसाठी व्यापाऱ्यांना मज्जाव असावा. शेतीमाल अल्प असला तरी तो रास्त भावात रोखीने विकला जाईल. असा बाजार लहान शेतकऱ्यांना वरदान ठरेल. इथे बाजार समितीची शिस्त असल्याने लहान शेतकरी निश्चिंत राहील.

गावोगावच्या शेतकऱ्यांनी विशेषत: फळे व भाजीपाला किफायतीरपणे विकला जाण्यासाठी आठदहा अथवा अधिकांचा परस्पर साहाय्यता गट स्थापन करावा. या गटाने उत्पादनाचे नियोजन करावे. चांगल्या प्रतीचा माल पिकवावा आणि त्याच्या किफायतशीर विक्रीसाठी मोठया हॉटेलांशी संधान बांधावे. ते बारमाही गिऱ्हाईक होईल. कोणाही मध्यस्थाविना हमखास विक्री करता येईल. त्यानी माल पुरवठ्याचे वेळापत्रक मात्र चोखपणे सांभाळले पाहिजे. त्याना राष्ट्रीय आणि राज्य महामार्गावर मोक्याच्या ठिकाणी आपले किरकोळ विक्रीचे अस्थायी दुकान थाटता येईल. बस व मोटारीने जाणाऱ्या प्रवाशांचा आश्रय त्याना मिळतो असा अनुभव आहे.

जागतिकीकरणाच्या रेट्याखाली आता जगातील बाजार शेतीमालासाठीही खुले झाले आहेत. त्या बाजारांचा मागोवा घेऊन आपला शेतीमाल गरजेनुसार प्रक्रिया करुनही त्या बाजारात विकणे आता शक्य झाले आहे. तथापि, तिथे तीव्र स्पर्धा करावी लागते. तसेच जगाच्या बाजारातुनही भारतात शेतीमाल येऊ लागला आहे. त्यांच्याशी आपल्या मालाला दर्जा आणि किंमत या दोन्ही बाबतीत स्पर्धा करुन टिकून राहावे लागणार आहे. यासाठी शेतकऱ्यानी स्वत:च्या संयुक्त - निधी संस्था (Joint-stock companies) स्थापन करायला हव्यात. त्यांचा कारभार व्यापारी पध्दतीने आणि व्यवस्थापनाचे आधुनिक तंत्र वापरुन केला पाहिजे. केन्द्र शासनानेही शेतीमालांच्या निर्यातीसंबंधी काही ठोस धोरणे आखून त्यातील अस्थायीपणा काढून

टाकून सातत्य राखले पाहिजे. याचा परिणाम शेतीमालाच्या देशांतर्गत किंमतीवर चांगला होऊ शकतो.

एक प्रकर्षाने आढळणारी गोष्ट. आकाशवाणी आणि दूरदर्शनवर दररोज शेतकऱ्यांसाठी विशेष कार्यक्रम सादर होतात. सर्व कार्यक्रम हे शेतीमालांचे उत्पादन कसे वाढवावे याबद्दलच सांगत असतात. उत्पादनाचे फलित हे विपणातून मिळणारे असते ही वास्तवता ध्यानात घेतल्यास विपणनाविषयी माहिती देणारे विशेष कार्यक्रम सादर व्हायला हवेत. अशा कार्यक्रमांचे या दोन्हीही परिणामकारक प्रसार माध्यमांना वावडे का असावे ? ही उपेक्षा वर्षानुवर्षे चालू आहे. विपणनाविषयी शेतकऱ्यांना सातत्याने प्रबोधन होण्याची गरज आहे.

शेतीमालाच्या विपणन प्रक्रियेवर परिणाम घडविणारा एक बाह्य घटक म्हणून शेतकऱ्यांच्या संघटनांचा आणि त्यांच्या धोरणांचा विचार आवश्यक ठरतो. महाराष्ट्रात शरद जोशींच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघटना स्थापन झाली. सुरुवातीच्या कालखंडात (1980 च्या दशकात) त्यांच्या उत्पादन परिव्ययावर आधारित किंमत या एककलमी कार्यक्रमाने राज्यातील शेतकरी वर्गाचे प्रबोधन करुन एक चळवळ उभी केली. त्यामुळे शेतकरी वर्गात एक नवे चैतन्य निर्माण झाले. ही त्यांच्या आंदोलनाची जमेची बाजू. तथापि अपेक्षित किंमत शासनाने द्यावी असा त्यांचा आग्रह असायचा. शासनही तडजोड म्हणून कधीकधी मागण्या मान्य करुन निभाऊन न्यायचे. महाराष्ट्र बाहेरही याच धर्तीवर शेतकऱ्यांच्या संघटना स्थापन झाल्या आणि त्यानीही प्रसंगोपात आंदोलन छेडली. एवढे सारे घडूनही शेतकऱ्यांच्या संघटनांनी शेतकऱ्यांच्या हितसंवर्धनासाठी संस्थात्मक उभारणीकडे कधीच लक्ष दिले नाही. खरे तर सहकारी विपणन संस्था आणि विनियमित बाजार या दशकानुदशके अस्तित्वात असणाऱ्या संस्थांना बळकटी देऊन त्या माध्यमातून शेतीमालाला रास्त भाव मिळवून देणे त्यांना सहज शक्य झाले असते. ती स्थायी स्वरुपाची व्यवस्था निर्माण झाली असती. पाठीशी उभ्या राहिलेल्या शेतकऱ्यांमध्ये या संस्थांबद्दल आस्था निर्माण करुन त्यांच्या माध्यमातून शेतीमाल विकण्यासाठी प्रवृत्त केले असते तर आजच्यासारखे शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांचे विदारक चित्र निर्माण झाले नसते ! परंतु शेतकरी संघटनांच्या नेत्यांना अशा जबाबदाऱ्यात अडकून पडायचे नव्हते ही गोष्ट स्पष्ट आहे. त्यांनी संस्थांच्या रचनात्मक कार्याकडे हेतु पुरस्सर कानाडोळा केला आणि शेतकरी वर्गाला अर्ध्या वाटेवर सोडले. विशेष म्हणजे, 1991 ला उदारीकरणाचे धोरण भारताने स्वीकारल्या नंतर याच नेत्यांनी शेतीमालाच्या मुक्त व्यापाराचा निनाद सुरु केला. थोडक्यात, त्यांच्या धोरणात स्थैर्य नव्हते आणि कृती केवळ आंदोलनाची होती. यामध्ये शेतकरी मात्र संपन्न झाला नाही ! शेतकरी संघटनांनी यापुढे तरी स्थायी आणि भरीव कार्याकडे लक्ष द्यावे.

भारताला उदारीकरणाच्या नव्या परिस्थितीचे फायदे मिळवायचे असतील तर शेती क्षेत्राच्या सुबत्तेकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. त्याकरीता शेतीमालाची विपणन व्यवस्था कार्यदक्ष राहील हे कटाक्षाने पाहावे लागेल.

(मा.ध. पालेशा वाणिज्य महाविद्यालय, धुळे राज्यस्तरीय चर्चासत्र 23 आणि 24 डिसेंबर 2004 - बीजभाषण, )

✦✦✦

# मूल्यवर्धित कर व त्याची अंमलबजावणी

✦ आ. गो. पुजारी, सांगोला.
*प्राचार्य, सांगोला महाविद्यालय, सांगोला.*

## 1. प्रास्ताविक

### 1.1 नवीन आर्थिक सुधारणेचे पर्व

विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात आर्थिक सुधारणांचे पर्व सुरू झाल्याने. जागतिकीकरण, खाजगीकरण, आर्थिक खुलेपणा हे शब्द अधिक रूढ झाले. भारताने 1991 मध्ये नवीन आर्थिक सुधारणा अमलात आणण्यास सुरूवात केली. भारतात मुबलक नैसर्गिक साधन संपत्ती व मनुष्यबळ असताना देखील त्याला साजेल अशी आर्थिक प्रगती आपण साध्य करू शकलो नाही. समाजवाद रूजविण्याच्या प्रक्रियेमध्ये स्पर्धेची जागा लोककल्याणाने घेतली. परंतु स्पर्धेतच लोककल्याण अधिक असते या अर्थशास्त्राच्या सिद्धांताकडे दुर्लक्ष करण्यात आले.

उपभोक्त्याला आवश्यक असणाऱ्या सर्ववस्तु त्याला दर्जेदार स्वरूपात, पुरेशा प्रमाणात, रास्त किमतीस व वेळेवर मिळाल्यास खऱ्या अर्थाने उपभोक्ता हा अर्थव्यवस्थेचा राजा ठरेल. परंतु भारतात गेल्या पन्नास वर्षाच्या काळात कल्याणकारी अर्थव्यवस्था राबवित असताना पुरेशा उत्पन्नाची तरतूद न करता अनेक जबाबदाऱ्या शासनाने आपल्या अंगावर घेतल्या आणि त्या वाढत्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्याच्या प्रयत्नातूनच उत्पन्नाचे अनेक मार्ग अवलंबिण्यात आले. त्यात सार्वजनिक उद्योगांचा नफा वाढविणे, परदेशातून कर्ज काढणे, नवीन चलन छापणे, कराचे दर वाढविणे इत्यादी पर्याय स्वीकारण्यात आले. परंतु यातील पहिल्या तीन मार्गांनी पुरेसे उत्पन्न मिळविण्यामध्ये निश्चितच मर्यादा असल्याने वाढीव उत्पन्नासाठी सरकारला कराचा मार्ग हक्काचा व सोयिस्कर वाटतो. गेल्या

40-50 वर्षाच्या काळात हक्काचा हा मार्ग अनिवार्य म्हणून वापरत असताना अनेक जुन्या करांचे दर वाढले आणि अनेक कर नव्याने रूजू झाले. परंतु या सर्व करांचा बोजा अंतिमत: ग्राहकोपयोगी वस्तुवर पडून त्यांच्या किंमती गगनाला भिडताना दिसतात. या पार्श्वभूमीवर असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही की, येथे ग्राहक हा राजा या विचाराला निश्चितच बगल देण्यात आली.

नवीन आर्थिक धोरणाची संकल्पना तशी व्यापक आहे. त्यात अर्थव्यवस्थेतील विविध टप्प्यांवरील आर्थिक बदल व अनेक सुधारणा दडलेल्या आहेत. मनमोहनसिंग हे भारताचे अर्थमंत्री असताना या नवीन आर्थिक धोरणाच्या पर्वाची सुरूवात झाली. त्यावेळी या संकल्पनेतील सर्व पैलू/ विचार एकदमच अंमलात न आणता टप्प्याटप्प्याने एकेक विचार अंमलात आणण्याची भूमिका स्वीकारली होती. त्याचाच एक भाग म्हणून आज देशातील कररचने विषयी जो नव्याने विचार सुरू झाला त्याचाच एक भाग म्हणजे मूल्यवर्धित कर रचना होय. अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी 01 एप्रिल 2005 पासून ही नवीन कर रचना अंमलात आणण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला.

### 1.2 मूल्यवर्धित रचनेचा इतिहास

मूल्यवर्धित कररचनेचा इतिहास तसा बराच जुना आहे. 1921 मध्ये एफ. व्हॉन. सिमेन्स याने जर्मनीमध्ये उलाढाली कर (टर्न ओव्हर टॅक्स) सुरू केला. 1954 मध्ये मूल्यवर्धित कर लागू करणारा फ्रान्स हा युरोप मधील पहिला देश होय. इंग्लंडने 1980 मध्ये मूल्यवर्धित कर स्वीकारला. स्वित्झरलँड मध्ये 1995 साली ही करप्रणाली लागू करण्यात आली. विशेष म्हणजे जागतिक स्तरावरील आर्थिक सुधारणेच्या मोहिमेत उशीरा येऊन रूजू झालेल्या चीनने 1994 पासून मूल्यवर्धित कररचना अंमलात आणली. आपल्या शेजारील श्रीलंका, पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश या देशांनी आपल्या अगोदर ही करप्रणाली स्वीकारली. आज जवळ जवळ 126 देशांनी मूल्यवर्धित करप्रणाली स्वीकारली आहे.

भारतात या प्रणालीची अंमलबजावणी होण्यास खूप उशीर झाला हे निश्चित. परंतु प्रत्यक्षात अंमलबजावणीला जरी 2005 साल उजाडले असले तरी या विषयीचे विचारमंथन 15-20 वर्षापासून सुरू होते. 1991 मध्ये केंद्र सरकारने राजा चेलिया यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या कर सुधारणा समितीने दिलेल्या अहवालात सध्याच्या कर पद्धतीतील पळवाटा व त्यातील त्रुटी दूर करून खऱ्या अर्थाने समाजाला चांगल्या सेवा देता याव्यात व शासनाला अधिक महसूल मिळावा या विचाराने भारतातील कररचनेत जे आमूलाग्र बदल सुचविले होते त्यात अनेक ठिकाणी केंद्र व राज्य सरकारच्या स्तरावरील जुन्या करपद्धतीत मूल्यवर्धित कर हा नवीन पर्याय सुचविला होता.

यापूर्वी केंद्र सरकारने उत्पादनशुल्कावर (एक्साईज) मूल्यवर्धित कर लागू केला होता. 1986 मध्ये सुधारित मूल्यवर्धित कर (Modified Value Added Tax) लागू केला. 2000-01 मध्ये त्याचे केंद्रीय मूल्यवर्धित कर Central Value Added Tax या नावात रूपांतर केले. केंद्र सरकारला मूल्यवर्धित कर धोरण राबविण्याचा एवढाच अनुभव आहे.

गेल्या अनेक वर्षापासून अनेक राज्य सरकारांनी आपापल्या राज्यातील उत्पादकांना आणि उपभोक्त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी करात (विशेष म्हणजे विक्रीकरात) अनेक सवलती दिल्याने व नवीन गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी दिलेल्या सवलतीमुळे राज्या-राज्यातील व्यापार तसा विस्कळीत झाला होता. तेंव्हा हा व्यापार सुरळीत करण्यासाठी राज्यांच्या कर दरात समानता

आणण्यासाठी व राज्य सरकारचा महसूल वाढविण्यासाठी चर्चा करण्याच्या उद्देशाने केंद्राच्या नेतृत्वाखाली 1995 मध्ये सर्व राज्यांच्या अर्थमंत्र्यांची एक बैठक बोलाविण्यात आली होती. राज्य सरकार आकारित असलेल्या करामधील विविधता टाळून एकसंघता आणण्याचे पर्याय शोधण्याच्या मानसिकतेत हे सर्व अर्थमंत्री होते. हाच धागा पुढे घेऊन त्यानंतर अर्थमंत्र्यांच्या अनेक बैठका झाल्या. त्यातूनच विक्रीकररचनेला पर्याय म्हणून मूल्यवर्धित कर लागू करता येईल का या विषयी तपशिलवार विवेचन करण्यासाठी पश्चिम बंगालचे अर्थमंत्री मुसीम दासगुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली विशेष अधिकार समिती नेमण्यात आली. या समितीने राज्यातील विक्रीकराला पर्याय म्हणून मूल्यवर्धित कर पद्धती लागू करण्यासाठी झालेल्या अनेक बैठकांनंतर श्वेतपत्रिका काढून आपला अहवाल सादर केला आणि तात्त्विक दृष्ट्या सर्व राज्यांनी विक्रीकराला पर्याय म्हणून मूल्यवर्धित कर लागू करण्यास सहमती व्यक्त केली. परंतु एवढ्यानेच काम भागणारे नव्हते. या नवीन कर पद्धतीला साजेल असे कायद्यातील बदल व पूरक कायदे करणे आवश्यक होते आणि त्यादृष्टिने पुरेशी तयारी झाली नव्हती. म्हणून गेली पाच सहा वर्षे मूल्यवर्धित कर विषयक चर्चा सुरू राहिली आहे. शेवटी पी. चिदंबरम यांनी एक श्वेतपात्रिका काढून एक एप्रिल 2005 पासून सर्व राज्यात ही नवीन करप्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला.

संविधानानुसार विक्रीकर हा राज्य सरकारच्या अखत्यारितील कर असून त्या जागी मूल्यवर्धित कर आणण्यासाठी राज्यांना त्या संबंधी पूरक कायदे करून तो राबवावयाचा आहे. केंद्र सरकार येथे केवळ मार्गदर्शकाची भूमिका बजावणार आहे.

महाराष्ट्राचा मूल्यवर्धित कर 2002 यातील विक्रीकर विभागाने सुचविलेले नियम विशेषाधिकार समितीने ने प्रसिद्ध केलेली श्वेतपत्रिका यांच्या आधारे 01 एप्रिल 2005 रोजी महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायदा अस्तित्वात आला.

## 2 मूल्यवर्धित कर : अर्थ व व्याख्या

### 2.1 मूल्यवर्धन

वस्तु एकाच टप्प्यात तयार होत नसून ती उत्पादनाच्या अनेक टप्प्यातून जात जात शेवटी ग्राहकोपयोगी बनते. म्हणजेच प्रत्येक टप्प्यात वस्तु उत्पादित होत असते. यालाच उत्पादनाची प्रक्रिया असे म्हणतात. या प्रत्येक टप्प्यातील प्रक्रियेत त्या कच्च्या मालाचे स्वरूप बदलते त्यात उपयोगितेचे गुण वाढत जातात. म्हणूनच ती संबंधित वस्तु एका टप्प्यातून दुसऱ्या टप्प्यात विकली जात असता पहिल्या टप्प्यापेक्षा जे अधिक मूल्य (किंमत) आकारले जाते त्याला मूल्यवर्धन असे म्हणतात. म्हणून उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यातील विक्रीमूल्य व खरेदीमूल्य यांच्या फरकास मूल्यवर्धन म्हणतात.

वस्तुच्या किंवा सेवेच्या विक्री टप्प्यावर होणाऱ्या विक्रीमूल्याच्या वाढीवर आकारला जाणाऱ्या विक्रीकर म्हणजे मूल्यवर्धित कर होय.

कराचा अंतिम बोजा शेवटच्या ग्राहकावरच पडत असल्याने मूल्यवर्धित कर अनेक बाबतीत शेवटच्या टप्प्यावरील किरकोळ विक्रीकराइतका असतो.

## 3. मूल्यवर्धित कराची कार्यपद्धती

मूल्यवर्धित कर हा मुळात नवीन कर नसून जुनाच कर नवीन पद्धतीने आकारून नवीन पद्धतीने गोळा करण्यासाठी अंमलात आणलेली एक नवीन व्यवस्था आहे. जुनी विक्रीकर पद्धती व नवीन मूल्यवर्धित कर यांची आकारणी व संकलन एका काल्पनिक उदाहरणाच्या सहाय्याने एकत्र मांडल्यास

या दोहोतील फरक स्पष्ट करण्या बरोबरच मूल्यवर्धित कराची कार्यपद्धती अधिक नीटपणे समजून घेता येईल.

### 3.1 विक्रीकर आकारणी

उत्पादनाच्या कोणत्यातरी एका (शक्यतो पहिल्या)टप्प्यावर विक्रीकर आकारला जातो. नंतर ते उत्पादन घाऊक व्यापाऱ्याकडे, घाऊक व्यापाऱ्याकडून किरकोळ व्यापाऱ्याकडे व शेवटी किरकोळ व्यापाऱ्याकडून ग्राहकाकडे जात असताना मुळात भरलेली विक्रीकराची रक्कम प्रत्येक टप्प्यातून किमतीच्या माध्यमातून पुढे सरकत शेवटी ग्राहकावर लादली जाते. शिवाय मधल्या टप्प्यात उलाढाल कर, अधिभार, फेर विक्रीकर व प्रत्येक टप्प्यातील मध्यस्थांचा नफा, या सर्वांचा भार ग्राहकांवर लादला जातो. समजा-

**पहिला टप्पा : उत्पादक आपले उत्पादन वितरकाला विकतो.**

| | |
|---|---|
| विक्री किंमत | रू. 100.00 |
| 13 टक्के विक्रीकर | 13.00 |
| 2 टक्का उलाढाल कर | 1.00 |
| विक्रीकरावर 10 टक्के अधिभार | 1.30 |
| एकूण विक्री किंमत | 115.30 |

**दुसरा टप्पा : वितरक आपले उत्पादन घाऊक व्यापाऱ्याला विकतो**

| | |
|---|---|
| विक्री किंमत | रू. 135.00 |
| (रू. 20 वितरकाचा नफा समाविष्ट करून) | |
| अर्धा टक्का फेर विक्रीकर | 0.68 |
| एकूण विक्री किंमत | 135.98 |

**तिसरा टप्पा : घाऊक व्यापारी ते उत्पादन किरकोळ व्यापाऱ्याला विकतो**

| | |
|---|---|
| विक्री किंमत | 155.98 |
| (रू. 20 घाऊक व्यापाऱ्याचा नफा समाविष्ट करून) | |
| अर्धा टक्का फेर विक्रीकर | 0.78 |
| एकूण विक्री किंमत | 156.76 |

**चौथा टप्पा : किरकोळ विक्रेता ते उत्पादन ग्राहकाला विकतो**

| | |
|---|---|
| विक्री किंमत | 176.76 |
| (रू. 20 घाउक व्यापाऱ्याचा नफा समाविष्ट करून) | |
| अर्धा टक्का फेर विक्रीकर | 0.88 |
| एकूण विक्री किंमत | 177.64 |

या चारही टप्प्यात नेमके असे घडले की

1. मुळात कच्च्या मालाची किंमत रू.100
2. शेवटी ग्राहकाला ती रू. 177.64. ला मिळाली.
3. चारही टप्प्यात रू. 77.64. ने किंमत वाढली. त्यात (अ) रू. 60. नफा(ब)रू17.64.कर
4. विशेष नमूद करण्याची गोष्ट म्हणजे येथे करावर कर लादले गेले आहेत. दुसऱ्या टप्प्यातील रू. 135.30 वर विक्रीवर रू. 0.68 फेरविक्रीवर आकारला आहे. तर यात वस्तुची मूळ किंमत रू.100 नफा रू. 20 आणि विक्रीकर रू.15.30 इतकी आहे. म्हणजे रू.0.68 मध्ये रू.15.30 इतक्या विक्रीकरावर देखील कर आहे. म्हणून या रू.15.30 वरील कर रू.0.08 इतका येतो. तिसऱ्या व चौथ्या टप्प्यात जवळपास इतकाच करावर कर आकारला गेला आहे.

### 3.2 मूल्यवर्धित कर आकारणी

मूल्यवर्धित कर आकारणीची कार्यपध्दती समजून घेण्यासाठी पुढीलप्रमाणे एक काल्पनिक उदाहरण घेतले आहे. त्यात 12.50 टक्के मूल्यवर्धित कराचा दर व प्रत्येक टप्प्यात रू. 20 इतके मूल्य

वर्धित होते असे गृहित धरले आहे.

**पहिला टप्पा :उत्पादक आपले उत्पादन वितरकाला विकतो.**

| | |
|---|---|
| विक्री किंमत | 100.00 |
| 12.50 मूल्यवर्धित कर | 12.50 |
| एकूण विक्री किंमत | 112.50 |

**दुसरा टप्पा :वितरक आपले उत्पादन घाऊक व्यापाऱ्याला विकतो.**

| | |
|---|---|
| विक्री किंमत | 132.50 |
| (रू.20 मूल्यवर्धन) | |
| 12.50 टक्के मूल्यवर्धित कर | 2.50 |
| (येथे 20 रूपयावर 12.50 टक्के) | |
| एकूण किंमत | 135.00 |

**तिसरा टप्पा :घाऊक व्यापारी आपले उत्पादन किरकोळ व्यापाऱ्याला विकतो.**

| | |
|---|---|
| विक्री किंमत | 155.00 |
| (रू.20 मूल्यवर्धन) | |
| 12.50 टक्के मूल्यवर्धित कर | 12.50 |
| (येथे 20 रूपयावर 12.50 टक्के) | |
| एकूण किंमत | 157.50 |

**चौथा टप्पा :किरकोळ विक्रेता आपले उत्पादन ग्राहकाला विकतो.**

| | |
|---|---|
| विक्री किंमत | 177.50 |
| (रू.20 मूल्यवर्धन) | |
| 12.50 टक्के मूल्यवर्धित कर | 12.50 |
| (येथे 20 रूपयावर 12.50 टक्के) | |
| एकूण किंमत | 180.00 |

या चारही टप्प्यात नेमके असे घडले की-

1 मुळातील कच्च्या मालाची किंमत रू. 100

2 शेवटी ग्राहकाला ती रू. 180/- ला मिळाली

3 चारही टप्प्यात रू.80 ने किंमत वाढली.

(अ) रू.60 मूल्यवर्धित (ब) रू. 20 कर.

### 3.3 मूल्यवर्धित कराची वैशिष्ट्ये

#### 3.3.1 कराचे मुख्य दोन दर

राज्या राज्यातील विक्रीकर दरातील विविधता नाहिशी करून केंद्राने 550 वस्तुंची यादी श्वेतपत्रिकेत जाहीर केली. मूल्यवर्धित कर आकारण्याच्या दृष्टिने त्याचे चार भाग केले. पहिल्या भागातील वस्तुंवर मूल्यवर्धित कर आकारले गेले नाहीत. दुसऱ्या भागातील वस्तुंवर (अगदीच निवडक) एक टक्का कर, तिसऱ्या भागातील वस्तुंवर 4% कर व चौथ्या भागातील वस्तुंवर12.50 टक्के कर आकारण्यात आले आहेत. म्हणजे सर्व राज्यात आता साधारणपणे दोनच कर दर (4 टक्के व 12.50 टक्के) शिल्लक राहणार आहेत.

#### 3.3.2 काही कर रद्द झाले

विक्रीकर प्ध्दतीत वस्तुंची विक्री करीत असतांना विविध टप्प्यात विक्रीकर, उलाढाल कर, अधिभार, फेरविक्रीकर आदी आकारले जात असत. मूल्यवर्धित कर पध्दतीत हे सर्व नाहिसे होवून मूल्यवर्धित कर या नावाखाली एकच कर आकारला जाणार आहे.

#### 3.3.3 प्रत्येक टप्प्यात कर आकारणी व वसूली

मूल्यवर्धित कर पध्दतीत वस्तु व सेवांची खरेदी करणारा हा उत्पादक, व्यापारी (घाऊक वा किरकोळ) विक्रेता किंवा फेर विक्रेता असू शकेल. वस्तुच्या कच्च्या मालाच्या खरेदी पासुन ते तयार वस्तु ग्राहकांच्या हाती पडेपर्यंत जितके म्हणून मध्यस्थ येतात त्या सर्वांनी विशिष्ट कालावधीत आपल्या विक्रीवर ठरलेल्या दराने कर वसूल करणे व त्यामधून त्या कालावधीत केलेल्या खरेदीवर भरलेल्या कराची पूर्ण वजावट घेऊन दोन्ही फरकावर

कर भरावयाचा आहे. उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यातील व्यक्तीला कागदोपत्री संपूर्ण कर भरावा लागत असला तरी प्रत्यक्षातील आपल्या टप्प्यातील मूल्यवर्धनावरील कराचीच रक्कम प्रत्यक्ष भरावी लागणार आहे . विक्रीकर पध्दतीत करावर कर(Tax on Tax) आकारला जात असून ग्राहकावर दुहेरी कराचा (Double Taxation) बोजा पडत असे. यालाच कराचे सोपानन (Cascading) असेही म्हणतात. परंतु मूल्यवर्धित करांतर्गत प्रत्येक टप्प्यात वजावट मिळत असल्याने येथे करावर कर लादले जाणार नाहीत. म्हणून मूल्यवर्धित कर हा अनेक टप्प्यावर आकारण्यात येणारा व प्रत्येक टप्प्यावर वजावट देणारा कर आहे.

### 3.3.4 वजावट (Set-Off)

वजावट (परतावा) हे मूल्यवर्धित करप्रणालीतील एक खास वैशिष्ट्य आहे. विक्रीकर पध्दतीत उत्पादनाच्या पहिल्या टप्प्यात आकारलेले सर्व कर भरूनच दुसऱ्या टप्प्यातील उत्पादकाने ती वस्तु पहिल्या टप्प्यातील विक्रेत्याकडून विकत घ्यावी लागत असे. ही प्रथा अंतिम टप्प्या पर्यंत चालत असे. परंतु मूल्यवर्धित कर पध्दतीत संबंधितांच्या उत्पादन टप्प्यात कितीचे मूल्यवर्धन होते तेवढ्यावरच ठरवून दिलेल्या दराने कर भरावयाचा असून पहिल्या टप्प्यात भरलेल्या कराची वजावट मिळणार आहे.

वजावट संकल्पनेची कार्यपद्धती तक्ता क्र.1 च्या सहाय्याने अधिक स्पष्ट करता येईल

पहिल्या टप्प्यात कच्चामाल विक्रेत्याची किंमत रू.100/- त्यावर मूल्यवर्धित कर म्हणून रू. 10/- भरावा लागेल. ज्यावेळी रू.100 मूळ किंमत व रू. 10 कर पध्दतीने त्याच्या विक्री पावतीवर नोंद केली जाते व रू. 10 उत्पादक 'अ' कडून वसूल केले जातात.

दुसऱ्या टप्प्यात उत्पादक 'अ', रू. 100/- ला वस्तु खरेदी करतो, रू. 50/- ला मूल्यवर्धन करून रू. 150 ला उत्पादक 'ब' ला विकतो. त्यावर रू. 15 मूल्यवर्धन कर प्रत्यक्षात भरावयास पाहिजे. परंतु रू. 10 या पूर्वीच भरलेले असल्यामुळे आता केवळ रू. 5 एवढा कर भरावा लागणार आहे. म्हणजे भरावा लागणारा कर रू. 15 प्रत्यक्षात भरावयाचा कर रू. 5 आणि वजावट रू. 10 सूत्र रूपाने पुढील प्रमाणे सांगता येईल.

**वजावट = भरावा लागणारा कर - प्रत्यक्ष भरलेला कर**

वरील प्रमाणेच प्रक्रिया तिसऱ्या व चौथ्या टप्प्यात देखील घडते.

### 3.3.5 बहुबिंदु वा उपभोग कर

मूल्यवर्धित कर ही बहुबिंदु (Multi Point Tax) कर पद्धती आहे. कच्चामालाचे पक्क्यामालात रूपांतर करून अंतिमत: ग्राहकांच्या हाती पडेपर्यंत त्या वस्तुवर प्रक्रिया करून जितक्या वेळा ती वस्तु विकली जाणार त्या प्रत्येक टप्प्यावर त्याच्या वाढीव मूल्यावर कर आकारला जाणार आहे. म्हणून हा बहुबिंदू स्वरूपाचा कर समजला जातो. दुसरे असे की हा एक प्रकारचा उपभोग कर (Consumption Tax) म्हणूनही संबोधला जातो. कारण उत्पादन प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यातील पक्क्या मालाचा उपभोग, दुसऱ्या टप्प्यातील उत्पादक आपल्या वस्तु उत्पादनासाठी कच्चा माल म्हणून वापरणार आहे. म्हणून प्रत्येक टप्प्यातील व्यक्ती ही एक प्रकारे उपभोक्ताच असते. तसेच मूल्यवर्धित कर पद्धती ही पतपद्धतीवर (Tax Credit System)अवलंबून राहून कार्य करते.सूट मिळणाऱ्या रकमे इतके त्या उत्पादकाचे त्या टप्प्यात पत निर्माण होते.

### 3.3.6 विवरण पत्र (Return)

मूल्यवर्धित कर प्रणालीत, कर आकारण्याच्या पद्धतीत व आकारलेले कर संकलन

तक्ता क्र.1

| विक्री करणारा | खरेदी किंमत | मूल्यवर्धन | विक्री किंमत | मूल्यवर्धन कराचे दर 10% | वजावट | प्रत्यक्ष कराचा भरणा |
|---|---|---|---|---|---|---|
| कच्चा माल विक्रेता | 0 | 100 | 100 | 10 | 0 | 10 |
| उत्पादक 'अ' | 100 | 50 | 150 | 15 | 10 | 05 |
| उत्पादक 'ब' | 150 | 100 | 250 | 25 | 15 | 10 |
| किरकोळ विक्रेता | 250 | 200 | 450 | 45 | 25 | 20 |
| | | 450 | | | | 45 |

करण्याच्या पद्धतीत आमूलाग्र बदल करण्यात आले आहेत. विक्रीकर पद्धतीत उत्पादनाच्या कोणत्यातरी एका टप्प्यावर कर आकारला जाऊन तेथूनच तो गोळा केला जात असे. परंतु मूल्यवर्धित करप्रणालीत उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यातील उत्पादकाना कर भरावा लागत असल्यामुळे हे दायित्व पूर्ण करण्यासाठी उत्पन्न कराच्या धर्तीवर कर भरावयाचे आहेत.

प्रत्येक नोंदणीकृत उत्पादकाला दिलेल्या नमुन्यात, बिनचूक, परिपूर्ण व सुसंगत माहिती, निश्चित कालावधीत शासनाकडे देणे आवश्यक आहे. यात ठरवून दिलेल्या कालावधीतील एकूण विक्री रक्कम व त्यावेळी संकलित केलेले कर व एकूण खरेदी रक्कम आणि भरलेला कर अशी चार प्रकारची माहिती महत्त्वाची मानली जाते. त्यामुळे शासनाला भरावयाच्या एकूण कराची रक्कम व एकूण भरलेल्या कराची रक्कम अशा प्रकारे एक ताळेबंद तयार होतो. यालाच विवरणपत्र (Return)असे म्हणतात. दिलेल्या मुदतीत विवरणपत्र भरल्यानंतर त्यात काही त्रुटी वा उणिवा राहून गेल्याचे जर संबंधितांच्या लक्षात आले तर पुर्नविवरणपत्र (Revised return) भरण्याची सोय आहे.

### 3.3.7 लेखापरीक्षण (Audit)

प्रत्येक नोंदणीकृत उत्पादकाला दिलेल्या मुदतीत आपल्या आर्थिक उलाढालीचे वैधानिक व शासकीय यंत्रणेद्वारा लेखापरीक्षण करणे अपेक्षित आहे.

## 4. मूल्यवर्धित कर विषयक कायदे

मूल्यवर्धित कराच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारला अनेक नवीन कायदे करावे लागणार आहेत. तर काही कायदे रद्द करून तर काहीत सुधारणा करून मूल्यवर्धित कराला सुसंगत असे बदल त्यात करून घेण्याची आवश्यकता आहे.

### 4.1 महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायदा (2002)

या कायद्यात मुंबई विक्रीकर कायदा, मुंबई मोटार स्पिरीट विक्रीकर कायदा, महाराष्ट्र वाहन प्रवेश कायदा, महाराष्ट्र मालावरील प्रवेश कर कायदा हे कायदे समाविष्ट करण्यात आले आहेत. यानुसार ज्यांनी यापूर्वी नोंदणी केली आहे व 2004-2005 मध्ये ज्यांची रू. 5 लक्ष उलाढाल आहे त्या सर्वांनी नवीन कायद्यातंर्गत पुन: नोंदणी करून घेणे आवश्यक आहे. नोंदणी न करता व्यवसाय करणे हा गुन्हा समजला जाऊन मूल्यवर्धित करांतर्गत सर्व

सवलतींना त्याला मुकावे लागेल. या कायद्यांतर्गत व्यावसायिकाला अर्ज करून कोणतीच सवलत मागता येत नाही. त्याऐवजी परतावा मागावयाचा आहे.

ज्या लहान उद्योजक व व्यापारी यांची वार्षिक उलाढाल रू. 5 लाखापेक्षा कमी आहे अशाना या कायद्यातून वगळण्यात आले आहे. त्यांना स्वेच्छेने आपले नांव या कायद्यांतर्गत नोंदविता येईल. असे झाले तर कराची रक्कम दरमहा विवरण पत्रात भरावी लागेल आणि व्यवसायासाठी लागणारा कच्चा माल व साहित्य खरेदीवर भरलेल्या कराची पत त्यांना त्याच महिन्यात वापरता येणार आहे. भाडे तत्वावरील वस्तु वापराचा मोबदला म्हणून मिळणाऱ्या रकमेवर (Transfer of right to use) या कायद्यान्वये कर भरावा लागणार आहे.

### 4.2 आपसमेळ योजना (Composition Scheme)

अत्यंत लहान व्यापारी, पथिकाश्रम (हॉटेल), बेकरी, उपहारगृह, तयार अनन्न पुरविण्याचा व्यवसाय करणारे (केटरर) इत्यादी व्यावसायिकांच्यासाठी मूल्यवर्धित कर कायद्यातंर्गत ही एक पर्यायी व्यवस्था पुढे आली आहे. प्रचलित 4 वा 12.50 टक्के दराने कर भरावयाच्या ऐवजी ठराविक मुदतीतील एकूण उलाढालीवर (विक्रीचे मूल्य व खरेदीचे मूल्य यांच्या फरकावर) सवलतीच्या दराने (8 टक्के) कर भरण्याची ही सुविधा आहे. हे व्यावसायिक, विकत असलेल्या वस्तु विविध स्वरूपाच्या व विविध आकारमानाच्या असतात. म्हणून या विक्री टप्प्यावर त्या प्रत्येक वस्तुमध्ये किती मूल्यवर्धन झाले याची नेमकी नोंद घेता येत नाही. म्हणून ही एक ऐच्छिक सुविधा निर्माण केली आहे. परंतु उत्पादक किंवा आयातदारांना या योजनेचा लाभ घेता येत नाही. ग्राहकांना बीजकाच्या ऐवजी पावती द्यावी लागत असल्यामुळे वजावट ही सुविधा त्यांना वापरता येत नाही.

### 4.3 कर बीजक (Tax Invoice)

विक्रेत्याला विक्रीच्या संबंधातील अनेक तपशील ज्यावर नोंदवून पावती द्यावी लागते त्या पावतीलाच बीजक म्हणतात. पूर्वीच्या पावतीच्या स्वरूपापेक्षा याचे स्वरूप थोडे वेगळे असून मूल्यवर्धित कर प्रणालीतील एक अत्यंत महत्त्वाचे दस्तऐवज आहे. विक्रेता आपण भरलेल्या कराची वजावट याच्या आधारेच मागू शकतो. बीजकाचे स्वरूप विविध व्यवसायाला साजेल असे असले तरी त्यावर पुढील प्रमाणे काही नोंदी असणे आवश्यक आहे. त्या म्हणजे, त्यावर बीजक असे ठळक अक्षरात छापलेले असावे. विक्रेत्याचे नाव, पत्ता, नोंदणीक्रमांक, खरेदीदाराचे नांव, पत्ता, नोंदणीक्रमांक, पावतीचा अनुक्रमांक, विक्रीची तारीख, विक्री केलेल्या वस्तुचे वजन, नगसंख्या, किंमत, कराचा दर, कराची रक्कम, विक्रेत्याची सही असावी. विशेष म्हणजे आपला विक्रीकर नोंदणी दाखला चालू असल्याचे प्रमाणपत्र त्यावर छापले पाहिजे.

### 4.4 वजावटीच्या संदर्भातील तरतुदी

1 केवळ मूल्यवर्धित कराचीच वजावट मिळेल. (काही अपवाद सोडता)

2 वजावट मिळविण्यासाठी संबंधिताकडे बीजक असावे.

3 खरेदीवर भरलेल्या कराची वजावट त्याच क्षणी मिळेल. प्रत्यक्षात त्या उत्पादनाची विक्री भविष्यात कधीही होवो.

4 करमुक्त वस्तुंच्या उत्पादनावर आंतरराज्य व्यवसायात 4 टक्के दराने वजावट मिळेल.

5 कार्यकंत्राटदारांना ही सुविधा मिळेल.

6 मध्य विक्रेत्याना मुंबई विक्रीकर कायदा 1959 अनुसार वजावट मिळेल.

7.मोटार विक्रेत्याना मोटार डागडुजी व दुरूस्तीसाठी वापरलेल्या वस्तुंच्या खरेदीवर भरलेल्या कराची पूर्ण वजावट मिळेल.

**4.5 लेखापरीक्षण व पुनर्तपासणी**

आता वार्षिक करनिर्धारणकरण्या ऐवजी विवरणपत्राची छाननी आणि व्यवसायाचे लेखापरीक्षण ही पद्धत अमलात येईल. कर चुकवेगिरी थांबविण्यासाठी किंवा तिला काबूत आणण्यासाठी राज्याच्या काही मोक्याच्या ठिकाणी व सीमेवरील भागात तपासणी नाका उभारण्याची तरतूद कायद्यात आहे. या नाक्यांच्या माध्यमातून गैर व्यवहारांची माहिती मिळविणे, त्याचा पाठपुरावा करणे व बुडत असलेला कर गोळा करणे हा त्यामागील मुख्य हेतु आहे.

पुनर्तपासणीमुळे देखील कर बुडवेगिरीला बऱ्यापैकी आळा बसेल. व्यवहारामध्ये एखाद्याची विक्री ही दुसऱ्याची खरेदी होय. यात विक्रेत्यांनी कर वसूल केला म्हणजे खरेदीदारांनी तेवढा कर भरला. म्हणजेच या व्यवहारात दोघांच्याही उलाढालीत मेळ असायला हवा. म्हणून एकाच्या खरेदी विक्रीच्या माहितीवरून दुसऱ्यानी ती खरेदी विक्री दाखविली आहे की नाही हे तपासणे म्हणजे पुनर्तपासणी होय.

**5. मूल्यवर्धित कराचे दर**

केंद्र सरकारने श्वेतपत्रिका जाहीर करीत असताना त्यात कोणत्या वस्तुवर किती टक्क्यांनी राज्य सरकारनी मूल्यवर्धितकर आकारावयाचा आहे या संदर्भात स्पष्ट खुलासा केला आहे. त्यात प्रामुख्याने चार भाग केले असून पहिल्या भागात अशा वस्तुंची यादी आहे की, ज्यावर मूल्यवर्धित कर आकारला गेला नाही. दुसऱ्या भागात अगदी निवडक वस्तुंची यादी असून त्यावर अवघा एक टक्का कर आकारला आहे. तिसऱ्या यादीत अशा वस्तुंची यादी आहे की, ज्यावर 4 टक्के कर आकारण्यात आला आहे. चौथ्या प्रकारच्या यादीतील वस्तुंवर 12.50 टक्के कर आकारण्यात आला आहे आणखी काही अपवादात्मक वस्तु आहेत की, ज्यावर 20 टक्के दराने कर आकारले गेले आहेत. परंतु या 4 टक्के व 12.50 टक्के अशा दोनच दरांनी आज तरी या वस्तुंची यादी तयार करून त्यावरील कराचा दर निश्चित केला असला तरी राज्य सरकारला या बाबत बरेच अधिकार बहाल केले असल्यामुळे एका गटातील वस्तू दुसऱ्या गटात जाण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र मूल्यवर्धितकर कायद्यांतर्गत करदराची एक नवी अनुसूची तयार करण्यात आली असून ती पुढील प्रमाणे आहे.

अनुसूची भाग अ : यात करमुक्त असणाऱ्या वस्तुंचा समावेश होतो.

अनुसूची भाग ब : यात एक टक्का कर आकारलेल्या वस्तुंचा समावेश आहे.

अनुसूची भाग क : यात 4 टक्के कर आकारलेल्या वस्तुंचा समावेश आहे.

अनुसूची भाग ड : यात देशी व विदेशी मद्य विक्रीचा समावेश असून त्यावर 20 टक्के करदर आहे.

अनुसूची भाग ई : यात मोटार स्पिरिटसाठी असलेले विशेष कर दर राहतील.

अनुसूची भाग फ : यात 12.50 टक्के कर आकारलेल्या वस्तुंचा समावेश आहे.

**6.मूल्यवर्धित कराची अनुकूल बाजू**

विक्रीकर पद्धतीतील गुंतागुंत दूर करून, कराचा पाया रूंदावून, उत्पादक, ग्राहक आणि

शासन याना काही प्रमाणात दिलासा देणारा हा एक प्रयत्न आहे. यात काही अनुकूलता व तोटे जरूर आहेत. शिवाय अंमलबजावणीच्या प्रक्रियेतून नव्याने काही दोष पुढे येतील.

### 6.1 वस्तुंच्या किमतीत समानता येईल

विक्रीकर पद्धतीत देशातील प्रत्येक राज्यात एकाच प्रकारच्या वस्तुवर वेगवेगळ्या पद्धतीने, वेगवेगळ्या प्रमाणात, वेगवेगळे करदर आकारले जातात. त्यामुळे किमतीत देखील फरक असतो. एवढेच नव्हे तर एकाच राज्यात वेगवेगळ्या विभागात वेगवेगळे कराचे दर आकारले जातात. तेंव्हा किमतीतील या विविधतेमुळे काही दोष संभवतात.

(अ) ज्या ठिकाणी वस्तुवरील कराचे दर कमी आहेत त्याच ठिकाणी वस्तु खरेदी करण्याच्या ग्राहकांच्या आकर्षणामुळे ज्या विभागातून ते ग्राहक आले त्या जागेतील शासनाचा महसूल कमी होतो.

(ब) ज्या राज्यातील शासनाने आपल्या राज्यातील ग्राहकांना व उत्पादकांना प्रोत्साहित करण्यासाठी कराचे दर कमी आखून,प्रसंगी काही सवलती जाहीर केल्या असतील तर तेथे ती वस्तु स्वस्त मिळणार. ज्या प्रांतात हे धोरण अनुसरले जात नाही त्या प्रांतातून याकडे ग्राहक आकर्षिले जात असल्यामुळे त्या प्रांतातील महसूल क्रमी होऊन एक प्रकारचा प्रादेशिक असमतोल निर्माण झाल्याचे दिसते.

(इ) राज्या-राज्यातील किमतीतील फरकामुळे आंतरराज्य व्यापार करणे देखील ग्राहक व व्यापाऱ्यांच्या दृष्टिने किचकट व गैरसोयीचे आहे.

वस्तुच्या उत्पादन व विक्रीच्या प्रक्रियेत ज्या प्रमाणात मूल्यवर्धन होत जाईल त्या प्रमाणात एकाच दराने कर आकारणे हे शासन, व्यापारी व ग्राहकांना सोयीचे आहे. विक्रीकरातील इतर कर काढून टाकल्याने आता देशभर एकाच किमतीला ती वस्तु मिळणार आहे. सीमा शुल्काच्या नावाखाली ती वस्तु महाग करून विकणे आता शक्य होणार नाही.

### 6.2 वस्तुंच्या किमती स्थिरावतील

मूल्यवर्धित करामुळे वस्तुंच्या त्यातल्यात्यात जीवनोपयोगी वस्तुंच्या किमती वाढतील असा एक गवगवा आहे. परंतु याचा तपशिलात जाऊन विचार केल्यास चित्र थोडे वेगळे पहावयास मिळेल. वस्तुंच्या किमती वाढण्याची दोन कारणे आहेत. एक त्या वस्तुवरील कराचे दर वाढणे व दुसरे, उत्पादन खर्च वाढल्याने वस्तु महाग होणे.

(अ) ज्या वस्तु करापासून मुक्त आहेत त्या वस्तुंच्या किमती वाढण्याचे कारणच नाही. मूल्यवर्धित कराच्या आगमनापूर्वी ज्या वस्तुवर 12.50 टक्यापेक्षा अधिक कराचे दर होते व आता ते एकतर 4 टक्के किंवा 12.50 टक्के या कक्षेत आल्यामुळे या वस्तुंच्या किमती निश्चितच कमी होणार आणि ज्यावर पूर्वीच्या विक्रीकराच्या मानाने मूल्यवर्धित कर अधिक लागू केले त्या वस्तुंच्या किमती तेवढ्या प्रमाणात वाढणार.

(आ) सर्वत्र कराचे दर एकच असल्यामुळे व्यापार वाढविण्यासाठी विक्रेत्यांमध्ये एक प्रकारची स्पर्धा सुरू होईल. त्या स्पर्धेत टिकण्यासाठी उत्पादन व विक्रीच्या प्रक्रियेतील मध्यस्थांची संख्या शक्य तितकी कमी करून वस्तुंच्या किमती खालच्या पातळीवर राखण्याचा प्रयत्न सतत होत राहील.

(इ) मूल्यवर्धित कराचा वस्तुंच्या किंमत पातळीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी कर्नाटक सरकारने एक अभ्यास समिती नेमली होती. त्या समितीच्या अहवालाचा निष्कर्ष असा की, एका बाजूला वस्तुंच्या सरासरी किंमती कमी होणार असून दुसऱ्या बाजूला शासनाचा महसूल वाढणार आहे. ह्या निष्कर्षात जरी विरोधाभास वाटला तरी त्याचा खुलासा असा की, मूल्यवर्धित

कराच्या जाळ्यात अनेक वस्तु व व्यक्ती येणार असल्यामुळे कराचा पाया रूंदावणार आहे. शिवाय उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यातील व्यक्तीला भरलेल्या कराची वजावट मिळणार असल्यमुळे उत्पादन खर्च कमी होणार. एकच करदर आकारल्यामुळे व्यापाऱ्याला उत्तेजन मिळून व्यापार वाढणार. या सर्वांचे फलित म्हणून वस्तुंच्या किंमती कमी होतील.

### 6.3 शासनाचा महसूल वाढेल

मूल्यवर्धित कर ही विक्रीकरापेक्षा अधिक महसूल देणारी कररचना आहे. पुढील मुद्दे याला पुष्टी देतात.

(अ) कर आकारणीची ही पद्धत सोपी केली असून अधिकाधिक लोकांना कराच्या जाळ्यात आणल्या गेल्यामुळे कराचा पाया रूंदावला आहे. शिवाय अधिकाधिक वस्तू व सेवाकराच्या कक्षेत आणल्यामुळे कराचे दर कमी करून देखील शासनाला अधिक महसूल मिळणार आहे.

(आ) प्रस्तुत कर पद्धती बहुबिंदु स्वरूपाचे असल्याने उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यातील व्यक्तीला कर भरावाच लागत असल्यामुळे शासनाच्या उत्पन्नाची शाश्वती वाढली आहे. एकूण उत्पादनाच्या साखळीतील कोणत्याही एका व्यक्तीने कर भरला नसेल व ती वस्तु साखळीतील दुसऱ्या एका व्यक्तीने विकत घेतली असेल तर तेथे एखाद्याने बुडवलेल्या कराइतकी रक्कम शासन दोघाकडून वसूल करते.

(इ) विक्रीकराच्या मानाने मूल्यवर्धित कररचना निश्चितच प्रमाणशील कराच्या प्रकारात मोडते. याला न्याय्य कररचना असेही संबोधिले जाते. मुळातल्या कच्च्या मालाचे रूपांतर कोणत्या टप्प्यात कोणत्या दरांनी, मूल्यवृद्धि होवून पुढच्या टप्प्यात नेमक्या त्याच प्रमाणात कर आकारला जाणार आहे. त्यामुळे पूर्वीच्या मानाने अधिक महसूल देणारा हा कर आहे.

(ई) प्रत्येक टप्प्यातील व्यक्तीला आपण भरलेल्या कराच्या रकमेइतकी वजावट मिळणार असल्याने कर भरण्यास ती व्यक्ती धजावत नाही. तेंव्हा कर गोळा करणे एक तर सोपे व महसूल अधिक मिळतो.

(उ) विक्रीकर पद्धत अधिक किचकट, सदोष असून त्यात बऱ्याच ठिकाणी कर गळत्या आहेत. त्यामुळे त्यात अनेक पळवाटांना संधी असल्यामुळे तेवढ्या प्रमाणात शासनाचा महसूल बुडतो. तर मूल्यवर्धित कर प्रणाली त्या मानाने कमी गुंतागुंतीची असून त्यात करगळत्या निश्चितच कमी आहेत. तेंव्हा तेवढ्या प्रमाणात महसूल वाढण्यास हातभार लागणार.

(ऊ) विक्रीकराच्या मानाने प्रस्तुत करासंबंधिचे कायदे थोडे कडक असल्यामुळे कर बुडवेगिरीला निश्चितच आळा बसणार असल्याने कर वसूलीचे प्रमाण अधिक राहणार.

### 6.4 दुहेरी करातून सुटका

मूल्यवर्धित करपद्धतीमध्ये मूल्यवर्धनाइतकेच कर आकारले जाणार असून व त्या करांची पूर्ण वजावट मिळणार असल्यामुळे संबंधित वस्तुची दुहेरी करातून सुटका होणार आहे.

### 6.5 सुटसुटीत व सोपे करधोरण

मूल्यवर्धित कर पद्धतीत विक्रीकर, उलाढालकर, अधिभार, वाढीव अधिभार आदी कर रद्द होऊन एकच कर शिल्लक राहिल्यामुळे ते मोजण्यास, आकारण्यास व गोळा करण्यास सोपे समजून घेणे त्याहून सोपे आहे.

### 6.6 वैध व्यवहार करणाऱ्यास प्रोत्साहन

विक्री कररचना व वसुली यात जो किचकटपणा आहे त्यातच करबुडवेगिरीची बीजे सापडतात. परंतु मूल्यवर्धित कराचा व्यवहार

त्यापेक्षा सरळ व सोपा असून संपूर्ण व्यवहार पारदर्शक असल्यामुळे करबुडवेगिरीचे प्रमाण कमी होईल. वेळेवर विवरण पत्र भरण्याची सोय असून ते बंधनकारक आहे. बीजकाशिवाय कोणतेच विक्री व्यवहार करता येत नाहीत. या सर्वांमुळे वैध व्यवहार करणारे उत्पादक, व्यापारी याना निश्चितच प्रोत्साहन मिळणार आहे.

### 6.7 स्वयं निर्धारण कर पद्धती

मूल्यवर्धित कराचा सर्वात महत्त्वाचा गुण म्हणजे ही एक स्वयंनिर्धारण कर पद्धती (Self monitoring machanism) आहे. त्यामुळे संबंधित आपले व्यवहार व्यवस्थित नोंदवतील. चोख हिशोब ठेवतील. त्यात पारदर्शकता राहील आणि एकूणच व्यवहाराला एक प्रकारची शिस्त लागेल. यात विवरणपत्र भरण्याची पद्धत सोपी असून ठराविक वेळेत शासनाला भरलेली कराची रक्कम व भरावयाची रक्कम यांचा चटकन हिशोब लागेल.

### 6.8 परदेशी गुंतवणूक आकर्षित होईल

नवीन आर्थिक धोरणाचा मूलमंत्र जागतिक बाजाराशी, स्थानिक बाजाराचा संबंध जोडणे व देशादेशात भांडवलाची देवाणघेवाण करणे हा आहे. तेंव्हा मूल्यवर्धित कराच्या अंमलबजावणीमुळे भारतात परदेशातून भांडवल आकर्षिले जाईल. पूर्वी विक्रीकराचे दर, गुंतवणुकीच्या अटी व त्या संबंधिचे कायदे हे त्या त्या राज्य सरकारचे असून राज्या-राज्यामध्ये भिन्नता होती आणि जेंव्हा परदेशी गुंतवणुकदार भारतीय बाजारात सहभागी होत होते, तेंव्हा त्यांना राज्य सरकारच्या धोरणानुसार वागावे लागत होते. म्हणून त्यांच्या व्यवसायाची बाजारपेठ मर्यादित राहत असे. परंतु मूल्यवर्धित कर प्रणाली अंतर्गत कराचे दर, अटी व कायदे सर्व राज्यात सारखेच असल्यामुळे अधिक पारदर्शकता लाभेल, आणि गुंतवणूकीस प्रोत्साहन मिळेल.

### 6.9 ग्राहकांचे हक्क बळकट होतील

आपल्याकडे पावती न मागता बऱ्याच प्रमाणात वस्तुंची खरेदी केली जाते. त्याची दोन महत्त्वाची कारणे आहेत. एक, ग्राहकांचे अज्ञान, दुसरे विक्रीकर न भरता न नोंदविलेल्या व्यवहारातून वस्तु खरेदी करणे. विक्रीकराची पावती न मागितल्यामुळे तेवढ्या प्रमाणात त्या वस्तु स्वस्त मिळत होत्या. परंतु आता अशी शक्यता नाही कारण पावती मागितली किंवा नाही ही गोष्ट आता गौण राहून ग्राहकांना विक्रीकर भरावाच लागतो. म्हणून किंमती वाढल्यासारख्या वाटतात अणि त्याचा तसा प्रचारही केला जात आहे. मग आता साहजिकच प्रत्येक ग्राहकाला पावती मागण्यास काहीच हरकत नाही. पूर्वी विक्रीकर बुडवून बिगर पावतीची वस्तु विकत घेतली असता व काही कारणाने ती वस्तु खराब निघाली व त्या विरोधात न्यायालयात (प्रामुख्याने ग्राहक न्यायालयात) दाद मागावयाची म्हटले तर पावती अभावी ग्राहकांची बाजू नक्की लंगडी पडत होती. परंतु मूल्यवर्धित कर आकारणी पद्धतीत कोणालाच कर चुकविता येत नसल्यामुळे अंतिमत: ग्राहकांना या वस्तु तेवढ्या प्रमाणात महाग वाटत असल्या तरी न्यायालयात जाण्यासाठी त्याची बाजू नक्कीच बळकट होईल.

### 6.10 करधोरणाविषयी साक्षरता वाढेल

उत्पादक, वितरक, व्यापारी व ग्राहक यांच्यातील कर धोरणाविषयीची साक्षरता वाढेल. उत्पादकाना आपल्या व्यवहाराचे संपूर्ण तपशील मांडावेच लागणार आहेत. त्याशिवाय विवरणपत्र भरून वजावट मागता येत नाही. हिशोब ठेवण्यात जितकी जागृती होईल, तितकी व्यवसायातील डोकेदुखी कमी होणार, यातूनच उत्पादक, वितरक, व्यापाऱ्यांना अचूकपणे हिशोब ठेवणे, वेळेवर विवरणपत्र भरणे, वजावट मागणे, लेखापरीक्षण

करून घेणे इ. गोष्टी आवश्यक झाल्या असल्यामुळे या सर्व गोष्टी नीटपणे समजून घेणे व्यवसायाच्या भल्यासाठी आवश्यक आहेत. सोबतच संगणकाचा आणि माहिती तंत्रज्ञानाचा वापर वाढेल. अशा पद्धतीने उत्पादक-व्यापाऱ्यामध्ये करधोरणा विषयीची साक्षरता निश्चितच वाढेल.

वजावट मागणे हा मूल्यवर्धित करप्रणालीतील केंद्रबिंदु मानल्यामुळे कोणालाही कर बुडवता येत नाही. उत्पादनाच्या पहिल्या टप्प्यापासून ते थेट अंतिम ग्राहकापर्यंत ज्या ज्या टप्प्यात कर आकारले जाणारा त्याचा अंतिम भार ग्राहकावरच पडणार असल्यामुळे व विशेष म्हणजे त्यांना तो टाळता येत नसल्यामुळे त्याला कर धोरणाविषयी जागृत राहणे भाग आहे. करमुक्त वस्तु कोणत्या व कोणत्या वस्तुवर किती करदर आकारले गेले आहेत याचे ज्ञान ग्राहकाला असणे आवश्यक आहे. पूर्वी कराचे अनेक प्रकार व दरही विभिन्न असल्यामुळे सामान्य ग्राहकांना कोणत्या वस्तुवर किती जागेत किती प्रमाणात कर भरत आहोत याचा अंदाज यायचा नाही. परंतु मूल्यवर्धित करप्रणालित प्रचलित दोनच करदर असल्यामुळे ग्राहकांना आपण कोणत्या वस्तुवर किती कर भरणार आहे याचा पुरेसा अंदाज येणार आहे.

### 6.11 माहिती तंत्रज्ञान क्षेत्रावर अनुकूल परिणाम

मूल्यवर्धित कराचा आत्मा हा अचूक हिशोबाचा आहे. बिनचूक हिशोब, विवरणपत्र भरणे, वजावट मागणे यासाठी आता वह्या पुस्तकांचा वापर टाळून संगणकाच्या माध्यमातून या गोष्टी करणे अधिक सुलभ व सोयिस्कर होणार. संगणकामुळे कोणतीही माहिती कोणत्याही वेळी त्वरित उपलब्ध करता येईल. इतर व्यापाऱ्याकडून 'इंटरनेट' च्या माध्यमाने आवश्यक ती माहिती मागविता येईल आणि एकूणच व्यवहार पारदर्शक राहील.

### 6.12 अनुकूल प्रतिक्रिया

भारत सरकारने मूल्यवर्धित कर लागू करण्याचे धोरण घोषित केल्यानंतर ज्या प्रतिक्रिया उमटल्या आर्थिक सुधारणेच्या बाबतीतील भारताची पावले योग्य दिशेने पडत असल्याची ग्वाहीच देतात. जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणे निधी यांच्या कार्यालयातून अत्यंत अनुकूल प्रतिक्रिया उमटल्या. त्यांच्यामते देशभर एकच करदरामुळे राज्यांना आर्थिक शिस्त लागून त्यांचा महसूल वाढेल आणि आर्थिक चणचण भासणाऱ्या राज्यांना कर्जाच्या विळख्यातून बाहेर पडता येईल.

## 7. मूल्यवर्धित कराचे भवितव्य व समारोप

आता राहिला प्रश्न तो मूल्यवर्धित कराच्या अंमलबजावणीचा. ही अंमलबजावणी जितकी व्यवस्थित होईल तितक्या अधिक प्रमाणात याला यश मिळेल आणि याचे उद्देश सफल होतील. नाहीतर भारतीय समाजात आलेली एखादी नवीन कल्पना रूजविण्यात ज्या अडचणी येतात त्या लक्षात घेता मूल्यवर्धित करपद्धतीच्या अमलबजावणी विषयी थोडी चिंताच वाटते. म्हणून मूल्यवर्धित कराच्या उद्देश पूर्ततेसाठी किंवा त्याच्या उज्वल भवितव्यासाठी काही गोष्टींची प्रामाणिक पूर्तता होणे गरजेचे आहे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी की, मूल्यवर्धित करप्रणालीची यशस्विता, करदाता व प्रशासक यांच्या आपसातील विश्वासावर अवलंबून आहे. करदात्याने प्रामाणिकपणे आपल्या व्यवसाया विषयीच्या सर्व नोंदी व्यवस्थित मांडून ठरलेल्या वेळेत कर भरून ताळेबंदपत्रक सादर केला तरच शासनाला अपेक्षित प्रमाणात महसूल मिळेल. ज्यावेळी मूल्यवर्धित कराचे रणशिंग फुंकले त्यावेळी

व्यापारी व व्यावसायिकांनी जे अकांडतांडव केले त्यातील काही प्रमाणातील सत्यता नाकारता येत नाही. संबंधित प्रशासनाला दिलेले अनेक अधिकार, कायद्यातील दंडात्मक कारवाई व इतर काही मुद्दे पुढे करून विरोध व्यक्त केला. परंतु वैध प्रकारचे व्यवहार करणाऱ्यांना याची भीती वाटण्याचे काहीच कारण नाही.

मूल्यवर्धित करपद्धती अंतर्गत कर वसूल करणाऱ्या प्रशासनाला अनेक अधिकार बहाल करण्यात आले आहेत. तेंव्हा या अधिकाराचा वापर करीत असताना प्रामाणिक पणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. राजकीय दबाव व इतर काही कारणाने कायद्याच्या चौकटी तोडून व्यावसायिकांवर कारवाई करण्याचा जर प्रयत्न झाला तर त्यातून मूल्यवर्धित कराच्या अंमलबजावणीसाठी अनुकूल वातावरण निर्माण होणार नाही.

आजवरच्या अनेक क्षेत्रातील अनुभव पाहता झालेल्या चुकांकडे व मोडलेल्या कायद्याकडे दुर्लक्ष केले जाते. गुन्नार मिर्दाल यांनी याला मृदू राज्याची लक्षणे मानली आणि भारत आजही मृदूराज्य आहे. तेंव्हा कर बुडवून जे व्यवहार करतात त्यांच्यावर राजकीय किंवा सामाजिक दबावामुळे योग्य कारवाई करण्याचे टाळले तर मूल्यवर्धित कराच्या अंमलबजावणीत तो एक अडसर ठरेल.

आज भारतातील मोठी आठ राज्ये देशपातळीवरील मूल्यवर्धित कराच्या मोहिमेत सामील झाली नाहीत. संपूर्ण देश पातळीवर मूल्यवर्धित कराच्या सुसूत्र व प्रभावी अंमलबजावणीसाठी एकमताने आपसातील राजकीय व इतर मतभेद विसरून अनुकूल वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

सर्व राज्यांनी आणखी एक मोठी जबाबदारी पूर्ण करावयास पाहिजे आणि ती म्हणजे आपापल्या राज्यात मूल्यवर्धित कराच्या संदर्भात कायदे करून त्यात सुस्पष्टता आणावी. नाहीतर कायद्यात पळवाटा काढणे व अंमलबजावणीत गुंतागुंत निर्माण होण्यास बरीच संधी मिळेल. या कायद्यांना अंतिम स्वरूप देण्यापूर्वी देशातील अनेक क्षेत्रातील व्यक्तींच्या प्रतिनिधिंशी सविस्तर चर्चा करावी. त्यात त्यांना विश्वासात घेऊन त्यांच्या मतांचे आदर करणे म्हणजे मूल्यवर्धित कराच्या अंमलबजावणीचा मार्ग अधिक सुकर करणे होय.

मूल्यवर्धित कराच्या यशस्वीतेसाठी ग्राहक व व्यावसायिकांचा शासनाला सहयोग असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पहिल्यांदा या दोघांमध्ये करधोरणाविषयी साक्षरता वाढली पाहिजे. शासनाला कोणकोणत्या प्रकारच्या सहयोगाची आवश्यकता आहे त्याचे नीट आकलन होणे आवश्यक आहे. व्यापाऱ्यांच्या मनामध्ये दंडात्मक कारवाई विषयी भीती घालवून विश्वासाचे वातावरण निर्माण व्हायला पाहिजे. त्यांच्याशी वारंवार चर्चा करून कराविषयी, नवीन कायद्याविषयी, कायद्यातील बदला विषयी सतत माहिती पुरवावी. कोणत्या वस्तुवर किती कर आहे याची माहिती घेऊन वस्तु खरेदी करीत असताना ते पाहून घ्यावे, आणि शक्यतो दुकानदाराकडे पावती मागावी. ती न मागता वस्तु खरेदी करून अनोंदित व्यवहार करणाऱ्या दुकानदारांना साथ देऊ नये.

कमाल किरकोळ किंमत निश्चित करण्यामधे अजूनही संभ्रम आहे. मूल्यवर्धित कराच्या बऱ्याच कायद्यात अजूनही काही कच्चे धागे आहेत. कायद्याच्या अंमलबजावणीच्या अनुभवातून काही कायद्यामध्ये दुरूस्ती करण्याची वा नवीन कायदे करण्याची आवश्यकता भासेल. हे त्या त्या वेळी होणे आवश्यक आहे.

✦✦✦

# महाराष्ट्रातील मानव विकासाची वास्तविकता आणि स्त्रियांचा शिक्षणातील सहभाग.

✦ रामकृष्ण सोळुंके, औरंगाबाद.
*प्रपाठक, अर्थशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.*

✦ गणेश गावंडे , बदनापूर.
*अधिव्याख्याता, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बदनापूर.*

## प्रस्तावना

आज जगात सर्वच देशात आर्थिक विकास साध्य करण्याचा प्रयत्न केला जात आहे. देशाचा आर्थिक विकास देशातील लोकसंख्येच्या आकारावर अवलंबून नसतो तर तो लोकसंख्येच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. लोकसंख्या दीर्घायुषी, शिक्षित, प्रशिक्षित, अनुभवी, कार्यक्षम व कुशल असेल तर लोकसंख्येची गुणवत्ता चांगली आहे असे समजण्यात येते. चांगल्या गुणवत्तेच्या मनुष्यबळामुळे आर्थिक विकासाचा वेग वाढण्यास मदत होते. त्यामुळे अशी लोकसंख्या नैसर्गिक व वित्तीय साधन सामग्री प्रमाणेच उपयुक्त मानली जाते. लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो तर मानव विकासाच्या बाबतीत (सन 2001 या वर्षात) 174 देशामध्ये 124 वा क्रमांक लागतो. 1998 या वर्षाच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्राचा लोकसंख्येच्या बाबतीत राज्यांत दुसरा क्रमांक लागतो, तर मानवी विकासाच्या बाबतीत चौथा क्रमांक लागतो. देशाच्या आर्थिक विकास लोकसंख्येच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. मानवी साधनसंपत्तीचा विकास आणि देशाचा आर्थिक विकास यांचा 'धनात्मक' स्वरूपाचा (Positive Correlation) सहसंबंध असतो. आल्फ्रेड मार्शल यांनी शिक्षण म्हणजे राष्ट्रीय गुंतवणूक होय असे मानून मानवी संसाधनातील गुंतवणुकीला सर्वाधिक मौल्यवान भांडवल असे म्हटले होते.

1998 चे नोबेल पारितोषिक विजेते अमर्त्यसेन यांनी शिक्षण व मानवी भांडवलाचा विकास यांच्यातील 'धनात्मक' सहसंबंधाबाबत भूमिका मांडली. मानवी साधन संपत्तीचा विकास शिक्षणाच्या प्रचार व प्रसारामुळे होतो आणि

मानवी साधन संपत्तीच्या विकासामुळे राष्ट्राच्या आर्थिक विकासाला चालना मिळते हे स्पष्ट केले. याचा अर्थ देशांच्या आर्थिक विकासाचे जे वेगवेगळे घटक आहेत, त्यापैकी मानवी साधन संपत्तीचा विकास हा देखील आर्थिक विकासाचा एक घटक आहे, असे अमर्त्य सेन यांनी म्हटले आहे. आर्थिक विकास हे मानवी विकासाचे फलन होय. त्यामुळे आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी मानवी भांडवलाचा विकास घडवून आणणे आवश्यक ठरते. शिक्षण हा मानवी भांडवलाच्या विकासाचा प्रमुख घटक म्हणून ओळखला जातो. मानवी साधनसंपत्तीचा किंवा मानवी भांडवलाचा विकास हा शिक्षणाच्या गुणात्मक प्रचार व प्रसारावर अवलंबून असतो.

संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमातर्फे (यु.एन.डी.पी.) पहिला मानव विकास अहवाल 1990 मध्ये प्रसिद्ध करण्यात आला. या अहवालाचे प्रणेते अमर्त्य सेन आणि मेहबुब उल हक हे होते. भारतातील विविध राज्ये मानव विकास अहवाल तयार करतात. महाराष्ट्राचा मानवी विकास अहवाल 2002 मध्ये प्रसिद्ध करण्यात आला.

**मानवी विकास म्हणजे काय ?**

''लोकांना मिळणाऱ्या संधीचा परिघ मोठा करण्याची प्रक्रिया म्हणजे मानवी विकास होय''

''शिक्षण, आरोग्य आणि उपजिविकेचे साधन या जीवनाच्या तीन महत्त्वाच्या पैलूंसाठी दिलेला लढा आणि त्यांची प्रत्यक्षात झालेली पूर्तता, यांचा मिलाफ म्हणजेच मानव विकास होय''

यामध्ये दीर्घ आणि निरोगी जीवन जगण्याच्या, शिक्षण मिळविण्याच्या आणि चांगले राहणीमान उपभोगण्याच्या संधी महत्त्वाच्या आहेत.

मानवी संसाधनांचा विकास हा शिक्षण व प्रशिक्षणाच्या सोयी, आरोग्यविषयक सोयी व सुविधा आणि निवास, आहार, पिण्याचे पाणी इत्यादी घटकांवर अवलंबून असतो. परंतु लोकांच्या जीवनमानात बदल घडवून आणणारा एक आवश्यक घटक म्हणून शिक्षणाचे स्थान महत्त्वाचे आहे. शिक्षणाचा प्रत्येक टप्पा हा व्यक्तीला अधिकाधिक क्षमतेकडे नेतो. कारण प्रत्येक शिक्षणाच्या अवस्थेत व्यक्ती नवीन बाबी आत्मसात करते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण हे वाघीणीचे दूध आहे असे म्हटले. याचा अर्थ शिक्षण हा मानवी विकासाचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. मानव विकासात स्त्री आणि पुरूषांचा समान विकास अभिप्रेत असतो. परंतु भारतात स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते. स्त्री-पुरूष समानता साध्य करण्यासाठी कायदे असूनही स्त्रियांचे अनेक हक्क डावलले जातात. त्यामुळे स्त्रियांना अनेक हक्कांपासून किंवा संधीपासून वंचित रहावे लागते. महाराष्ट्रातील मानवी विकासाची वास्तविकता पाहण्याच्या दृष्टिने या लेखात महाराष्ट्रातील स्त्री साक्षरता प्रमाण, मुलींच्या गळतीचे प्रमाण, जिल्हानिहाय स्त्री साक्षरतेची विषमता व स्त्रियांचा विविध स्तरावर शिक्षणातील सहभाग आणि जागतिकीकरणाच्या संदर्भात तळागाळातील व्यक्तींना विशेषत:स्त्रियांना भविष्यात खऱ्या अर्थाने शिक्षणाच्या संधींची उपलब्धता इत्यादींचा आढवा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**स्त्री शिक्षण**

''कौशल्य वाढीसाठी किमान साक्षरता असावी लागते. स्त्रीची शैक्षणिक पात्रता आणि आरोग्य, मुलींचे शिक्षण, कुटुंबाचे कल्याण यांचा परस्परसंबंध असतो, हे आता सिद्ध झाले आहे. औपचारिक शिक्षणामुळे लग्नाचे वय आपोआप पुढे जाते. कुटूंब लहान हवे याची जाणीव होते, मुलांची सर्वांगीण काळजी घेण्याचे कौशल्य विकसित होते.

त्यामुळे बालमृत्यूचे प्रमाण घटते. मुले निरोगी राहिली तर स्त्रिया अधिक मुले होऊ देत नाहीत. स्त्रिचा आत्मविकास होतो व ती कमाऊ शकते. (यावरून) शिक्षण हे विकासाचे एक महत्त्वाचे साधन आहे, ले लक्षात येते.''[1]

भारतात 2001 मध्ये सरासरी साक्षरता दर 65.38 टक्के एवढा होता. ज्यामध्ये पुरूष साक्षरता दर 75.85 टक्के आणि स्त्री साक्षरता दर 54.16 टक्के एवढा होता. यावरून देशात स्त्री साक्षरतेबाबत किती मागासलेपणा आहे हे सहज लक्षात येते. सुप्रसिद्ध समाजसेविका दुर्गाबाई देशमुख यांच्या मते ''एका मुलाचे शिक्षण म्हणजे एका व्यक्तीचे शिक्षण होय, तर एका मुलीचे शिक्षण म्हणजे संपूर्ण कुटुंबाचे शिक्षण होय''.

प्रसिद्ध समाजसुधारक महात्मा ज्योतीबा फुले यांचे स्पष्ट असे मत होते की, ''कोणताही समाज तोपर्यंत खऱ्या अर्थाने साक्षर होत नाही, जो पर्यंत त्या समाजातील स्त्रिया साक्षर होत नाहीत. एक साक्षर महिला कुटुंबात जे सुसंस्कार टाकू शकते ते काम हजार शिक्षक वा गुरू करू शकत नाहीत.''

महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण राष्ट्रीय साक्षरतेपेक्षाही अधिक आहे. साक्षरतेच्या बाबतीत देशात महाराष्ट्राचा दहावा क्रमांक लागतो. पुरूष साक्षरतेमध्ये महाराष्ट्राचा आठवा क्रमांक लागतो. परंतु स्त्री साक्षरतेमध्ये महाराष्ट्र मागे पडला आहे.

### महाराष्ट्रातील शिक्षणाच्या वास्तविकतेवर एक दृष्टिक्षेप

लोकांना शिक्षणासारख्या संधी उपलब्ध करून देणे व त्यांच्या क्षमतेत वाढ करणे हे मानव विकासाचे कार्य आहे. याबाबत महाराष्ट्राने कोणती आणि कशा प्रकारची कामगिरी पार पाडली आहे ? या बाबींचा आढावा घेतांना आपल्याला असे दिसून येते की, शाळा आणि महाविद्यालयांच्या संख्येत वाढ झाली आहे. परंतु (मानवी कर्तुत्वात निदान शैक्षणिक क्षेत्रात) शैक्षणिक क्षेत्रांत गुणात्मक वाढ झाली किंवा नाही याचे उत्तर देणे आणि त्याबाबत विश्लेषण करणे आवश्यक आहे.

### मानव खर्च प्रमाण

भारताचे राष्ट्रपती अब्दुल कलाम यांनी स्वातंत्र्य दिनाच्या पूर्व संध्येस (दि. 14 ऑगस्ट 2004 रोजी) केलेल्या भाषणात असे म्हटले की, ''शिक्षणासाठी केली जाणारी तरतूद अपुरी पडते आहे. त्यामुळे देशातील सार्वजनिक आरोग्याप्रमाणेच शिक्षणाची पायाभूत व्यवस्थाही कुपोषित झाली आहे. ती सुधारण्यासाठी स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या 7 टक्के रक्कम शिक्षणावर खर्च करण्यात यावी''. मानव खर्च प्रमाण म्हणजे राज्याच्या उत्पन्नापैकी मानवी विकासासाठी उदा. प्राथमिक शिक्षण, प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, पाणी पुरवठा, स्वच्छता आणि पोषक आहार यावर होणाऱ्या खर्चाची टक्केवारी होय. मानव विकासासाठी पाच टक्के रक्कम खर्च व्हावी असे यु.एन.डी.पी. ने (संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम) सुचविले आहे. परंतु महाराष्ट्रात मानव विकासावरील खर्च अल्प राहिला आहे.

शिक्षणासंबंधात काम करणाऱ्या अनेक समित्यांनी (उदा. 1991 च्या राममूर्ति समितीने) एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी किमान 6 टक्के रक्कम शिक्षणावर खर्च व्हावी असे सुचविले होते. पहिल्या पंचवार्षिक योजनेचा अपवाद (6.74 %) वगळता नेहमीच शिक्षणावरच्या खर्चाची आपल्या देशाची पातळी खूपच कमी राहिली आहे. प्राथमिक शिक्षणासाठी राखून ठेवलेल्या रकमेपैकी बरीच रक्कम शिक्षकांच्या वाढत्या वेतनासाठी खर्च होते. याचा अर्थ असा की, हा वाढता खर्च शिक्षण जास्तीत

जास्त लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी किंवा शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी केला जात नाही. महाराष्ट्रातील चित्र यापेक्षा फारसे वेगळे नाही असे महाराष्ट्राच्या मानव विकास अहवालाच्या आधारे लक्षात येते.

### महाराष्ट्रातील साक्षरता दर

मानवी विकासाचा निर्देशक म्हणून साक्षरता दराकडे पाहिले जाते. महाराष्ट्रातील स्त्री-पुरूष साक्षरता प्रमाणात सन - 1951 ते 2001 या काळात झालेला बदल पुढील तक्त्यात दर्शविलेला आहे.

तक्ता क्र.1 वरून असे निदर्शनास येते की, महाराष्ट्रात 1951 यावर्षी साक्षरता दर 27.91 एवढा होता तो 2001 मध्ये 77.27 इतका झाला. हे प्रमाण राष्ट्रीय साक्षरता प्रमाणापेक्षा अधिक आहे. महत्त्वाची बाब म्हणजे 1970 च्या दशकापासून स्त्रियांच्या साक्षरता वृद्धीचा दर पुरूषांच्या दरापेक्षा अधिक आहे. त्यामुळे सन 1951 मध्ये पुरूष आणि स्त्री साक्षरता दरामध्ये 24.93 एवढी तफावत होती. ती कमी होऊन 2001 मध्ये 18.76 एवढी झाली आहे. सन 1961 मध्ये पुरूष साक्षरता वृद्धी दर 8.77 एवढा होता तो 2001 मध्ये वाढून 9.71 एवढा झाला. याच कालावधीत म्हणजे सन 1961 मध्ये स्त्री साक्षरता वृद्धी दर 4.24 एवढा होता तो वाढून 2001 मध्ये 15.19% झाला. यावरून असे स्पष्ट होते की, अलीकडील काळात शिक्षण घेण्याच्या बाबतीत तरी स्त्री-पुरूष समानता मान्य केली जात आहे, ही मानवी विकासाच्या दृष्टीकोनातून अनुकूल बाब आहे.

सन 2001 मधे महाराष्ट्रातील साक्षरता दर राष्ट्रीय साक्षरता दरापेक्षा अधिक म्हणजे 77.27 एवढा होता. परंतु यामध्ये अनेक साक्षरांना स्वत:च्या सही शिवाय दुसरा एकही शब्द वाचता किंवा लिहिता येत नाही. त्यामुळे 77.27 या साक्षरतेत गुणात्मकता किती आहे ही दुसरी बाजुही महत्त्वाची ठरते.

### गळतीचे चिंताजनक प्रमाण.

महाराष्ट्रात शाळेच्या प्रत्येक पातळीवर गळतीचे प्रमाण वाढत आहे. तक्ता क्रमांक 2 मध्ये इयत्तेनुसार मुला-मुलींच्या गळतीचे प्रमाण दर्शविले आहे. प्राथमिक शाळेतील मुला-मुलींचे गळतीचे प्रमाण जवळजवळ सारखे आहे. पण त्यापुढील वर्गात (लिंगभेद) स्त्री-पुरूष भेद दिसून येतो. जालना या सारख्या मागास जिल्ह्यात तर हा भेद अधिकच आढळतो.

तक्ता क्रमांक 2 वरून मुलांच्या गळतीचे प्रमाण 8 टक्क्यां वरून 53 टक्क्यापर्यंत व मुलींचे गळतीचे प्रमाण 7 टक्क्यांवरून 60 टक्क्यांपर्यंत

**तक्ता क्रमांक 1**

**महाराष्ट्रातील स्त्री-पुरूष साक्षरता दर (सन 1951 ते 2001)**

| वर्ष | एकूण | पुरूष | वृद्धीदर | स्त्री | वृद्धीदर |
|---|---|---|---|---|---|
| 1951 | 27.91 | 40.49 | - | 15.56 | - |
| 1961 | 35.08 | 49.26 | 08.77 | 19.80 | 04.24 |
| 1971 | 45.77 | 59.41 | 10.14 | 31.00 | 11.20 |
| 1981 | 57.24 | 70.06 | 10.66 | 43.50 | 12.50 |
| 1991 | 64.87 | 76.56 | 06.50 | 52.32 | 08.82 |
| 2001 | 77.27 | 86.27 | 09.71 | 67.51 | 15.19 |

संदर्भ : मानव विकास अहवाल महाराष्ट्र - 2002 (पान क्र. 78)

**तक्ता क्रमांक 2**

**इयत्तेनुसार गळतीचे प्रमाण (सन 1998 ते 1999)**

| इयत्ता | एकूण टक्केवारी | मुले | मुली | मुले व मुलींच्या गळतीच्या प्रमाणातील फरक |
|---|---|---|---|---|
| 2 | 7 | 8 | 7 | 1 |
| 3 | 7 | 7 | 6 | 1 |
| 4 | 15 | 15 | 14 | 1 |
| 5 | 19 | 18 | 20 | 2 |
| 6 | 27 | 26 | 28 | 2 |
| 7 | 32 | 31 | 34 | 3 |
| 8 | 40 | 37 | 43 | 6 |
| 9 | 44 | 40 | 49 | 9 |
| 10 | 56 | 53 | 60 | 7 |

संदर्भ : मानव विकास अहवाल महाराष्ट्र - 2002 (पान क्र. 78)

वाढल्याचे दिसते. इयत्ता 10वीत एकूण गळतीचे प्रमाण 56 टक्के एवढे असल्याचे दिसते. मुले व मुलींच्या गळतीच्या प्रमाणातील फरक 1 टक्क्यापासून 9 टक्क्यापर्यंत वाढल्याचे निदर्शनास येते. यावरून मुलांच्या गळतीच्या प्रमाणापेक्षा मुलींचे गळतीचे प्रमाण अधिक असल्याचेही स्पष्ट होते. बालकामगार, मुलांना शिक्षणात रस नसणे, कमी गुण, आरोग्य, अभ्यासक्रम इत्यादी अनेक कारणांमुळे अशी गळती लागून मुले या क्षेत्रातून बाहेर पडणे हे या क्षेत्राचे अपयश आहे असे म्हणावयास हरकत नाही. उपस्थिती बाबत खरी माहिती उपलब्ध करून घेणे, गळतीच्या ठोस कारणांचा शोध घेणे, गळतीचा पाठपुरावा करण्यासाठी योग्य त्या पद्धती शोधणे आणि गळती थांबविणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या वेगवेगळ्या पातळीवर गळतीची वेगवेगळी कारणे आहेत. शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ वर्ग जर गळतीचे प्रमाण कमी करण्यात असमर्थ ठरत असेल तर शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत शंका उपस्थित होणे स्वाभाविक आहे. शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ असे म्हणतात की, शिक्षणाचा उद्देश नोकरी मिळविणे हा नसतो, तर हक्काची जाणीव होणे, व्यवहार समजणे, कर्तव्य व्यवस्थित पार पाडता येणे असे असतात. परंतु या ठिकाणी प्रश्न हा उभा राहतो की, एवढ्यासाठी आयुष्याची 24 ते 25 वर्षे विद्यार्थी खर्च करतील काय ? आणि दिवसेंदिवस महाग होणारे शिक्षण विद्यार्थी घेतील काय ? या प्रश्नांची उत्तरे शोधणे आवश्यक आहे.

### जिल्ह्यांतर्गत विषमता

महाराष्ट्रात शिक्षणाबाबतची विषमता फार मोठ्या प्रमाणात दिसून येते. राज्यात सर्वाधिक साक्षरता दर मुंबई जिल्ह्यात 86.82 टक्के आहे. तर सर्वात कमी साक्षरता दर नंदुरबार जिल्ह्यात 56.06 टक्के आहे. म्हणजे दोन जिल्ह्यातील साक्षरता दरात 30.76 टक्के एवढा मोठा फरक आहे. या फरकावरून राज्यातील जिल्ह्यांतर्गत साक्षरतेतील विषमता आपल्या निदर्शनास येते.

तक्ता क्र. 3 मध्ये स्त्री-पुरूषांची जिल्हानिहाय साक्षरता व एकूण साक्षरतेचे प्रमाण

दर्शविले आहे.

तक्ता क्र. 3 वरून सन - 2001 मध्ये महाराष्ट्रात स्त्री साक्षरतेबाबतची विषमता फार मोठ्या प्रमाणात आहे असे दिसून येते. राज्यात सर्वाधिक स्त्री साक्षरता दर मुंबई जिल्ह्यात 82.71 टक्के एवढा दिसून येतो तर सर्वात कमी स्त्री साक्षरता दर नंदुरबार जिल्ह्यात 46.55 टक्के एवढा आहे. म्हणजे दोन जिल्ह्यातील स्त्री साक्षरता दरात 36.16

**तक्ता क्रमांक 3**

**महाराष्ट्रातील स्त्री-पुरूषांचे जिल्हानिहाय साक्षरता प्रमाण : 2001**

| जिल्हे | पुरूष साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | स्त्री साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | एकूण साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | स्त्री-पुरूषांच्या साक्षरतेतील फरक |
|---|---|---|---|---|
| मुंबई | 89.95 | 82.71 | 86.82 | 7.24 |
| मुंबई उपनगरे | 92.65 | 80.39 | 87.14 | 12.26 |
| ठाणे | 86.06 | 75.00 | 81.00 | 11.06 |
| रायगड | 86.40 | 68.06 | 77.32 | 18.34 |
| रत्नागिरी | 86.28 | 65.98 | 75.35 | 20.30 |
| सिंधुदुर्ग | 90.21 | 71.67 | 80.52 | 18.54 |
| नाशिक | 85.19 | 64.16 | 75.10 | 21.03 |
| धुळे | 81.90 | 61.76 | 72.08 | 20.14 |
| नंदुरबार | 66.32 | 46.55 | 56.06 | 19.77 |
| जळगांव | 86.53 | 64.95 | 76.06 | 21.58 |
| अहमदनगर | 86.21 | 64.88 | 75.82 | 21.33 |
| पुणे | 88.55 | 72.32 | 80.78 | 16.23 |
| सातारा | 88.45 | 68.71 | 78.52 | 19.74 |
| सांगली | 86.25 | 65.88 | 76.70 | 20.37 |
| सोलापूर | 82.28 | 60.07 | 71.50 | 22.21 |
| कोल्हापूर | 87.67 | 66.38 | 77.23 | 21.29 |
| औरंगाबाद | 85.07 | 61.28 | 73.63 | 23.79 |
| जालना | 79.17 | 49.25 | 64.52 | 29.92 |
| परभणी | 80.58 | 52.98 | 67.04 | 27.60 |
| हिंगोली | 81.11 | 51.96 | 66.86 | 29.15 |
| बीड | 80.69 | 55.38 | 68.48 | 25.31 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| नांदेड | 81.14 | 55.12 | 68.52 | 26.02 |
| उस्मानाबाद | 82.03 | 57.55 | 70.24 | 24.48 |
| लातूर | 83.63 | 60.28 | 72.34 | 23.35 |
| बुलढाणा | 87.17 | 64.55 | 76.14 | 22.62 |
| अकोला | 89.22 | 73.82 | 81.77 | 15.40 |
| वाशिम | 86.01 | 61.32 | 74.03 | 24.69 |
| अमरावती | 89.28 | 76.21 | 82.96 | 13.07 |
| यवतमाळ | 84.47 | 63.01 | 74.06 | 21.46 |
| वर्धा | 87.70 | 72.80 | 80.50 | 14.90 |
| नागपूर | 90.25 | 77.65 | 84.18 | 12.60 |
| भंडारा | 89.11 | 68.11 | 84.68 | 21.00 |
| गोंदिया | 89.54 | 67.89 | 78.65 | 21.65 |
| चंद्रपूर | 83.19 | 62.56 | 73.07 | 20.63 |
| गडचिरोली | 69.72 | 50.64 | 60.29 | 19.08 |
| महाराष्ट्र | 86.27 | 67.51 | 77.27 | 18.76 |

टक्के एवढा मोठा फरक आहे. या फरकावरून राज्यातील जिल्ह्यांतर्गत स्त्री साक्षरतेतील विषमता आपल्या निदर्शनास येते.

तसेच, सन-2001 मध्ये महाराष्ट्रात जिल्ह्यानिहाय स्त्री साक्षरता आणि पुरूष साक्षरता प्रमाणात सरासरी 18.76 टक्के एवढा मोठा फरक असल्याचे दिसून येते. स्त्री आणि पुरूषांच्या साक्षरता दरातील सर्वाधिक फरक जालना जिल्ह्यात 29.12 टक्के एवढा आहे, तर सर्वात कमी फरक मुंबई जिल्ह्यात 7.24 टक्के एवढा असल्याचे दिसून येते.

**शिक्षणाच्या विविध पातळीवरील मुलींचा सहभाग**

तक्ता क्र. 4 मध्ये प्राथमिक शाळांमधील विद्यार्थिनींची टक्केवारी, उच्च शिक्षणातील विद्यार्थिनींची टक्केवारी व प्राथमिक शाळेतील स्त्री शिक्षकांची टक्केवारी दर्शविली आहे.

तक्ता क्र. 4 वरून असे दिसून येते की, सन - 1960 मध्ये प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थिनींची टक्केवारी 35.8 एवढी होती. ती सन -1998 मध्ये 48.0 टक्के एवढी झाली. म्हणजे राज्यात निर्मितीनंतरच्या 38 वर्षात प्राथमिक शाळांतील विद्यार्थिनींच्या टक्केवारीत केवळ 12.2 टक्के एवढी वाढ झाली आहे.

सन-1960 मध्ये उच्च शिक्षणातील विद्यार्थिनींची टक्केवारी 24.0 होती ती सन-1998 मध्ये वाढून 42.8 टक्के झाली. याचा अर्थ 38 वर्षाच्या काळात शिक्षणातील विद्यार्थिनींच्या टक्केवारीत 18.8 टक्क्यांनी वाढ झाली आहे. ही वाढ प्राथमिक शाळांतील विद्यार्थिनींच्या वाढीपेक्षा

**तक्ता क्रमांक 4**

**शिक्षणाच्या विविध पातळीवरील मुलींचा सहभाग**

| वर्ष | प्राथमिक शाळेमधील विद्यार्थिनींची टक्केवारी | उच्च शिक्षणातील विद्यार्थिनींची टक्केवारी | प्रा. शाळेतील स्त्री शिक्षकांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1960 | 35.8 | 24.0 | 22.1 |
| 1965 | 37.8 | 25.4 | 24.8 |
| 1970 | 39.3 | 25.5 | 26.4 |
| 1975 | 41.3 | 27.4 | 29.1 |
| 1980 | 43.0 | 31.7 | 31.5 |
| 1985 | 44.7 | 32.3 | 35.9 |
| 1990 | 46.0 | 34.7 | 38.4 |
| 1994 | 47.2 | 38.6 | 40.1 |
| 1995 | 48.5 | 38.8 | 41.1 |
| 1996 | 47.6 | 40.6 | 41.1 |
| 1997 | 47.9 | 42.1 | 41.9 |
| 1998 | 48.0 | 42.8 | 41.6 |

संदर्भ : मानव विकास अहवाल महाराष्ट्र - 2002

6.6 टक्के ने अधिक आहे. यावरून असे निदर्शनास येते की, उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या वेगाने वाढली आहे. तसेच त्यामध्ये आणखी वाढ करण्यासाठी बरीच संधी आहे.

सन - 1960 मध्ये प्राथमिक शाळेतील स्त्री शिक्षकांची टक्केवारी 22.1 होती. ती वाढून 1998 मध्ये 41.6 टक्के एवढी झाली आहे. म्हणजे स्त्री शिक्षकांच्या टक्केवारीत 19.5 टक्के एवढी वाढ झाली आहे. यावरून आपण स्त्री शिक्षकांमुळे शाळेत येणाऱ्या मुलींच्या संख्येत भविष्यकाळात वाढ होईल अशी अपेक्षा करू शकतो. परंतु 1998 च्या आकडेवारीची 1997 च्या आकडेवारीशी तुलना करता स्त्री शिक्षकांच्या टक्केवारीत 0.3 टक्क्यांनी घट झाली असल्याचे दिसून येते. यावरून स्त्री शिक्षणाच्या बाबतीत एक पाऊल मागे पडत आहे की, काय असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो.

### जागतिकीकरण आणि शिक्षण

जागतिक व्यापाराबाबतच्या सर्वसाधारण करारात शैक्षणिक सेवांचा समावेश आहे. जागतिकीकरणाचे धोरण सर्व क्षेत्रांना प्रभावित करणारे आहे. त्यामुळे जागतिकीकरणाचे शिक्षण क्षेत्रावरही दूरगामी परिणाम होऊ शकतात. त्याचाच एक परिणाम म्हणून सरकारने राज्यात कायम विनाअनुदानित शाळा, महाविद्यालयांना परवानगी देण्यास सुरूवात केली आहे. त्यामुळे राज्यात अशा शाळा महाविद्यालयांची संख्या वाढत गेल्यास येणाऱ्या काळात या शाळा महाविद्यालयातील संधीचा फायदा तळागाळातील व्यक्तींना आणि मध्यम वर्गियांना मिळू शकेल किंवा नाही, त्याही पेक्षा तळागाळातील व मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलींना शिक्षण मिळू शकेल किंवा नाही ? याबाबत आजच्या या क्षेत्रातील परिवर्तनाच्या प्रक्रियेत निश्चित सांगता येणे कठिण आहे. परंतु अनेक अभ्यासकांनी तळागाळातील व गरजू मुलांना

शिक्षणापासून वंचित राहावे लागेल असे मत व्यक्त केले आहे.

### राज्यातील स्त्री साक्षरतेतील प्रमुख अडचण

स्त्री शिक्षणातील सर्वात महत्त्वाची अडचण म्हणजे महाराष्ट्रातील सामाजिक स्थिती होय. सामाजिक स्थितीमुळे लोकांची मानसिकता रूढीवादी आणि परंपरागत आहे. त्यामुळे ते स्त्री शिक्षण आवश्यक मानत नाहीत. तर अनावश्यक मानतात. मुलींना दुसऱ्या घरचे धन मानतात. त्यामुळे मुलींच्या शिक्षणावरील खर्च हा बोजा समजतात.

बालविवाह करण्याची प्रथा, सुरूवातीपासून मुलींवर घरच्या कामाचा भार, आर्थिक स्थिती व शिक्षणाच्या सोयींची घराजवळ व्यवस्था नसणे इत्यादी कारणांमुळे स्त्री शिक्षणातील गळतीचे प्रमाण वाढत जाते. परंतु हळु हळु समाजाच्या मानसिकतेत बराच बदल झाला आहे.

### उपाय

कोणत्याही देशाच्या, राज्याच्या अथवा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी स्त्री साक्षर होणे अत्यावश्यक आहे. स्त्री साक्षरता वाढीसाठी पुढील उपाय सुचविता येऊ शकतात.

स्त्री साक्षरता दर वाढविण्यासाठी राज्यात अनिवार्य शिक्षा कार्यक्रम सक्तीने लागू केला पाहिजे. तसेच मुलींना शाळेत न पाठविणाऱ्या पालकांविरूद्ध कार्यवाही केली पाहीजे.

स्त्री साक्षरतेतील सर्वात महत्त्वाची अडचण म्हणजे आर्थिक मागासलेपणा होय. आर्थिक मागासलेपणाचा स्त्री शिक्षणावर प्रभाव पडू नये यासाठी सरकारद्वारे गरीब मुलींना दिली जाणारी शिष्यवृत्ती ही नि:पक्षपातपणे आणि योग्य प्रकारे वितरीत केली पाहिजे.

मुलींची शिक्षणातील आवड वाढविण्यासाठी ग्रामीण भागातील शाळेत मुलभूत सुविधा आणि शैक्षणिक साधनांची उपलब्धता असणे आवश्यक आहे.

स्त्री साक्षरता वाढीसाठी ग्रामीण भागामध्ये शाळांतील भौगोलिक अंतर कमी करावे. निवास स्थानाजवळ शिक्षण सुविधा उपलब्ध झाल्यास त्यांच्यात सुरक्षिततेची भावना निर्माण होईल.

महाराष्ट्रात ग्रामीण भागातील जनतेत स्त्री शिक्षणाविषयी जागरूकता निर्माण करावी. त्यामुळे स्त्री शिक्षणाचा विस्तार होऊ शकेल.

शाळेत रिक्त पदावर योग्य शिक्षकांची नियुक्ती ताबडतोब करावी आणि शिक्षकांवर शिक्षण कार्याशिवाय इतर शासकीय कार्य सोपवु नयेत ज्यामुळे शिक्षण कार्यात अडथळा निर्माण होईल.

### निष्कर्ष

मानव विकासात शिक्षण हा एक अविभाज्य घटक आहे. शिक्षणाशिवाय मानवी विकासाचा विचार करता येणे अशक्य आहे. मानव विकासात स्त्री पुरूषांचा समान विकास अभिप्रेत असतो. राज्यात स्त्री साक्षरता दर जर अधिक असेल तर एकूण साक्षरता दर सुद्धा तुलनात्मकदृष्ट्या अधिक असेल. परंतु राज्यात स्त्री-पुरूष साक्षरता दरात 18.76 टक्के एवढा मोठा फरक आहे. सामाजिक स्थिती आणि मानसिकता यामुळे स्त्री शिक्षणातील गळतीचे प्रमाण अधिक असून स्त्री शिक्षणातील सहभाग कमी आहे. जिल्ह्यांतर्गत स्त्रियांच्या साक्षरतेतील विषमता ही पुरूषांच्या जिल्ह्यांतर्गत साक्षरतेतील विषमतेपेक्षा अधिक आहे. त्यामुळे स्त्री पुरूष समानता कायदे असून स्त्रियांचे अनेक हक्क पायदळी तुडविले जातात. त्यामुळे स्त्रियांना अनेक संधी किंवा हक्कांपासून वंचित रहावे लागते.

### संदर्भ सूची

1. गैरोला रामानंद 'उत्तरांचल में महिला साक्षरता' ''कुरूक्षेत्र'' सप्टेंबर 2004.

2. घुगे, व्ही.बी. महाराष्ट्रातील मानवी विकासाची वास्तविकता, ''अर्थसंवाद'' जानेवारी -मार्च 2004/खंड 27, अंक 4.

3. जहागीरदार मुक्ता, मानवी विकास : आशय आणि निष्पत्ती - ''अर्थसंवाद'' जुलै-सप्टेंबर, 2003/खंड 27, अंक -2.

4. टोपकर रेखा - प्राथमिक शिक्षण : एक चिंतन : ''योजना'' ऑगस्ट 2003 अंक 1.

5. ठाकुर राजपूत धोंडीरामसिंह विद्यार्थ्यांच्या गुणात्मक विकासासाठी सर्वंकष प्रयत्न करण्याची गरज -17 ऑगस्ट 2004, लोकमत.

6. दास्ताने संतोष - उच्च शिक्षणाचे अर्थशास्त्र ''अर्थसंवाद'' जानेवारी -मार्च, 2003/खंड 26, अंक 4.

7. नरेन्द्र सिंह और सीमादेवी 'भूमंडलीकरण के दौर में शिक्षा पर प्रभाव''कुरूक्षेत्र'' सप्टेंबर 2004.

8. Balagopalan Sarada - Free and Compulsory Education Bill, 2004 " Economic and Political Weekly" August 7, 2004.

9. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी - विविध अहवाल, सन - 1996-97 ते 2001-2002.

10. महाराष्ट्र शासन, मानव विकास अहवाल, सन- 2002.

11. व्यास श्याम मनोहर ' राजस्थान में साक्षरता' ''कुरूक्षेत्र'' सप्टेंबर 2004.

12. शर्मा. कृष्णकुमार 'साक्षरता और छत्तीसगढ' ''कुरूक्षेत्र'' सप्टेंबर2004.

13. शर्मा मुकेशकुमार 'भारत मे महिला साक्षरता कि स्थिती', ''कुरूक्षेत्र'' सप्टेंबर 2004, पान क्र. 24,25.

14. 'शिक्षणाचे पोषण' -संपादकीय - 17 ऑगस्ट 2004 लोकमत.

15. सगर, पी.एन., बडदे कुणाल महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालय : दशा आणि दिशा - ''योजना'' नोव्हेंबर 2003, अंक -4.


✦✦✦

## मराठी अर्थशास्त्र परिषद
## कार्यवाह–खजिनदार पदातील बदल

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे **सर्जेराव ठोंबरे,** औरंगाबाद यांचा कार्यवाह-खजिनदार पदाचा कार्यकाल दिनांक 31 मार्च, 2005 रोजी पूर्ण झाला. दिनांक 1 एप्रिल, 2005 पासून या पदाची सूत्रे **चारूदत्त गोखले, जळगाव** यांनी स्वीकारली आहेत. तरी सर्व आजीव सदस्य, वार्षिक वर्गणीदार, जाहिरातदार आदी सर्वांनी मराठी अर्थशास्त्र परिषदेशी संबंधित सर्व पत्रव्यवहार, आजीव सदस्य वर्गणी, वार्षिक वर्गणी, अर्थसंवादची वर्गणी या सर्व बाबतीत **चारूदत्त गोखले, जळगाव** यांच्याशीच पुढील पत्त्यावर संपर्क साधावा.

**पत्ता :** 'अक्षय' प्लॉट नं. 10, प्रोफेसर्स कॉलनी
जिल्हा उद्योगकेंद्राचे मागे, जळगाव - 425001

**कार्यवाह-खजिनदार**

# कोल्हापूर शहरातील पगारदार कुटुंबांच्या उपभोग, बचत व गुंतवणूक विषयक सवयींचा तुलनात्मक अभ्यास

✦ विजय ककडे, कोल्हापूर
*प्रपाठक, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.*

✦ ए. व्ही. पाठक, कोल्हापूर
*कमला कॉलेज, कोल्हापूर.*

प्रस्तुत शोधनिबंधात राष्ट्रीय उपयोजित अर्थशास्त्र संशोधन परिषद (National Council of Applied Economic Research) NCAER या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणाचा आधार घेऊन कोल्हापूर शहरातील पगारदार कुटुंबांच्या उपभोग, बचत व गुंतवणूक विषयक सवयींचा तुलनात्मक अभ्यास सादर केला आहे. कुटुंबातील एक व्यक्ती पगारी नोकर असताना व कुटुंबातील एकापेक्षा अधिक व्यक्ती नोकर असताना, दोहोंच्या उपभोग, बचत व गुंतवणूक सवयीत संख्यात्मक व गुणात्मक फरक आढळतो हे या अभ्यासातून स्पष्ट होते.

हा शोध निबंध पाच विभागात विभागला आहे. पहिल्या भागात पगारदार कुटुंबांचे शहरीभागातील प्राबल्य या विषयाची चर्चा केली आहे. दुसऱ्या विभागात, गृहीतके, उद्देश, संशोधन पद्धती व मर्यादा यांचे विवेचन केले आहे. तिसऱ्या विभागात उपभोग, बचत व गुंतवणूक विषयक सवयींचा तुलनात्मक अभ्यास सादर केला आहे. चौथ्या विभागात सर्वसाधारण निष्कर्ष प्रस्तुत केले असून पाचव्या विभागात धोरणात्मक अन्वयार्थ मांडला आहे.

## विभाग पहिला : शहरी भागातील पगारदार कुटुंबांचे प्राबल्य

### प्रस्तावना

NCAER या संस्थेने 2002 साली केलेल्या बाजारपेठेच्या सर्वेक्षणावरून असे स्पष्ट होते की भारतात शहरीभागात पगारी नोकरदारांचे प्रमाण सर्वाधिक आहे. या सर्वेक्षणानुसार, शहरीभागात प्रत्येक 10 कुटुंबांपैकी 4 कुटुंबे पगारी नोकरदारांची आहेत. थोडक्यात शहरीभागातील एकूण कुटुंबांपैकी 40% हिस्सा पगारदारांचा आहे. या संदर्भातील आकडेवारी पुढील तक्त्यात दिली आहे.

तक्ता क्रमांक 1

भारतातील वेगवेगळया व्यावसायिकांची कुटुंब संख्या व प्रमाण

| अ. क्र. | कुटुंब प्रमुखाचा व्यवसाय | ग्रामीण | शहरी (०००) | भारतात (एकूण) |
|---|---|---|---|---|
| 1) | गृहिणी (Housewife) | 1,271 (1.0) | 430 (0.8) | 1701 (1.0) |
| 2) | शेती कसणारे (Cultivators) | 51,171 (1.0) | 1,767 (3.4) | 52,939 (30.0) |
| 3) | मजुरी करणारे (Wage Earners) | 44,192 (35.3) | 10,737 (20.9) | 54,929 (31.1) |
| 4) | पगारी नोकर (Salary Earners) | 14,132 (11.3) | 20,886 (40.7) | 35,018 (19.8) |
| 5) | व्यावसायिक (Professionals) | 919 (0.7) | 1,840 (3.6) | 2,759 (1.6) |
| 6) | कारागीर (Artisans) | 4,271 (3.4) | 3,539 (6.9) | 7,810(4.4) |
| 7) | लहान दुकानदार (Petty Shops) | 6,228 (5.0) | 8,233 (16.1) | 14,461 (8.2) |
| 8) | व्यापारी (Buissnessmen) | 579(0.5) | 1,885(3.7) | 2,464 (1.4) |
| 9) | इतर (Others) | 2,481(2.0) | 1,974(3.8) | 4,455 (2.5) |
| | एकूण | 125,244(100) | 51,291(100) | 1,76,535 (100) |

स्रोत - इकॉनॉमिक टाईम्स 11 मे 2000

तक्ता क्र. 1 वरून असे स्पष्ट होते की भारतात शहरी भागात पगारदारांचा हिस्सा 40.7% इतका सर्वाधिक आहे. महाराष्ट्र राज्यातही पगारदार नोकरांचा हिस्सा मोठा आहे.

### 1.2 वार्षिक उत्पन्न पातळीनुसार वर्गीकरण

NCAER ने उत्पन्न पातळीनुसार कमी उत्पन्न गट, कमी मध्यम उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट, उच्च मध्यम उत्पन्न गट व उच्च उत्पन्न गट अशा

तक्ता क्रमांक 2

पगारदार कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न पातळीनुसार वर्गीकरण

| उत्पन्न गट | वार्षिक उत्पन पातळी (रूपयात) |
|---|---|
| कमी उत्पन्न गट (Lower Income Bracket) | < रू. 40,000 |
| कमी मध्यम उत्पन्न गट (Lower Middle Income Bracket) | रू.40,000-80,000 |
| मध्यम उत्पन्न गट (Middle Income Bracket) | रू.80,000-1,20,000 |
| उच्च मध्यम उत्पन्न गट (Upper Middle Income Bracket) | रू.1,20,000-1,60,000 |
| उच्च्च उत्पन्न गट (Higher Income Bracket) | > रू.1,60,000 |

स्रोत - इकॉनॉमिक टाईम्स 11 मे 2000

प्रकारे, केलेले वर्गीकरण खालील तक्त्यात दिले आहे.

### 3 महाराष्ट्रातील पगारदारांचे प्राबल्य

शहरीभागात पगारदारांचे प्राबल्य भारतात दिल्ली (54%) आंध्रप्रदेश (48%) व महाराष्ट्र (47%) या राज्यात सर्वाधिक आहे. महाराष्ट्रातील पगारदार कुटुंबांची संख्या 5 लाख 20 हजार इतकी प्रचंड आहे. या कुटुंबांचा उत्पन्न गटानुसार हिस्सा खालील तक्ता क्र. 3 मध्ये दिला आहे.

**तक्ता क्र.3**

**उत्पन्न गटानुसार पगारदारांचा हिस्सा**

| कमी उत्पन्न | कमी मध्यम उत्पन्न | मध्यम उत्पन्न | उच्च मध्यम उत्पन्न | उच्च उत्पन्न | एकूण उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| 14.90 | 33.29 | 24.12 | 13.22 | 14.47 | 100.00 |

स्रोत - http//www.ncaer.org/

तक्ता क्रमांक 3 वरून असे स्पष्ट होते की एकूण पगारदार कुटुंबांपैकी महाराष्ट्रात उच्च उत्पन्न गटाचा हिस्सा 14.47% आहे. कमी व कमी मध्यम उत्पन्न गटाचा हिस्सा (14.90 + 33.29) 48.19% इतका मोठा आहे. तर मध्यम व उच्च मध्यम उत्पन्न गटाचा हिस्सा (24.12 +13.22)37.34% इतका आहे.

NCAER ने केलेल्या बाजारपेठ सर्वेक्षणाचा आधार घेऊन कोल्हापूर शहरातील पगारदार कुटुंबांचा उपभोग, बचत व गुंतवणूक विषयक सवयींचा तुलनात्मक अभ्यास केला आहे.

## विभाग दुसरा :गृहीतके, उद्देश, संशोधनपद्धती, मर्यादा

### गृहीतके

सदर अभ्यासात खालील गृहीतके घेतली आहेत.

1) एक व्यक्ती पगारी नोकर, असलेल्या कुटुंबाच्या उपभोग बचत व गुंतवणूक विषयक सवयी व एकापेक्षा अधिक व्यक्ती पगारी नोकर असलेल्या कुटुंबाच्या उपभोग बचत व गुंतवणूक विषयक सवयी, या दोहोत फरक आढळतो.

2) उत्पन्न पातळीनुसार उपभोग पातळी बदलते.

3) रोजगार क्षेत्रानुसार उपभोग पातळी/खर्च बदलतो.

4) स्थावर मालमत्तेचा उपभोगावर परिणाम होतो.

5) कुटुंब प्रमुखाच्या वयाचा उपभोग पातळीवर परिणाम होतो.

6) शिक्षण घेणाऱ्या पाल्यांची संख्या व कुटुंबातील परावलंबी लोकांचे प्रमाण यांचा उपभोग खर्चावर परिणाम होतो.

7) आधुनिक काळात प्रामुख्याने 1981 नंतर स्त्रियांचे रोजगारातील प्रमाण वाढल्याने कुटुंबाच्या उपभोग खर्चावर परिणाम होतो.

8) सहकारी, नातेवाईक यांच्या उपभोग सवयींचा प्रभाव कुटुंबाच्या उपभोगावर होतो.

### उद्देश

वरील गृहीतके लक्षात घेऊन प्रस्तुत अभ्यास खालील उद्देशांनुसार केला आहे.

1) कोल्हापूर शहरातील पगारदार कुटुंबांच्या उपभोग सवयींचा तुलनात्मक अभ्यास करणे.

2) उत्पन्न पातळीचा उपभोग बचत व गुंतवणुकीवरील परिणाम अभ्यासणे.

3) रोजगार क्षेत्राचा (सार्वजनिक, खाजगी, सरकारी) उपभोग बचत व गुंतवणूक परिणाम अभ्यासणे.

4) कुटुंब प्रमुखाच्या वयाचा उपभोग बचत व गुंतवणूक विषयक परिणाम अभ्यासणे.

5) एक व्यक्ती पगारी नोकर असलेल्या कुटुंबाच्या व एकापेक्षा अधिक व्यक्ती पगारी नोकर असलेल्या कुटुंबाच्या उपभोग, बचत व गुंतवणूक सवयींचा तुलनात्मक अभ्यास करणे.

6) पगारी कुटुंबाच्या स्थावर मालमत्तेचा उपभोग बचत व गुंतवणूक परिणाम अभ्यासणे.

**व्याप्ती**

पगारदार कुटुंबाच्या उपभोग सवयींचा अभ्यास ह्या विषयाची व्याप्ती खूप मोठी आहे परंतु संशोधकाच्या मर्यादा लक्षात घेऊन केवळ कोल्हापूर शहरातील पगारी कुटुंबाच्या उपभोग सवयींचा अभ्यास केला आहे. प्रामुख्याने काही विशिष्ट मूलभूत घटक लक्षात घेऊन हा अभ्यास केला आहे. स्त्रियांचे रोजगारातील वाढते प्रमाण व त्याचा कुटुंबाच्या उत्पन्नावरील परिणाम व त्या अनुषंगाने उपभोगावरील परिणामांचा अभ्यास केला आहे म्हणून एका कुटुंबात एकच व्यक्ती पगारी नोकर असेल व एका कुटुंबात एकाहून अधिक व्यक्ती पगारी नोकर असतील (प्रामुख्याने पती व पत्नी) अशा दोहोंचा तुलनात्मक अभ्यास केला आहे.

**संशोधन पद्धती**

महाराष्ट्रात पगारी कुटुंबांची (Salary headed households) संख्या खूप मोठी आहे. (5.4 दशलक्ष) शहरीभागात पगारी कुटुंबाचे प्रमाण 40% पेक्षा अधिक आहे. आर्थिक दृष्ट्या प्रगत व संपन्न, ऐतिहासिक दृष्ट्या शाहू महाराजांचा वारसा असलेले, राजकीयदृष्ट्या अग्रेसर व कलात्मक दृष्ट्या पुढारलेले, शैक्षणिक सुविधांनी युक्त असे शहर म्हणून कोल्हापूर शहराचे महाराष्ट्रात वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे.

**कुटुंबांची निवड**

एक आकडेवारीनुसार कोल्हापूर शहरातील एकूण कुटुंबांची संख्या 1,55,672 इतकी आहे. त्यापैकी 90%कुटुंबे मध्यम उत्पन्न गटात येतात व 5% कुटुंबे कमी उत्पन्न गटात येतात.

संपूर्ण कोल्हापूरातील पगारी नोकरांच्या कुटुंबांची नेमकी आकडेवारी प्रकाशित होत नाही. म्हणून सर्वेक्षणाच्या सोयीसाठी 302 पगाराभिमुख कुटुंबांची निवड केली आहे. त्यासाठी यादृच्छिक नमुना निवड या पद्धतीचा वापर केला आहे.

**कुटुंबांचे वर्गीकरण**

या 302 कुटुंबांचे वर्गीकरण दोन गटात केले आहे.

1) ज्या कुटुंबात एकाच व्यक्तिला वेतन मिळते आहे अशी कुटुंबे (165)

2) ज्या कुटुंबात एकापेक्षा अधिक व्यक्ती वेतनदार आहेत अशी कुटुंबे . (137)

**तुलनात्मक विश्लेषणार्थ निवडलेले प्राचल (Parameters for Comprative analysis)**

कुटुंबांचे सरासरी मासिक विनियोग उत्पन्न, कुटुंबाचा सरासरी मासिक उपभोग खर्च,सरासरी उपभोग प्रवृत्ती,प्रति व्यक्ति सरासरी मासिक उपभोग खर्च,अन्न व अन्नेतर पदार्थावरील मासिक उपभोग खर्च,रोजगार क्षेत्र आणि उपभोग प्रवृत्तीवरील परिणाम,कुटुंब प्रमुखाच्या वयाचा उपभोग प्रवृत्तीवरील परिणाम.स्थावर मालमत्तेचा सरासरी उपभोग प्रवृत्तीवरील परिणाम.कौटुंबिक सहलीवर खर्च, सरासरी बचत प्रवृत्ती, बचत प्रवृत्तीवर वयाचा परिणाम, बचत प्रवृत्तीवर रोजगार क्षेत्राचा परिणाम,बचत प्रवृत्तीवर मालमत्तेचा परिणाम, सरासरी गुंतवणूक प्रवृत्ती,वित्तीय, मानवी, वास्तव गुंतवणूक, या प्राचलांची तुलनात्मक विश्लेषणासाठी निवड केली आहे.

### कालावधी :

तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी 2002-2003 या वर्षातील सरासरी मासिक पगारी उत्पन्न व सरासरी मासिक उपभोग खर्च लक्षात घेतला आहे.

### माहितीचे संकलन

प्रश्नावलीच्या व मुलाखतीच्या आधारे प्राथमिक माहिती संकलित केली आहे. या व्यतिरिक्त लोकसंख्या, स्त्रियांचे रोजगारातील प्रमाण, पगारी नोकरांचे शहरी भागातील प्रमाण, उत्पन्न पातळीनूसार वर्गीकरण या संदर्भातील संदर्भ साहित्याचा आधार घेतला आहे.

### आधार सामग्रीचे संस्करण

प्रश्नावलीच्या आधारे कुटुंबांचे वर्गीकरण दोन गटात केले आहे. उत्पन्न पातळीनुसार कुटुंब प्रमुखाचे वय, कुटुंबातील सदस्यसंख्येनुसार वर्गीकरण - लहान आकाराचे (3), मध्यम आकाराचे (6) व मोठ्या आकाराचे (6 पेक्षा जास्त कुटुंबातील व्यक्ती संख्येनुसार), रोजगारक्षेत्र स्थावर मालमत्ता आणि रोजगाराचे स्त्रीपुरूषांनुसार वर्गीकरण आधार सामग्रीचे संस्करण करतांना लक्षात घेतले आहे.

### विभाग तिसरा : उपभोग, बचत व गुंतवणूक सवयींची तुलना

प्रस्तुत संशोधनात अचूकता आणण्यासाठी सरासरी (Arithmatic Mean), समुह सरासरी (Pooled Mean), विचरण गुणांक (Co-efficient of variation) प्रमाण विचलन (Standard deviation), प्रतिशत हिस्सा इत्यादी संख्याशास्त्रीय साधनांचा आधार घेऊन निष्कर्ष काढलेले आहेत.

### सरासरी मासिक प्राप्ती व सरासरी उपभोग खर्च

या संदर्भातील निष्कर्ष तक्ता क्र. 5 च्या आधारे मांडता येतात.

तक्ता क्र. 6 वरून असे स्पष्ट होते संख्यात्मक व गुणात्मक दृष्ट्या जेथे अनेक व्यक्ती कमावणाऱ्या आहेत त्या कुटुंबातील व्यक्तिंच्या उपभोग सवयी अधिक चांगल्या आहेत. याची कारणमीमांसा पुढील प्रमाणे करता येईल.

एक व्यक्ती कमावती असलेल्या कुटुंबांची सरासरी मासिक प्राप्ती कमी असल्याने कमी प्रतीच्या उपभोग्य वस्तुंचे सेवन करावे लागते.

एकापेक्षा अधिक व्यक्ति पगारदार असलेल्या कुटुंबाची सरासरी मासिक प्राप्ती अधिक असल्याने चांगल्या प्रतीच्या वस्तुंचे सेवन करणे सहज शक्य होते.

### मासिक उपभोग खर्चाचे वर्गीकरण

मासिक उपभोग खर्चाचे वर्गीकरण दोन घटकात केले आहे. अन्न घटकावरील खर्च व अन्नेत्तर घटकांवरील खर्च. अन्न घटकात किराणा, भाजीपाला, फळे, उपहारगृह, बेकरी उत्पादने, दुध व दुग्धजन्य पदार्थ इत्यादी घटक समाविष्ट आहेत तर अन्नेतर घटकात इंधन, वीजबील, पाणीबील, कपडे वाहतूक, करमणूक, सौंदर्यप्रसाधने, घरगुती कामगारांचे वेतन, घरभाडे इत्यादी घटक समाविष्ट केले आहेत. या संदर्भातील माहिती तक्ता क्रमांक 6 मध्ये दिली आहे. या तक्त्याच्या आधारे पुढील निष्कर्ष निघतात.

अनेक व्यक्ती कमावणाऱ्या कुटुंबांचा अन्न घटकावरील व अन्नेत्तर घटकावरील मासिक सरासरी खर्च तुलनेने अधिक आहे कारण त्यांची मासिक प्राप्ती अधिक आहे व चांगल्या प्रतीच्या वस्तुंचे सेवन

**तक्ता क्र. 4**

**नमुना कुटुंबाचे वर्गीकरण**

| अ.क्र. | घटक | एक व्यक्ती पगार कमावणारी कुटुंबे | | एकापेक्षा अधिक व्यक्ती पगार कमावणारी कुटुंबे | |
|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | प्रतिशत हिस्सा | संख्या | प्रतिशत हिस्सा |
| 1. | एकूण नमुना कुटुंबे | 165 | 54.63 | 137 | 45.37 |
| 2. | मासिक उत्पन्नानुसार | | | | |
| अ. | कमी उत्पन्न गट (< रू.6500 ) | 68 | 41.21 | 30 | 21.89 |
| ब. | मध्यम उत्पन्न गट (रू.6501-13000) | 59 | 35.75 | 19 | 13.86 |
| क. | उच्च उत्पन्न गट (> रू.13000) | 38 | 23.04 | 88 | 64.25 |
| | एकूण | 165 | 100.00 | 137 | 100.00 |

अधिक प्रमाणात केले जाते.

एकूण मासिक उपभोग खर्चातील अन्न घटकांचा प्रतिशत हिस्सा एक व्यक्ती कमावत्या कुटुंबात अधिक आहे. (52.01). तर अन्नेत्तर घटकांचा हिस्सा एकापेक्षा अधिक व्यक्ती कमावत्या कुटुंबात जास्त आहे (51.05). याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत. एक व्यक्ती कमावत्या कुटुंबाचे सरासरी आकारमान मोठे आहे व प्रति जोडपे मुलांची संख्या अधिक आहे परिणामी अन्न घटकावरील खर्चाचा हिस्सा मोठा आहे. दुसरे कारण म्हणजे या कुटुंबाचा अन्नेत्तर घटकावरील खर्चाचा हिस्सा कमी आहे. कारण यापैकी काही घटकावरील खर्च टाळता येतात. एक व्यक्ती कमावती असल्याने हा खर्च कमी ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. तिसरे कारण म्हणजे अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबाचे सरासरी आकारमान तुलनेने लहान व प्रती जोडपे मुलांची संख्या कमी असल्याने अन्न घटकावरील खर्चाचा हिस्सा कमी आहे. चौथे कारण म्हणजे अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबाचा अन्नेत्तर घटक खर्चाचा हिस्सा जास्त आहे. घरातील स्त्रिया अर्थार्जनासाठी बाहेर जात असल्याने टिकावू उपभोग्य वस्तुंचा वापर जसे कपड्यांचे धुलाई यंत्र, दूरदर्शन संच, रेफ्रिजरेटर, मिक्सर, वाहने यावरील खर्च अधिक असतो. परिणामी वीज बील, पाणी बील, कपडे, करमणूक, घरगुती कामासाठी ठेवलेल्या कामगारांचे वेतन, सौंदर्य प्रसाधने, पादत्राणे इ. वरील खर्च अधिक असतो. तसेच घरात येणाऱ्या पाहुण्यांची व शेजाऱ्यांची वर्दळ कमी असते कारण या कुटुंबातील स्त्रिया पूर्णवेळ घरी नसतात. परिणामी पाहुणचारावरील खर्च ही कमी असतो.

नमुना कुटुंबांचा अभ्यास करता असे स्पष्ट होते की एकूण नमुना कुटुंबापैकी एकूण मासिक उपभोग खर्चातील 50% हून अधिक हिस्सा अन्न घटकावर खर्च करणाऱ्यांचे प्रमाण एक व्यक्ती कमावत्या कुटुंबात जास्त तर अन्नेत्तर घटकावर 50% हून अधिक हिस्सा खर्च करणाऱ्यांचे प्रमाण अनेक

**तक्ता क्र. 5**

**सरासरी मासिक प्राप्ती व सरासरी मासिक उपभोग खर्च**

| अ. क्र. | घटक | एक व्यक्ती पगार कमावणारी कुटुंबे | एकापेक्षा अधिक व्यक्ती पगार कमावणारी कुटुंबे |
|---|---|---|---|
| 1. | सरासरी मासिक प्राप्ती विनियोग उत्पन्न (Disposable Income)(रूपयात) | 8603.83 | 16458.90 |
| 2. | सरासरी मासिक उपभोग खर्च (रूपयात) | 4916.62 | 6592.48 |
| 3. | कुटुंबाचे सरासरी आकारमान | 4.91व्यक्ति | 4.74व्यक्ति |
| 4. | सरासरी मुलांची संख्या | 2.25 मुले | 2.05 मुले |

व्यक्ती कमावत्या कुटुंबात अधिक आढळते. यावरून असे स्पष्ट होते की एक व्यक्ती पगार कमावती कुटुंबे अन्न घटकावर अधिक खर्च करतात तर अनेक व्यक्ती पगार कमावती कुटुंबे अन्नेतर घटकावर अधिक खर्च करतात. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे एक व्यक्ती कमावत्या कुटुंबाचे सरासरी आकारमान मोठे असल्याने अन्न घटकावरील खर्च कमी केला जातो. अनेक व्यक्ती कमावत्या असल्यामुळे या कुटुंबात अन्नेतर घटकावरही जास्त पैसा खर्च केला जातो.

### दरमाणशी मासिक उपभोग खर्च

मासिक उपभोग खर्चाच्या वर्गीकरणानंतर कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचा मासिक उपभोग

**तक्ता क्र. 6**

**मासिक उपभोग खर्चाचे वर्गीकरण**

| अ. क्र. | घटक | एक व्यक्ती पगार कमावणारी कुटुंबे | एकापेक्षा अधिक व्यक्ती पगार कमावणारी कुटुंबे |
|---|---|---|---|
| 1 | अन्नघटकावरील मासिक सरासरी खर्च व त्यांचा मासिक उपभोग खर्चातील हिस्सा | (रू) 2521.76 (52.01%) | (रू) 3034.21 (48.95%) |
| 2. | अन्नेतर घटकावरील मासिक सरासरी खर्च व त्यांचा मासिक उपभोग खर्चातील हिस्सा | (रू) 2363.34 (47.99%) | (रू) 3493.30 (51.05%) |
| 3. | अन्न घटकावर 50% पेक्षा अधिक उपभोग खर्चातील हिस्सा खर्च करणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण | 60.60%) | 40.14%) |
| 4. | अन्नेतर घटकावर 50% पेक्षा अधिक उपभोग खर्चातील हिस्सा खर्च करणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण | 39.40%) | 59.80%) |

सूचना : वरील सर्व आकडे प्रत्येक नमुना कुटुंबांचा अन्नघटक खर्च व अन्नेत्तर घटक खर्च आणि कुटुंबाच्या उपभोग खर्चातील हिस्सा लक्षात घेवून सरासरी पद्धतीने काढले आहे.

खर्चातील हिस्सा अभ्यासला आहे. यासाठी एकूण मासिक उपभोग खर्चास कुटुंबातील एकूण व्यक्ती संख्येने भागले आहे. या संदर्भातील माहिती तक्ता क्रमांक 7 मध्ये दिली आहे. या तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, एकापेक्षा अधिक व्यक्ती पगार कमावणाऱ्या कुटुंबांचा दर माणशी मासिक उपभोग खर्च तुलनेने जास्त आहे याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या कुटुंबाचा उपभोग खर्च अधिक आहे तर कुटुंबाचे सरासरी आकारमान व मुलांची संख्या कमी आहे. परिणाम भाजक लहान (कुटुंबातील व्यक्ती) व भाज्य मोठे (मासिक उपभोग खर्च) असल्याने भागाकार (दर माणसी उपभोग खर्च) मोठा आला आहे.

यावरून असे स्पष्ट होते की तुलनेने चांगल्या प्रतीच्या उपभोग्य वस्तुंचे सेवन अनेक व्यक्ती कमावणाऱ्या कुटुंबात केले जाते.

दर माणशी उपभोग खर्च जास्त असण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे अनेक व्यक्ती पगार कमावणाऱ्या कुटुंबांची मासिक प्राप्ती अधिक आहे.

**सरारसरी उपभोग प्रवृत्ती**

सरासरी उपभोग प्रवृत्तीने एकूण उत्पन्नातील उपभोग खर्चाचा हिस्सा दर्शविला जातो. (APC=C/y) संशोधनासाठी निवडलेल्या दोन गटातील प्रत्येक कुटुंबाची सरासरी उपभोग प्रवृत्ती काढली आहे. प्रत्येक गटातील कुटुंबाचे वर्गीकरण उत्पन्न पातळीनुसार कमी, मध्यम व उच्च उत्पन्न अशा तीन गटात केले आहे. या तीन गटातील प्रत्येक कुटुंबाची सरासरी उपभोग प्रवृत्ती मोजली आहे त्याआधारे समूह मध्यक पद्धतीचा वापर करून या दोन गटातील कुटुंबांची सरासरी उपभोग प्रवृत्ती मोजली आहे. या संदर्भातील माहितीतक्ता क्र. 8 मध्ये दिली आहे.

या दोन गटातील कुटुंबांचा अभ्यास करता

**तक्ता क्र. 7**

**दरमाणसी सरासरी मासिक उपभोग खर्च**

| घटक | एक व्यक्ती पगार कमावणारी कुटुंबे | एकापेक्षा अधिक व्यक्ती पगार कमावणारी कुटुंबे |
|---|---|---|
| सरासरी दरमाणसी मासिक उपभोग खर्च | रू. 1021.27 | रू. 1428.79 |

असे स्पष्ट होते की सरासरी उपभोग प्रवृत्ती उत्पन्न पातळीनुसार बदलते व वयोगटानुसार बदलते. त्याचप्रमाणे रोजगार क्षेत्राचा व मालमत्तेचा सरासरी उपभोग प्रवृत्तीवर परिणाम होतो. तुलनात्मक अभ्यासावरून असे स्पष्ट होते की तरूण व उतार वयात सरासरी उपभोग प्रवृत्ती जास्त असते पण मध्यम वयात कमी असते. या ठिकाणी जीवन चक्र गृहीतक (The Life Cycle Hypothesis) खरे ठरते. त्याचप्रमाणे मालमत्ताधारक कुटुंबाची सरासरी उपभोग प्रवृत्ती तुलनेने अधिक असते कारण मालमत्तेमुळे आर्थिक पाठबळ प्राप्त होते. त्याचप्रमाणे सार्वजनिक क्षेत्रात वेतन पातळी तुलनेने जास्त असल्याने सरासरी उपभोग प्रवृत्ती कमी असते. याउलट खाजगी क्षेत्रात वेतनपातळी कमी असल्याने व स्पर्धा असल्याने सरासरी उपभोग प्रवृत्ती जास्त असते. सहकार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांची सरासरी उपभोग प्रवृत्ती सरकारी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांपेक्षा अधिक असते कारण वेतन पातळी कमी असते. थोडक्यात रोजगार क्षेत्र, कुटुंब प्रमुखाचे वय व मालमत्ता आणि मासिक उत्पन्न पातळीनुसार सरासरी उपभोग प्रवृत्ती बदलते. या सर्व घटकांचा परिणाम

**तक्ता क्र. 8**

**सरासरी उपभोग प्रवृत्ती (प्रतिशत)**

| अ. क्र. | घटक | एक व्यक्ती पगार कमावणारी कुटुंबे | एकापेक्षा अधिक व्यक्ती पगार कमावणारी कुटुंबे |
|---|---|---|---|
| 1. | सरासरी उपभोग प्रवृत्ती | | |
| | अ. कमी उत्पन्न गट | 80.71 | 79.67 |
| | ब. मध्यम उत्पन्न गट | 56.07 | 54.26 |
| | क. उच्च उत्पन्न गट | 39.58 | 37.67 |
| 2. | समूह मध्यक | 62.42% | 49.16% |
| 3. | रोजगार क्षेत्रानुसार (समूह मध्यक) | | |
| | सार्वजनिक क्षेत्र | 55.64 | 36.57 |
| | खाजगी क्षेत्र | 72.50 | 61.47 |
| | सहकार क्षेत्र | 62.09 | 47.38 |
| 4. | कुटुंब प्रमुखाचे वयानुसार (समूह मध्यक) | | |
| | अ) तरूण वयोगट 22 ते 35 | 67.61 | 50.32 |
| | ब) मध्यम वयोगट 36 ते 45 | 62.48 | 47.71 |
| | क) प्रौढ वयोगट 46 ते 58 | 62.09 | 48.18 |
| 5 | मालमत्ता धारकतेनुसार (समूह मध्यक) | | |
| | अ) मालमत्ता धारक कुटुंबे | 65.41 | 40.89 |
| | ब) विना मालमत्ता कुटुंबे | 61.15 | 52.02 |

कुटुंबांच्या उपभोग खर्चावर म्हणजेच सरासरी उपभोग पातळीवर होतो.

सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांची सरासरी उपभोग प्रवृत्ती अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबात तुलनेने कमी आहे. कारण अनेक व्यक्ती सार्वजनिक क्षेत्रात रोजगारात असल्याने मिळणारे लाभ व वेतन अधिक असते. खाजगीक्षेत्रातील कर्मचाऱ्यांची सरासरी उपभोग प्रवृत्ती एक व्यक्ती पगार कमावणाऱ्या कुटुंबात तुलनेने जास्त असते कारण एकच व्यक्ती कमावता असल्याने मासिक मिळकत कमी असते. सहकार क्षेत्रातील एक व्यक्ती पगार कमावणाऱ्या कुटुंबाची सरासरी उपभोग प्रवृत्ती तुलनेने जास्त असते कारण वेतन पातळी तुलनेने कमी असते.

सर्वच वयोगटातील कुटुंबांची सरासरी उपभोग प्रवृत्ती एकापेक्षा अधिक व्यक्ती कमावत्या गटात कमी असते याचे महत्त्वाचे कारण म्हणजे अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबांची मासिक प्राप्ती जास्त असते त्याचप्रमाणे कमावत्या स्त्रियांची बचत प्रवृत्ती अधिक असते कारण उत्पन्न मिळविताना होणाऱ्या कष्टाची त्यांना कल्पना असते.

मालमत्ताधारक अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबांची सरासरी उपभोग प्रवृत्ती तुलनेने कमी असते

कारण मालमत्ता व एकाहून अधिक व्यक्ती कमावत्या असल्याने कुटुंबांची प्राप्ती अधिक असते.

थोडक्यात एक व्यक्ती पगार कमावत्या कुटुंबांची सरासरी उपभोग प्रवृत्ती अधिक व एकाहून अधिक व्यक्ती कमावत्या कुटुंबांची सरासरी उपभोग प्रवृत्ती कमी असण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

**1. उत्पन्न पातळीत तफावत :**

एक व्यक्ती पगार कमावणाऱ्या कुटुंबांची सरासरी मासिक उत्पन्न पातळी तुलनेने कमी आहे व एकापेक्षा अधिक व्यक्ती पगार कमावणाऱ्या कुटुंबांची सरासरी अधिक उत्पन्न पातळी तुलनेने जास्त आहे. त्यानुसार पहिला गट आपल्या उत्पन्नातील मोठा हिस्सा व दुसरा गट तुलनेने कमी हिस्सा उपभोगावर खर्च करतात.

**2. उत्पन्न गटाचा हिस्सा :**

एक व्यक्ती कमावत्या गटात कमी उत्पन्न गटाचा हिस्सा मोठा आहे. (41.21) त्याची सरासरी उपभोग प्रवृत्ती जास्त असते या उलट अनेक व्यक्ती कमावत्या गटात उच्च उत्पन्न गटाचा हिस्सा मोठा आहे (64.25) त्यांची सरासरी उपभोग प्रवृत्ती कमी असते.

**3. विविध वयोगटाचा हिस्सा :**

मध्यम वयोगटाचा हिस्सा अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबात जास्त आहे. ज्यांची स.उ.प्र. कमी असते व प्रौढ वयोगटाचा हिस्सा एक व्यक्ती कमावत्या कुटुंबात जास्त आहे त्यांची स.उ.प्र. अधिक असते.

**4. रोजगार क्षेत्र :**

सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचा हिस्सा अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबात अधिक आहे परिणामी त्यांची स.उ.प्र. कमी व खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचा हिस्सा एक व्यक्ती कमावत्या कुटुंबात जास्त असल्याने स.उ.प्र. अधिक आहे.

**5. कुटुंबाचे आकारमान :**

सरासरी कुटुंबांचे आकारमान एक व्यक्ती कुटुंबात मोठे असल्याने उपभोग खर्च जास्त व अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबात कमी आकारमानाचे कुटुंब आढळते परिणामी स.उ.प्र. कमी आहे.

**6. मालमत्ताधारक कुटुंबे :**

मालमत्ताधारक कुटुंबांचे प्रमाण एक व्यक्ती कमावत्या कुटुंबात तुलनेने जास्त असल्याने उ.प्र. अधिक असते.

**7.लहान आकाराचे कुटुंब :**

लहान आकारमानाची कुटुंबे अनेक व्यक्ती कमावत्या गटात तुलनेने जास्त आहेत. 15.32% तर एक व्यक्ती कमावत्या गटात हा हिस्सा 2.42 % आहे म्हणून सरासरी उपभोग प्रवृत्ती एक व्यक्ती कमावत्या कुटुंबात जास्त आहे.

**8. निर्णय स्वातंत्र्य :**

एक व्यक्ती कमावत्या कुटुंबात प्रामुख्याने कमावत्या पुरूषाकडून सर्व निर्णय घेतले जातात पण अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबात अनेकांचा प्रभाव उपभोग निर्णयावर होत असतो.

**कौटुंबिक सहलीवरील खर्च**

एक व्यक्ती पगार मिळविणारी कुटुंबे व एकापेक्षा अधिक व्यक्ती पगार मिळविणारी कुटुंबे यांचा कौटुंबिक सहलीवर खर्च व कौटुंबिक सहलीला जाणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण यांचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. त्या संदर्भातील सांख्यिकीय तुलनात्मक माहिती तक्ता क्र. 9 मध्ये दिली आहे.

**तक्ता क्रमांक 9**

**कौटुंबिक सहल खर्च (1998-03)**

| गट | सहलखर्च | सहलीला जाणाऱ्या कुटुंबाचे प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|
| एक व्यक्ती पगार मिळविणारी कुटुंबे | 150-85,000 | 48.48 |
| एकापेक्षा अधिक व्यक्ती पगार मिळविणारी कुटुंबे | 200-1,00,000 | 55.47 |

या तक्त्याचा अभ्यास करता असे स्पष्ट होते की अनेक व्यक्ती पगार कमविणारी कुटुंबे तुलनेने अधिक पैसा सहलीवर खर्च करतात तसेच सहलीला जाणाऱ्या कुटुंबांची संख्या व प्रमाणही तुलनेनें जास्त आहे या मागील महत्त्वाची कारणे पुढील प्रमाणे आहेत.

उत्पन्न पातळी जास्त असल्याने सहल खर्च पेलण्याची आर्थिक क्षमता अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबात जास्त असते.

अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबातील स्त्रिया अर्थार्जनासाठी घराबाहेर जात असतात. त्यामुळे कौटुंबिक जीवनाचा उपभोग घेण्यासाठी सहलीला प्राधान्य दिले जाते.

अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबातील मुलांची संख्या कमी असल्याने म्हणून सहलींचा खर्च करणे तुलनेने सुलभ जाते.

अनेक व्यक्ती कमावते कुटुंबे विभक्त कुटुंब पद्धतीचा सर्वसाधारणपणे अवलंब करतात परिणामी सहलींचे निर्णय स्वातंत्र्य असते.

अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबात सरकारी क्षेत्रातील रोजगाराचे प्रमाण अधिक असल्याने प्रवासार्थ मिळणारी सवलत (L.T.C.) व सुविधा उपलब्ध असते परिणामी सहलीचे आयोजन केले जाते.

**3.2 बचत सवयी**

उत्पन्नातील जो हिस्सा उपभोगावर खर्च केला जात नाही त्यास बचत असे म्हणतात. पगारी कुटुंबाच्या उपभोग सवयीच्या आधारे बचत सवयींचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. त्यासाठी खालील घटक विचारात घेतले आहेत.

1. सरासरी बचत प्रवृत्ती
2. कुटुंब प्रमुखाचे वय व सरासरी बचत प्रवृत्ती
3. रोजगार क्षेत्र व सरासरी बचत प्रवृत्ती
4. मालमत्ता व सरासरी बचत प्रवृत्ती
5. बचती ठेवण्यासंदर्भातील वित्त संस्थांना प्राधान्य

तक्ता क्रमांक 10 मध्ये बचतीबाबतची माहिती दिलेली आहे.

एक व्यक्ती पगार मिळविणाऱ्या कुटुंबांशी तुलना करता अनेक व्यक्ती पगार मिळविणाऱ्या कुटुंबांची सरासरी बचत प्रवृत्ती अधिक असते कारण पहिल्या गटाची सरासरी उपभोग प्रवृत्ती तुलनेने जास्त आहे. याचा अर्थ पहिला गट उत्पन्नातील मोठा हिस्सा उपभोगावर खर्च करतो परिणामी सरासरी बचत प्रवृत्ती तुलनेने कमी असते.

एक व्यक्ती कमावणाऱ्या कुटुंबांशी तुलना करता अनेक व्यक्ती पगार मिळविणाऱ्या कुटुंबांची मासिक प्राप्ती/उत्पन्न अधिक असते परिणामी बचत क्षमता जास्त असते.

एक व्यक्ती कमावणाऱ्या कुटुंबाचे सरासरी आकारमान मोठे असल्याने उपभोग खर्च जास्त होतो

तक्ता क्र. 10

बचत सवयी

| अ. क्र. | घटक | पगार कमावणारी कुटुंबे | |
|---|---|---|---|
| | | एक व्यक्ती गट | एकापेक्षा अधिक व्यक्ती गट |
| 1. | सरासरी बचत प्रवृत्ती (स.ब.प्र.) (समूह सरासरी) | 37.58 | 50.84 |
| 2. | धनात्मक सरासरी बचत प्रवृत्ती असणाऱ्या कुटुंबांचा हिस्सा | 84.84 | 99.81 |
| 3. | ऋणात्मक सरासरी बचत प्रवृत्ती असणाऱ्या कुटुंबांचा हिस्सा | 11.53 | 2.91 |
| 4. | सरासरी बचत प्रवृत्ती | | |
| | तरूण वयोगट | 32.29 | 49.68 |
| | मध्यम वयोगट | 37.52 | 52.29 |
| | प्रौढ वयोगट | 37.91 | 50.82 |
| 5 | सरासरी बचत प्रवृत्ती | | |
| | सार्वजनिक क्षेत्रात रोजगारात असणारी व्यक्ती | 44.36 | 63.43 |
| | खाजगी क्षेत्रात रोजगारात असणारी व्यक्ती | 27.50 | 38.53 |
| | सहकारी क्षेत्रात रोजगारात असणारी व्यक्ती | 37.91 | 52.62 |
| 6 | मालमत्ताधारक कुटुंबांची स.ब.प्र. | 34.59 | 59.10 |
| 7 | मालमत्ता विरहीत कुटुंबांची स.ब.प्र. | 38.85 | 47.98 |

व बचत कमी असते.

अनेक व्यक्ती कमावणाऱ्या कुटुंबांचे सरासरी आकारमान तुलनेने लहान असल्याने उपभोग खर्च कमी असतो व बचती जास्त असतात.

अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबात स्त्रिया कमावत्या असल्यास त्यांची बचत प्रवृत्ती तुलनेने जास्त असते कारण अर्थार्जनाच्या कष्टाची जाणीव असते.

रोजगार क्षेत्राचा परिणाम बचत प्रवृत्तीवर होतो. स्थूलमानाने सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांची बचत प्रवृत्ती जास्त असते कारण त्यांची वेतन पातळी अधिक असते.

खाजगी क्षेत्रातील व सहकारी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांची बचत क्षमता कमी असते कारण त्यांचे वेतन कमी असते.

कुटुंब प्रमुखाच्या वयाचा परिणाम बचत प्रवृत्तीवर होतो. तरूण वयात व प्रौढ वयात बचत प्रवृत्ती कमी असते व मध्यम वयात बचत प्रवृत्ती जास्त असते.

मालमत्ता धारणेचा परिणाम बचतीवर होतो

मालमत्ता धारकांची बचत प्रवृत्ती कमी असते कारण मालमत्तेच्या रूपाने आर्थिक पाठबळ असते पण मालमत्ता नसलेल्यांची स.ब.प्र. अधिक असते कारण आर्थिक तरतुद पगारी वेतनातूनच करावी लागते.

### बचती व वित्तीय संस्थांना प्राधान्य

बचतीच्या संदर्भातील वित्त संस्थांना दिले जाणारे प्राधान्य यांचा तुलनात्मक माहिती तक्ता क्र. 11 मध्ये दिली आहे.

**तक्ता क्र. 11**
**वित्त संस्थांना प्राधान्य**

| वित्त संस्था | पगारी कुटुंबांचे प्राधान्य | |
|---|---|---|
| | एक व्यक्ती कुटुंबे | अनेक व्यक्ती कुटुंबे |
| टपाल बचत | प्रथम | द्वितीय |
| जीवन विमा निगम | द्वितीय | प्रथम |
| राष्ट्रीयकृत बँका | तृतीय | तृतीय |

या तक्त्यावरून असे स्पष्ट होते की एक व्यक्ती पगार मिळविणारी कुटुंबे बचतीसाठी टपाल कार्यालयातील बचत योजनांना प्राधान्य देतात, कारण तेथील पैसे सुरक्षित असतात. तसेच पैसे काढण्यावर बंधने असतात. परिणामी सक्तीची बचत होते.

दुसरा अग्रक्रम आयुर्विम्यास (LIC) ला दिला जातो कारण धोक्याचे निवारण होते. तिसरा क्रमांक राष्ट्रीयकृत बँकांना दिला जातो कारण कमी व्याज असूनही तिथे जमा केलेल्या रकमा सुरक्षित असतात अशी जनभावना असते. परंतु अनेक व्यक्ती कमावणारी कुटुंबे आयुर्विम्या (LIC) ला प्रथम क्रमांक देतात कारण ते विमा पॉलीसीचे हप्ते वेळेवर भरू शकतात. अनेक व्यक्ती कमावत्या असल्याने हप्ता भरण्यात नियमितता राखता येते. तसेच धोक्याचे निवारण करता येते.

### गुंतवणूक सवयी

गुंतवणुकीचा अभ्यास करताना तीन प्रकारची गुंतवणूक विचारात घेतली आहे. वास्तव गुंतवणूक, वित्तीय गुंतवणूक मानवी साधनसंपत्तीतील गुंतवणूक.

वास्तव गुंतवणुकीत पेट्रोल वाहने, घरगुती वापरण्याच्या टिकाऊ वस्तू व घर खरेदी इत्यादीतील गुंतवणूक विचारात घेतली आहे. वित्तीय गुंतवणूक ह्या शब्दात सोन्याच्या स्वरूपातील व शेअर्समधील गुंतवूणक अभिप्रेत आहे. तर मानवी साधनसंपत्ती अंतर्गत मुलांच्या शिक्षणावरील खर्च विचारात घेतला आहे.

### तुलनात्मक अभ्यासाचे घटक

सरासरी गुंतवणूक प्रवृत्ती, पेट्रोल वाहनांची संख्या, घरगुती वापरावयाच्या टीकाऊ उपभोग्य वस्तुंची संख्या, गृह कर्ज हप्ते, सोन्याच्या स्वरूपातील गुंतवणूक, शेअर्समधील गुंतवणूक मुलांच्या शिक्षणावरील गुंतवणूक, इ. घटकांबाबतची माहिती तक्ता क्र.12 मधे दिलेली आहे.

एक व्यक्ती कमावत्या कुटुंबाची सरासरी गुंतवणूक प्रवृत्ती ही अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबांपेक्षा कमी आहे कारण पहिल्या गटाची सरासरी उपभोग प्रवृत्ती जास्त व बचत प्रवृत्ती कमी. बचत व गुंतवणूकसमानता लक्षात घेवून सरासरी बचत प्रवृत्तींवरून गुंतवणूक प्रवृत्ती मोजली आहे.

अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबातील टिकाऊ उपभोग्य वस्तुंची संख्या पेट्रोल वाहन धारकांचे प्रमाण, सोन्याचे साठे, घरकर्जे भरणाऱ्यांचे प्रमाण, शेअर्समध्ये गुंतवणूक करणाऱ्यांचे प्रमाण तुलनेने जास्त आहे याची महत्त्वाची कारणे पुढील प्रमाणे

**तक्ता क्र. 12**

**तुलनात्मक गुंतवणूक सवयी**

| अ.क्र. | घटक | पगारी कुटुंबांचे प्राधान्य | |
|---|---|---|---|
| | | एक व्यक्ती | एकाहून अधिक व्यक्ती |
| 1. | सरासरी गुंतवणूक प्रवृत्ती | 37.58 | 50.84 |
| 2. | पेट्रोल वाहन धारक कुटुंबांचे प्रमाण | 56.96 | 75.18 |
| 3. | गृह कर्ज हप्ते भरणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण | 50.30 | 62.06 |
| 4. | घरगुती टिकावू उपभोग्य वस्तुंची सरासरी संख्या | 7.68 | 10.59 |
| 5. | कुटुंबातील सरासरी सोन्याचे साठे | 31.96 | 55.15 |
| 6. | शेअर्समध्ये गुंतवणूक करणारी कुटुंबे | 10.30 | 28.40 |
| 7. | शिक्षणावरील खर्च दरमहा रूपयात | 83-3750 | 20-15,000 |
| 8. | मासिक उत्पन्नातील शिक्षण खर्चाचा हिस्सा | 5.70 | 3.68 |

आहेत.

अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबातील स्त्रिया नोकरीसाठी बाहेर जात असल्याने या टिकाऊ उपभोग्य वस्तुंची आवश्यकता जास्त असते कारण घरगुती कामाचा वेळ कमी करणे आवश्यक असते.

घरगुती कामगारांच्या समस्या अधिक आहेत. प्रामुख्याने घरगुती काम करणाऱ्या स्त्री कामगार नियमितपणे योग्य वेळेवर कामास येत नाहीत. त्यांची वाट बघण्यात वेळ घालविण्यापेक्षा यंत्राच्या सहाय्याने ही कामे केली जातात.

अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबात नोकरीवर जाण्यासाठी अधिक वाहनांची आवश्यकता असते कारण वाहनांमुळे वेळेची बचत होते तसेच वाहतूक खर्चाची बचत होते म्हणून पेट्रोल वाहने खरेदी केली जातात. तसेच सहकारी मित्र यांच्या राहणीमानाचा परिणाम होतो.

घर कर्ज हप्ते भरणाऱ्याचे प्रमाण अनेक व्यक्ती कमावणाऱ्या नमुना कुटुंबात जास्त आहे कारण अनेक व्यक्ती कमावणाऱ्या असल्याने हप्ते भरणे सुलभ जाते व मासिक प्राप्ती अधिक असते.

घरातील गुंतवणूक ही राहण्याची सोय उपलब्ध करून देते. त्याचप्रमाणे ती किफायतशीर गुंतवणूक आहे कारण घराच्या किमती सर्वसाधारणपणे वाढत असतात.

घरातील गुंतवणूक ही सुरक्षित गुंतवणूक असते .

गृह कर्जासाठी प्राप्तीकर सवलत मिळते.

घर बांधणे/विकत घेणे ही एक सामाजिक प्रतिष्ठेची बाब समजली जाते परिणामी घर कर्ज घेवून घर बांधणी केली जाते.

विविध वित्त संस्था घरासाठी, वाहनासाठी,

शिक्षणासाठी कर्ज देतात एकाहून अधिक व्यक्ती कमावणारी कुटुंबे हे हप्ते भरू शकतात.

सोन्याच्या स्वरूपातील गुंतवणूक ही अनेक व्यक्ती कमावणाऱ्या कुटुंबांकडून अधिक प्रमाणात केली जाते कारण कुटुंबाची मासिक प्राप्ती अधिक असते. स्त्रिया अर्थार्जन करत असल्याने आपले सोने परिधान करण्याची इच्छा त्या पूर्ण करू शकतात. तसेच मुला-मुलींच्या लग्नासाठी सोने स्वरूपात गुंतवणूक केली जाते. सोन्यातील गुंतवणूक तरल असते कारण अडचणीच्या काळात सोने विकून रोख रक्कम उभी करता येते. सोन्यातील गुंतवणूक ही फायदेशीर गुंतवणूक असते कारण स्थूलमानाने सोन्याच्या किंमती वाढत असतात.

शेअर्स मध्ये गुंतवणूक करण्याची सर्वांचीच प्रवृत्ती कमी आढळते याचे कारण शेअर बाजाराचे अज्ञान, शेअर घोटाळा,धोका न पत्करण्याची प्रवृत्ती असते. अनेक व्यक्ती कमावणारी कुटुंबे मोठ्या प्रमाणात शेअर्समध्ये गुंतवणूक करतात कारण एकापेक्षा अधिक व्यक्ती कमावत्या असल्याने धोका स्वीकारण्याची तयारी असते.

मानवी साधनसंपत्तीवरील गुंतवणूक शिक्षण खर्च या घटकाच्या आधारे तपासली आहे . शिक्षणावरील खर्चाचा विचार करता अनेक व्यक्ती कमावती कु टुंबे अधिक खर्च करतात कारण एकापेक्षा जास्त व्यक्ती कमावत्या असतात. मुलांची संख्या या कुटुंबात कमी असते.

## विभाग 4 – सर्वसाधारण निष्कर्ष

एक व्यक्ती पगार कमावणारी कुटुंबे व एकापेक्षा अधिक व्यक्ती पगार कमावणारी कुटुंबे यांच्या उपभोग, बचत व गुंतवणूक यांच्या सवयीत संख्यात्मक व गुणात्मक फरक आढळतो.

### उपभोग सवयी

अनेक व्यक्ती कमावणाऱ्या कुटुंबाच्या उपभोग्य वस्तूंचा दर्जा अधिक चांगला असतो कारण उत्पन्न पातळी जास्त, कुटुंबाचे आकारमान लहान व उपभोग खर्च जास्त असतो.

मासिक उपभोग खर्च अनेक व्यक्ती कमावणाऱ्या कुटुंबाचा जास्त असतो कारण चांगल्या प्रतिच्या वस्तुंचे सेवन केले जाते.

मासिक उपभोग खर्चात अन्न घटकांचा हिस्सा एक व्यक्ती कमावणाऱ्या कुटुंबात जास्त तर अन्नेत्तर घटकांचा हिस्सा अनेक व्यक्ती कमावणाऱ्या कुटुंबात जास्त असतो.

कौटुंबिक सहलीला जाणाऱ्यांचे प्रमाण अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबात जास्त असते. कारण आर्थिक क्षमता अधिक असते.

दरमाणशी मासिक सरासरी उपभोग खर्च अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबात अधिक कारण तुलनेने उपभोग खर्च जास्त व कुटुंबाचे आकारमान लहान असते.

सरासरी उपभोग प्रवृत्तीवर उत्पन्न पातळी, कुटुंब प्रमुखाचे वय, रोजगार क्षेत्र, मालमत्ता, अनुकरण या सर्वांचा परिणाम होतो.

एक व्यक्ती कमावत्या कुटुंबाची सरासरी उपभोग प्रवृत्ती जास्त कारण उत्पन्न कमी व उपभोग खर्च तुलनेने जास्त असतो.

अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबांची सरासरी उपभोग प्रवृत्ती कमी असते कारण उत्पन्न पातळी अधिक असल्याने उपभोग खर्चाचा सरासरी हिस्सा कमी असतो.

### बचत सवयी

एक व्यक्ती कमावणाऱ्या कुटुंबांची सरासरी

बचत प्रवृत्ती तुलनेने कमी असते कारण या कुटुंबांची सरासरी उपभोग प्रवृत्ती जास्त असते.

सरासरी बचत प्रवृत्तीवर रोजगार क्षेत्र, कुटुंब प्रमुखाचे वय, मालमत्ता, कुटुंबाचे आकारमान इत्यादी घटकांचा परिणाम होतो.

अनेक व्यक्ती कमावती कुटुंबे व एक व्यक्ती कमावती कुटुंबे यांच्या वित्त संस्थांच्या प्राधान्यात फरक आढळतो. एक व्यक्ती कमावती कुटुंबे, पोस्टात बचत ठेवण्यास प्रथम प्राधान्य देतात कारण त्यांना आर्थिक सुरक्षितता वाटते तसेच अनेक व्यक्ती कमावती कुटुंबे जीवन वीमा निगम या संस्थेस प्रथम प्राधान्य देतात कारण विमा हप्ते नियमीतपणे भरता येतात व जीवन सुरक्षित होते.

### गुंतवणूक सवयी

सरासरी गुंतवणूक प्रवृत्ती ही अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबांची जास्त असते कारण त्यांची बचत प्रवृत्ती अधिक असते व उपभोग प्रवृत्ती कमी असते.

अनेक व्यक्ती कमावती कुटुंबे पेट्रोल वाहने, घरगुती वापरण्याच्या टिकाऊ उपभोग्य वस्तू, घर बांधणी/खरेदी सोने व मुलांचे शिक्षण आणि शेअर्समधील गुंतवणूक तुलनेने जास्त करतात कारण त्यांची आर्थिक क्षमता अधिक असते.

थोडक्यात एक व्यक्ती कमावती कुटुंबे व अनेक व्यक्ती कमावती कुटुंबे यांच्या उपभोग, बचत व गुंतवणूक सवयीत संख्यात्मक व गुणात्मक फरक आढळतो. अनेक व्यक्ती पगार कमावणाऱ्या कुटुंबांचा उपभोग, बचत व गुंतवणूक दर्जा सर्वसाधारणपणे तुलनेने अधिक चांगला असतो.

### विभाग -5 धोरणात्मक अन्वयार्थ

वरील संशोधनाच्या आधारे खालील प्रमाणे धोरणात्मक अन्वयार्थ काढता येतो.

1. अनेक व्यक्ती पगार कमावणाऱ्या कुटुंबांनी आपल्या कुटुंबांचे आकारमान वाढविल्यास ते खर्च पेलू शकतात व मुलांना चांगले जीवनमान, शिक्षण देवून भावी पिढी, सुदृढ, सक्षम बनवू शकतात. एक व्यक्ती कमावणाऱ्या कुटुंबांनी आपल्या कुटुंबातील सदस्यांची संख्या मर्यादित ठेवावी.

2. एक व्यक्ती कमावती कुटुंबे व अनेक व्यक्ती कमावती कुटुंबे यांच्या उपभोग दर्जात तफावत आढळते. अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबात टिकाऊ उपभोग्य वस्तुंचा अधिक वापर आढळतो परिणामी त्या कुटुंबातील व्यक्तींना अशा वस्तु सेवनाची गरज नसतानाही सवय लागते. परिणामी शारिरीक कष्ट करण्यास ते तयार नसतात याचा अनिष्ट परिणाम आरोग्यावर होवू शकतो. म्हणून या कुटुंबांनी टिकाऊ उपभोग्य वस्तुंचा वापर (वाहने,TV, Mobile इत्यादी)कमी ठेवावा.

3. अन्नेत्तर घटकावरील अनेक व्यक्ती कमावत्या कुटुंबांचा खर्च जास्त असतो. हा खर्च टाळण्यासारखा असतो/कमी ठेवता येतो. हा खर्च कमी करून उत्पादक गुंतवणूकीसाठी वापरावा. परिणामी देशाच्या भांडवल उभारणीत सहाय्य होईल.

4. रोजगारातील स्त्रियांचे प्रमाण पुरूषांपेक्षा कमी आढळते. स्त्रियांचा अर्थार्जनातील सहभाग कसा वाढवता येईल. या दृष्टीने राष्ट्रीय पातळीवर कार्यक्रम आखावेत. उदा. हुशार मुलींना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, स्त्रियांना रोजगारात आरक्षण.

5. भारतीय स्त्री कर्मचाऱ्यांना अर्थार्जनाबरोबर कौटुंबिक जबाबदारी ही पार पाडावी लागते त्या अनुषंगाने महिला कर्मचाऱ्यांसाठी काही तरतुदी करणे आवश्यक आहे. उदा. निवृत्तीचे वय कमी असावे, किरकोळ रजा एक दोन अधिक

असाव्यात, प्राप्तीकर प्रमाणीत वजावट थोडी वाढवावी इत्यादी.

6. बचत सवयींच्या बाबतीत कुटुंबांनी सोने, चांदी यात गुंतवणूक न करता वित्तीय व वास्तव गुंतवणूकीस प्राधान्य द्यावे.

7. लोकांच्या बचती आकर्षित करण्यासाठी बँकांनी देखील विमा योजना राबवाव्यात.

8. शेअर बाजारातील गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी, या संस्थांनी काही किमान परताव्याची हमी द्यावी तसेच या संदर्भातील कार्यशाळांचे आयोजन करावे.

9. गुंतवणूकीच्या बाबतीत मानवी साधनसंपत्तीतील गुंतवणूक तुलनेने कमी आहे. भारतीयांची शिक्षणावर गुंतवणूक करण्याची तयारी नाही कारण शिक्षण ही सरकारची जबाबदाची आहे अशी भावना रूढ झाली आहे पण या जागतिकीकरणाच्या युगात टिकाव लागण्यासाठी मुलांच्या शिक्षणावर खर्च करणे आवश्यक आहे.

### संदर्भ सूची


1. Shapiro E. Macro Economic Analysis, Harecourt Srace Inc., New York, 1974.

2. Samuelson and Nordhous : Economics. Mc. Grow Hill Book Company 1976 Twelth edition 1985.


✦✦✦


## मराठी अर्थशास्त्र परिषद

## आवाहन

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या कार्याची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे. परिषदेची स्वत:च्या मालकीची वास्तू असावी व त्यासाठी परिषदेच्या प्रत्येक आजीव सभासदाने प्रत्येकी किमान एक हजार रू. द्यावेत असा ठराव परिषदेच्या रौप्य महोत्सवी अधिवेशनात एकमताने मंजूर करण्यात आला होता. आतापर्यंत फक्त 62 आजीव सभासदांनी निधी दिला असून 2,22,884/- रू. जमा झाले आहेत.

परिषदेचे आज 1100 च्या वर सभासद आहेत. त्यामुळे 10 ते 11 लाख रू. जमा व्हायला हरकत नसावी असे वाटते. दिवसेंदिवस जागेची किंमत व बांधकामाचा खर्च वाढत आहेत. सर्व सभासदांना पुन्हा एकदा नम्र विनंती आहे की ज्यांनी अजून इमारत निधी दिला नसेल त्यांनी किमान रू. 1000/- इतक्या रकमेचा बँक विकर्ष (डिमांड ड्राफ्ट) मराठी अर्थशास्त्र परिषद या नावाने काढून कार्यवाह-खजिनदारकडे पाठवावा. आपल्या सर्वांच्या सहकार्याशिवाय वास्तू उभी राहणे अशक्य आहे. कृपया सहकार्य करावे ही विनंती.

**चारूदत्त गोखले,**
कार्यवाह -खजिनदार

# पाणी व्यवस्थापनाची आदर्श पध्दत : पांझरा नदी खोऱ्यातील फड पध्दतीचा विशेष अभ्यास

✦ श्रीराम जोशी, जळगाव.
*मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव.*
✦ कारभारी दिवटे, धुळे.
*मा.ध. पालेशा वाणिज्य महाविद्यालय, धुळे.*

धुळे जिल्हयातील पांझरा नदीवर सिंचनाची पारंपरिक फड पध्दती अद्याप वापरली जात आहे. फड पध्दतीत नदीवर बांध घालून व नदीचे पाणी वळवून पाटाव्दारे शेतीसाठी प्रवाही पध्दतीने वापरले जाते. या पध्दतीत पाणी व पीक व्यवस्थापन एका विशिष्ट पध्दतीने केले जाते. आज या पध्दतीच्या वापरात काही समस्या निर्माण झाल्या आहेत. सदर लेखात फड पध्दतीच्या वैशिष्ट्यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

### धुळे जिल्ह्याचा इतिहास

धुळे जिल्हा आकाराने लहान असला तरी वैशिष्ट्यपूर्ण आहे. धुळे, जळगाव, नवनिर्मित नंदुरबार जिल्हा व नाशिक जिल्ह्याचा उत्तर भाग मध्ययुगीन कालापासून खानदेश या नावाने ओळखला जात असे. त्याचे या काळातील नाव रसिका असे होते. काही अभ्यासकांच्या मते खानदेशचे पूर्वीचे नाव कान्हदेश म्हणजे कृष्णाचा देश होते. हल्लीचा नंदुरबार जिल्हा हा धुळे जिल्ह्याचाच भाग होता. नंदुरबार शहराचा उल्लेख नंदनगरी या नावाने केला जातो.

ब्रिटिश काळात धुळे हे खानदेशाचे म्हणजेच धुळे व जळगाव जिल्ह्याचे मुख्यालय होते. 1906 मध्ये खानदेशचे पूर्व खानदेश व पश्चिम खानदेश असे दोन जिल्ह्यात विभाजन झाले. पश्चिम खानदेशचे धुळे हे मुख्यालय होते. 1956 मध्ये जिल्ह्यांची पुनर्रचना करण्यात आली त्यात धुळे जिल्ह्याचा समावेश मुंबई प्रांतात करण्यात आला. 1960 मध्ये महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. धुळे जिल्ह्याचा समावेश त्यात करण्यात आला. पश्चिम खानदेशच्या नावाऐवजी या जिल्ह्याच्या नावात धुलिया असा बदल करण्यात आला. सध्या हा जिल्हा धुळे या

नावाने ओळखला जातो. या जिल्ह्याचे विभाजन 1999 मध्ये होऊन नंदुरबार हा स्वतंत्र जिल्हा अस्तित्वात आला आहे. सध्या धुळे जिल्ह्यात धुळे, साक्री, शिंदखेडा व शिरपूर असे चार तहसील आहेत.

### पांझरा खोरे

पांझरा नदी ही तापी नदीची उपनदी आहे. या नदीचा उगम समुद्रसपाटीपासून 600 मीटर उंच सह्याद्रीच्या पश्चिमेस सातमाळा घाटात शेंदवड मांजरी (ता. साक्री) या गावाजवळ होतो. पांझरा नदी पूर्वेकडे 99 कि.मी. वाहत जाते. त्यापुढे उत्तरेला वळून मुडावदजवळ तापी नदीला मिळते. या नदीची लांबी 136 कि.मी. आहे.

या नदीच्या उत्तर व पूर्वेस मध्यतापी खोरे असून पश्चिमेस गुजरात व दक्षिणेस गिरणा उपखोरे आहे.

महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाच्या अहवाला नुसार (1999) या नदीखोऱ्याचे क्षेत्रफळ 2888 चौ.कि.मी. असून या खोऱ्यात धुळे जिल्ह्यातील धुळे, साक्री व शिंदखेडा तालुक्याचा समावेश होतो, तर जळगांव जिल्ह्यातील अमळनेर तालुक्याचा व नाशिक जिल्ह्यातील मालेगांव तालुक्याचा समावेश होतो.

जामखेडी व काननदी ह्या पांझरानदीच्या प्रमुख उपनद्या आहेत. पांझरा खोरे आकाराने लहान असले तरी वैशिष्ट्यपूर्ण आहे.

### सिंचनाच्या पारंपरिक पध्दती

पाणी टंचाईवर मात करण्यासाठी पाणी साठविणे आणि पाण्याचा योग्य वापर करणे यासंबंधी लोकांमध्ये जागृती निर्माण झाली असावी. त्यामुळेच पाणी साठविण्याच्या आणि पाणी वापराच्या विविध पध्दती भारतात अस्तित्वात आल्या असाव्यात. हिमालय प्रदेशातील कुलसिंचन पध्दत, तामिळनाडूतील तलाव सिंचन पध्दत, राजस्थानमधील घराच्या छतावरील पाणी साठवून वापरण्याची पध्दत, कोल्हापूरमधील साखळी बंधारे पध्दत, बीड मधील खजाना विहीर सिंचन पध्दत, इ. परंपरागत सिंचन पध्दती भारतात वापरल्या जात आहेत. त्या प्रत्येक पध्दतीचे स्वतःचे वेगळे वैशिष्ट्य आहेत. या पध्दती फारच लोकप्रिय झाल्या आहेत.

अशाच प्रकारची 300 ते 400 वर्षापूर्वीपासून कार्यरत असणारी सिंचनाची फड पध्दत पांझरा नदीखोऱ्यात वापरली जात आहे. या पध्दतीची काही वेगळी वैशिष्ट्ये आहेत. म्हणूनच ही पध्दत सिंचनाची एक आदर्श पध्दत म्हणून ओळखली जाते.

### फड पध्दतीचा इतिहास

खानदेशात मौर्यांची सत्ता होती. मौर्य राजवटीत सिंचनासाठी स्वतंत्र खाते होते. सिंचनाची कामे सहकारी तत्त्वावर केली जात होती. म्हणून फड पध्दती मौर्य कालीन असावी. खानदेशात यादवांची सत्ता होती. म्हणून ही पध्दत यादव कालीन असावी अशी ही एक शक्याता वर्तविली जाते.

इ.स. 1396 ते 1408 या दुर्गादेवीच्या दुष्काळात मलीक राजा फारुकीने शेतीला जास्त महत्त्व दिले. त्यानंतर आदिलखान फारुकी दुसरा यानेही शेती, उद्योग, व्यापारास महत्त्व दिले. म्हणून फड पध्दत फारुकी काळातील असण्याची शक्यता आहे.

मोगल काळाबरोबर मराठा राजवटीतही सिंचनाला महत्त्व दिल्याचे आढळून येते. मराठ्यांच्या काळात प्रत्येक गावी बंधारे असल्याचा उल्लेख आहे. याचाच अर्थ ही पध्दत जुनी आहे. परंतु या पध्दतीची सुरुवात कधी झाली हे सांगणे कठीण आहे.

जिरेमाळी समाजातील काही व्यक्तींनी

पांझराखोऱ्यात फड बंधारे बांधले आहेत. जेबा सावना घरटे यांनी सामोडा व धाडणे हे दोन बंधारे बांधले. बंधारे बांधल्याबद्दल औरंगजेबाच्या राजवटीत जेबा पाटील यांना पाटीलकी मिळाली. देश-शिरवाडेचा बंधारा सुरजन पाटील व त्यांच्या आठ भावांनी शके 1909 मध्ये बांधला. धुळे येथील बंधारा संतु पाटील भोगे यांनी बांधला.

इ.स. 1784 च्या सुमारास खानदेशातील दहिवेल येथील धरणाचा बांध फुटला असता तेथील रयतेकडून दुरुस्तीचे काम करुन घ्यावे म्हणून पेशव्यांनी कमाविसदारास सनद दिली. हंगामी जिल्ह्याधिकारी व न्यायदंडाधिकारी जि. खानदेश यांच्या स्वाक्षरीने पाण्याच्या अपव्यया संबंधी जाहीरनामा काढण्यात आला होता.

वरील नोंदीवरुन पांझरा खोऱ्यातील फड पध्दती सुमारे 300 ते 400 वर्षापूर्वीच अस्तित्वात असावी, असे अवलोकनास येते.

### फड पध्दतीचा अर्थ

फड पध्दत ही खानदेशातील सिंचन पध्दत म्हणून ओळखली जाते. पांझरा नदीवर 400 वर्षापूर्वीपासून ही पध्दत अस्तित्वात आहे. पूर्वी पांझरा नदी बारमाही वाहणारी होती. त्यामुळे नदीवरील थळांना कायमस्वरुपी पाणी मिळत असे. प्रत्येक गावाचा पाणी वापराबाबतचा हक्क ठरलेला असे. फडाखाली खात्रीशीर बागायत शेती होत असल्याने फड बंधाऱ्याना कायम बागायत बंधारे असे म्हणतात.

अरुण सूर्यवंशी यांच्या मते, नदीपात्रात बांध घालून लहानशा कालव्याव्दारे पाणी अडवून एकाच गावातील लाभक्षेत्राचे 3 ते 4 भाग (फड) पाडून एका भागात एकाच प्रकारचे पीक घेणे, दरवर्षी प्रत्येक भागातील पीक क्रमांक्रमाने बदलविणे, लाभधारकांनी स्वत:च बनविलेल्या पंचांच्या समिती मार्फत व्यवस्थापन करण्याच्या सिंचन पध्दतीस फड पध्दत असे म्हटले आहे.

गॉर्डन यांच्या मते नदीवर लहानसा बंधारा बांधून पाणी अडवून पाटाच्या साहाय्याने केलेले सिंचन म्हणजे फड बागायत होय.

थोडक्यात नदीवर बंधारा बांधून पाटाच्या साहाय्याने बागायत जमीन विकसित करणे होय. या जमिनीचे 3 ते 4 भाग पाडलेले असतात. या प्रत्येक भागात दरवर्षी क्रमाक्रमाने वेगवेगळी पिके घेतली जातात. अशा पाटस्थळास फड बागायत म्हणतात.

### फड बंधारा

फड पध्दतीत बंधारा, मुख्य कालवा, सिंचन क्षेत्र, चारी हे प्रमुख घटक असतात. बंधाऱ्याचे बांधकाम दगड व चुन्यात केलेले असून सर्व बंधारे कठीण खडकावर बांधण्यात आले आहेत. त्यांची उंची 2 ते 3 मीटर आहे.

मुख्य कालवा हा सिंचन क्षेत्राला समांतर असतो. कालव्यात आवश्यक तेवढेच पाणी यावे म्हणून कालव्यावर आडवी भिंत बांधलेली असते. कालव्याची रुंदी व खोली सुरुवातीपासून शेवटपर्यंत सारखीच असते.

सर्वसाधारण नदी व कालवा यांच्या मधील भाग सिंचनक्षेत्र किंवा थळ असते. या थळाचे 3 ते 4 भाग केलेले असतात त्याला फड असे म्हणतात. प्रत्येक फडाला पाणी देण्यासाठी उपचाऱ्या असतात. जास्तीचे पाणी नदीत सोडण्याचीही व्यवस्था केलेली असते. फडात प्रत्येक वर्षी क्रमाक्रमाने पिकात बदल करुन पिके घेतली जातात. पूर्वी फडात गावातील प्रत्येक शेतकऱ्याची जमीन असे. सध्या खरेदी विक्री व भाऊहिश्श्यांच्या वाटणीमुळे यात बदल झाला आहे.

### पांझरा नदीवरील फड बंधाऱ्याची सिंचन क्षमता

धुळे जिल्ह्यात पांझरा नदीवर एकाखाली एक बंधारे बांधण्यात आले आहेत. तक्ता क्र. 1 मध्ये दर्शविल्याप्रमाणे या नदीच्या उगमापासून ते बेटावद पर्यंत (तापानदीच्या संगमापर्यंत) 30 फड बंधारे आहेत. यापैकी 14 बंधारे साक्री तालुक्यात, 14 बंधारे धुळे तालुक्यात आणि 2 बंधारे शिंदखेडा तालुक्यात आहेत.

साक्री तालुक्यात फड बंधाऱ्यांमुळे 1263 हेक्टर, धुळे तालुक्यात 2056 हेक्टर आणि शिंदखेडा तालुक्यात 304 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली होती. थोडक्यात पांझरा खोऱ्यात फड बंधाऱ्यामुळे एकूण 3623 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली होती.

### फड पध्दतीतील पीक रचना

प्रत्येक गावाचे कायम बागायतीचे (थळातील क्षेत्राचे) 3 ते 4 भाग करण्यात येऊन प्रत्येक भागास फड असे म्हणतात. फडांना स्थानिक नावांनी संबोधले जाते. कार्यकारी अभियंता धुळे यांच्या टीप्पणी नुसार नेर परिसरातील बंधाऱ्याबाबत हक्क पत्रक 125 प्रमाणे बंधाऱ्यावर चार वर्षातून एकदा प्रत्येक फडात ऊस घेण्यास परवानगी आहे. सर्वसाधारणपणे एका फडात सुरु ऊस, दुसऱ्या फडात खोडवा, बाकीच्या फडांपैकी एकात साळ पीक काढून ऊस लावावा व बाकीच्या फडात खरीप पिके गहू, ज्वारी इ. घ्यावीत असे नमूद करण्यात आले आहे.

ना.लो. गवळे कार्यकारी अभियंता, धुळे यांनी त्यांच्या लेखात फडातील पीकचक्राची माहिती पुढीलप्रमाणे उदाहरणादाखल दिली आहे.

| वर्ष | फड क्र.1 | फड क्र.2 | फड क्र. 3 | फड क्र. 4 |
|---|---|---|---|---|
| 1. | हरबरा | गहू | सुरु ऊस | खोडवा ऊस |
| 2. | गहू | सुरु ऊस | खोडवा ऊस | हरबरा |
| 3. | सुरु ऊस ऊस | खोडवा | हरबरा | गहू |
| 4. | खोडवा ऊस | हरबरा | गहू | सुरु ऊस |

वरील पीक रचनेवरुन असे दिसून येते की, प्रत्येक वर्षी फडात पीक बदलते. गावाची आर्थिक व अन्नधान्याच्या दृष्टिकोनातून काळजी घेण्यात येते. चारही पिकांचा फायदा प्रत्येक शेतकऱ्याला मिळून सामाजिक बांधिलकी, समानता व न्याय जोपासण्यात येत असे.

### फड पध्दतीतील व्यवस्थापन

फड बंधारा असणाऱ्या गावात एक फडसंस्था असते. थळातील सर्व शेतकरी त्या संस्थेचे सदस्य असतात. हे सर्व सदस्य एक पंच समिती नेमतात. पंच समितीत एक अध्यक्ष व 4 ते 5 पंच निवडले जातात. ते रुढीनुसार काम पाहतात.

पंचसमिती गुढीपाडवा किंवा अक्षय्यतृतियेस शेतकऱ्यांची सभा घेऊन फडाची मशागत, पिकांची लागवड, निंदणी, कोळपणी, कापणी, केंव्हा करायची इ. गोष्टी ठरवितात. तसेच पाटातील गाळ काढणे, कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे इ. निर्णय घेतले जातात. पंच समितीला ह्या कामांचा मोबदला दिला जात नाही. पंचसमिती फडातील काम पुढील कर्मचाऱ्यांकडून करुन घेते.

### हवालदार

ह्याचे काम बंधाऱ्यापासून ते पाणी वाटपाच्या

चाऱ्यापर्यंत पाणी आणून देणे, भराव कोठे फुटले असल्यास त्यावर लक्ष ठेवणे, शेजपाळीप्रमाणे पाणी भरले जाते किंवा नाही ते पहाणे, भरणे पूर्ण झाल्याची खात्री करणे, बारेकरी व पाटकऱ्यांना सूचना देणे.

**पाटकरी**

फडवार उपलब्ध पाण्याचे वाटप करणे, पाटावर व चारीवर लक्ष ठेवणे, बारेकऱ्यांकडून भरणे पूर्ण करुन घेणे ही पाटकऱ्यांची कामे आहेत.

**रखवालदार (बारेकरी)**

प्रत्येक फडासाठी साधारणपणे दोन रखवालदार ठेवण्यात येतात. शेजपाळीप्रमाणे पाणी भरणे व पीक तयार होऊन काढणीपर्यंत राखण करणे. ही बारेकऱ्यांची कामे आहेत.

कर्मचाऱ्यांना या कामाव्यतिरिक्त पाटाची स्वच्छता करावी लागते. कर्मचाऱ्यांना कामाचा मोबदला म्हणून शेतातील पिकांमधून भारा, धान्य किंवा पैशाच्या स्वरुपात मोबदला दिला जात असे.

**फड पध्दतीचे फायदे**

ही पध्दत पांझरा खोऱ्यात अद्याप टिकून आहे. कारण या पध्दतीचे अनेक फायदे आहेत.

1) पांझरा नदीवर एका खाली एक बंधारे आहेत. बंधाऱ्यांची उंची ठरलेली आहे. त्यामुळे प्रत्येक बंधारा असणाऱ्या गावाला आवश्यक तेवढेच पाणी मिळते. याचाच अर्थ पाण्याचे न्याय्य वाटप करण्याच्या दृष्टिकोनातून उपयुक्त अशी पध्दत आहे.

2) पूर्वी प्रत्येक फडात गावातील प्रत्येक शेतकऱ्याची जमीन असल्याने नदीतील वाहत्या पाण्याचा उपयोग गावातील प्रत्येक शेतकऱ्याला होत असे. याचाच अर्थ पाणी सहकारी पध्दतीने वापरण्याची ही आदर्श पध्दत आहे.

3) थळातील सर्व शेतकऱ्यांचे हितसंबंध सारखेच असल्याने गावकऱ्यांचे परस्पर सहकार्य वाढीस लागते.

4) फड पध्दतीत पिकाच्या गरजेनुसार पाणी दिले जाते. त्यामुळे जमीन क्षारयुक्त बनत नाही.

5) थळातील सर्व जमिनीला आवश्यक त्या प्रमाणात पाणी देण्यासाठी चाऱ्यांची व्यवस्था केलेली दिसते. शिवाय चाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी कर्मचारी नेमलेले असतात. म्हणून पाणी वाया जात नाही.

6) पूर्वी प्रत्येक फडात शेतकऱ्यांची जमीन असल्याने प्रत्येकाला सर्व पीक घेता येत असे. सर्व शेतकरी व गाव स्वावलंबी असत.

7) क्रमाक्रमाने पिके घेतली जात असल्यामुळे वर्षातील काही काळ जमीन पडीत राहते त्यामुळे ती क्षारयुक्त बनत नाही.

8) या पध्दतीत अध्यक्षाच्या नियंत्रणाखाली कर्मचारी काम करीत असल्याने नोकरी करणारे, विधवा, वृध्द इ. ना पिकांबाबत चिंता नसते.

9) या पध्दतीत सर्व शेतकऱ्यांचा सहभाग असल्याने सरकारी हस्तक्षेप होत नाही. शिवाय सरकारला कोणत्याही प्रकारचा खर्च करावा लागत नाही.

10) जमिनीवरील शेतसाऱ्याबरोबरच पाणकसर (पाणीपट्टी) वसूल होत असल्यामुळे कर बुडत नाही.

एकंदरीत पांझरा खोऱ्यातील फड पध्दती ही आधुनिक काळात पाण्याच्या वाटपावरुन होणारे वाद मिटविण्यासाठी, पाणी व पीक व्यवस्थापनासाठी, सहकार्याची भावना वाढीस लावण्यासाठी, ग्रामीण विभागातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी आजही उपयुक्त आहे. म्हणून ती एक आदर्श पध्दती आहे.

**पांझरा खोऱ्यातील फड पध्दतीची सद्यःस्थिती**

फड पध्दती पूर्वी सारखी असली तरी त्यात काही बदल झाले आहेत. फड बंधारे 1964 पासून सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सिंचन खात्याकडे वर्ग करण्यात आले आहेत. तेंव्हापासून या बंधाऱ्यावर सिंचन विभागाचे नियंत्रण आहे.

1976 पासून पांझरा नदी अधिसूचित केल्यामुळे फड बंधाऱ्यांवरील सिंचन प्रथम वर्ग समजण्यात येऊ लागले. तेंव्हापासून बंधाऱ्यांचे व पाटाच्या दुरुस्तीचे काम सिंचन खात्यामार्फत केले जाते. तसेच सिंचनासाठी पाणी अर्ज घेणे, पिकांचे पंचनामे करणे इ. कामे सिंचन खात्यामार्फत केली जात आहेत. त्यासाठी सरकारने कालवा तपासनीस, पाटकरी व प्रत्येक बंधाऱ्यावर एक मजूर इ. कर्मचारी नेमले आहेत. परंतु आजही फड बागाईतदार कोणत्या फडात कोणते पीक घ्यायचे हे अध्यक्ष व इतर सभासद ठरवितात. या बाबत सरकार हस्तक्षेप करीत नाही.

फड बंधारे प्रथम वर्ग झाल्यापासून सिंचन विभाग, सिंचनावर प्रथम वर्ग दराप्रमाणे आकारणी करते व वसुलही करते. पूर्वीपासून महसूल खाते, फड बागायतदारांकडून पानकसर वसूल करते. यामुळे फड बागायतदारांना सिंचनावर दोन प्रकारची देणी (कर) द्यावी लागतात. याला शेतकऱ्यांचा विरोध आहे.

फड बंधाऱ्याखाली पूर्वी इतकी सिंचन क्षमता राहिली नाही. 30 बंधाऱ्यापैकी पानथळ, नदीपार आणि बोरबंद बंधारे पांझरानदीच्या बुडीत क्षेत्रात येतात. धुळ्याचा बंधारा रहिवासी क्षेत्रामुळे बंद आहे. न्याहळोद बंधारा 1988 पासून सोनवद धरणाच्या पूरक कालव्यात रुपांतरित झाला आहे. मांडळ आणि मुडी हे दोन बंधारे धुळे तालुक्यात असले तरी त्यांचे सिंचन क्षेत्र जळगांव जिल्ह्यातील अमळनेर तालुक्यात आहे. म्हणून फड बंधाऱ्याची धुळे जिल्ह्यातील सिंचन क्षमता 2578 हेक्टर पर्यंत कमी झाली आहे.

**पांझरा खोऱ्यातील पाटबंधाऱ्यांखालील प्रत्यक्षातील सिंचनक्षेत्र**

पांझरा खोऱ्यात 1990-91 ते 2003-04 या चौदा वर्षाच्या काळात फड बंधाऱ्यांखाली 2000-01 मध्ये सर्वात कमी 93 हेक्टर प्रत्यक्षात सिंचन झाले, तर 1999-2000 यावर्षी सर्वात जास्त 1492 हेक्टर क्षेत्रात प्रत्यक्ष सिंचन झाले. ज्यावर्षी पाऊस चांगला होतो, नदी जास्त काळ वाहते, त्यावर्षी फडावर जास्त सिंचन होते. पावसाचे प्रमाण कमी असणाऱ्या वर्षी फड बंधाऱ्यांवरील सिंचन क्षेत्र घटले आहे. फड बंधाऱ्यांसाठी पांझरा धरणाचे पाणी आरक्षित केले जात असल्यामुळे फड बंधाऱ्यांवरील जास्तीत जास्त सिंचन साक्री तालुक्यात होते. धुळे व शिंदखेडा तालुक्यात प्रत्यक्षात अतिशय कमी सिंचन होते. बरीच वर्षे या दोनही तालुक्यात फड बंधाऱ्यांवर सिंचनच होत नाही.

**फड पध्दतीच्या समस्या**

फड पध्दतीचे अनेक फायदे आहेत. फड पध्दती आजही सिंचनातून निर्माण होणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी उपयुक्त अशी पध्दत आहे. परंतु फड पध्दतीत पुढील प्रमाणे काही समस्या निर्माण झाल्या आहेत.

1) फड बंधारे सिंचन विभागाकडे वर्ग केल्यानंतर त्यांना प्रथम वर्ग दर्जा प्राप्त झाला. त्यामुळे सिंचन विभागाकडून सिंचन क्षेत्रावर आकारणी केली जाते. तसेच महसूल खाते देखील पानकसर वसूल करते. असे दोन प्रकारचे देणे बागायतदारांना द्यावे लागते.

2) पांझरा खोऱ्यात विहिरींची संख्या वाढली आहे. पाणी उपसण्यासाठी विद्युत पंपाचा वापर केला जात असल्यामुळे भूगर्भातील पाण्याचा उपसा होतो. पाणी पातळी नदीपात्रापेक्षा जास्त खोल जात असल्याने नदीतील प्रवाह आटतो. म्हणून फडांना सिंचनासाठी जास्त काळ पाणी उपलब्ध होत नाही.

3) फडातील पाटाची स्वच्छता करण्यासाठी सरकारने कर्मचारी नेमले आहेत. त्यांच्याकडून वेळोवेळी पाटाची स्वच्छता व दुरुस्ती होत नाही. म्हणून फड बंधाऱ्यातील पाणी सिंचनासाठी वापरण्यात अडथळा निर्माण होतो.

4) मुकटी तलाव हा त्याखाली असणाऱ्या फड बंधाऱ्यांना नदीचे पाणी कमी पडल्यास पाण्याचा पुरवठा करण्यासाठी बांधण्यात आला आहे. परंतु या तलावाचे पाणी धुळे शहराला पिण्यासाठी आरक्षित केले जात असल्यामुळे फड बंधाऱ्यासाठी वापरता येत नाही.

5) पांझरा प्रकल्पाचे बांधकाम करतांना त्या खालील फड बंधाऱ्यांसाठी पाण्याचे आरक्षण करण्यात आले आहे. परंतु पिंपळनेर व धुळे शहरासाठी पिण्याकरिता पांझरा प्रकल्पातील पाण्याचे आरक्षण केले जात असल्याने फड बंधाऱ्यांना पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही.

6) फडातील जमिनीचे खरेदी-विक्रीचे व्यवहार झाल्यामुळे व भाऊ हिश्श्यांची वाटणी झाल्याने फडात गावातील प्रत्येक शेतकऱ्यांची जमीन नसते. त्यामुळे फड बागायतीच्या कामासाठी नियुक्त केलेली पंचसमिती प्रभावी पणे काम करु शकत नाही.

थोडक्यात पांझरा खोऱ्यातील कमी व अनियमित पर्जन्यमान, भूगर्भातील पाण्याचा उपसा, पांझराधरणामुळे अडलेले पाणी इ. कारणांमुळे पांझरा नदी फक्त पावसाळ्यातच वाहत असल्यामुळे फड पध्दत धोक्यात आली आहे.

**फड पध्दती टिकविण्यासाठी उपाययोजना**

आदर्श अशी फड पध्दती नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. ती टिकविण्यासाठी खालील उपाययोजना उपयुक्त ठरतील.

1) फड पध्दत ही पूर्णपणे पांझरा नदीच्या वाहत्या पाण्यावर अवलंबून आहे. नदी वाहती ठेवण्यासाठी भूजलाची पातळी वाढणे आवश्यक आहे. पावसाळ्यात पांझरानदीचे बरेच पाणी वाहून जाते. त्या पाण्याचा उपयोग सिंचन प्रकल्पांच्या कालव्यांच्या सहाय्याने विंधनविहिरी, गावतळी, विहिरी, लघुसिंचन प्रकल्प, नैसर्गिक खड्डे इ. माध्यमातून पुनर्भरण केल्यास भूगर्भातील पाण्याची पातळी वाढून पांझरा नदी जास्त काळ वाहू शकेल.

2) पांझरा खोऱ्यात विहिर बागायत क्षेत्र सतत वाढत आहे. परंतु पिकाला पाणी देण्याच्या आधुनिक पध्दतींचा प्रचार व प्रसार केल्यास भूगर्भातील पाण्याचा उपसा कमी होऊन भूजलपातळी टिकून राहण्यास मदत होईल.

3) धुळे शहराला तापी पाणी पुरवठा योजनेव्दारे कमी पाणीपुरवठा केला जातो. परंतु तापीचे पात्र ऑक्टो-नोव्हेंबर मध्येच कोरडे पडते. त्यामुळे ह्या योजनेव्दारे वर्षात फक्त 4 ते 5 महिने पाणी पुरवठा केला जातो. इतर काळ मुकटी तलावातील पाणी वापरले जाते. तापी पाणीपुरवठा योजना वर्षभर कार्यरत राहण्यासाठी तापी नदीवर सारंगखेडा, सुलवाडे व प्रकाशा बॅरेजचे काम पूर्ण होणे आवश्यक आहे. असे झाल्यास मुकटी तलावाचे व पांझरा प्रकल्पाचे पाणी फड बंधाऱ्यासाठी वापरता येणे शक्य होईल.

4) पूर्वी मृद संधारणासाठी सर्वच शेतांना बांध

घालण्यात आले होते. त्यामुळे पावसाळ्यात पडणारे पाणी जागीच थांबविले जात होते. परिणामत: भूगर्भातील पाण्याची पातळी सतत नदीपात्राच्या पातळीच्या वर राहत असे. बांधात जमीन वाया जाते म्हणून लोकांनी शेताला बांध ठेवले नाहीत. लोकसहभागातून पुन्हा शेताला बांध घातल्यास भूगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होईल.

5) पाणलोट क्षेत्र विकासाच्या योजना कार्यक्षमतेने राबविणे.

फड पध्दत ही धरणांच्या पाण्याचे योग्य वाटप होण्यासाठी स्वीकारलेल्या गट (Block) पध्दतीचा तसेच पाणीवाटप संस्थांचा मूलभूत आधार आहे. निसाळ यांनी मुल्हेरकर देशमुखांची बखर यात उल्लेख केल्याप्रमाणे सर विश्वेश्वरैय्या यांनी फड पध्दती जवळून पाहिली व म्हैसूर प्रांतात छत्तीस हजार बंधारे बांधले. जुलै 2004 मध्ये ढाका येथे तिसरी दक्षिण आशियाई परिषद झाली. त्या परिषदेत पाण्याच्या न्याय वाटपासाठी, लोकसहभागासाठी आणि पाण्याच्या योग्य व्यवस्थापनासाठी आपल्या पारंपरिक सिंचन पध्दती टिकवून ठेवण्याचे ठरविण्यात आले आहे.

अशी ही संपूर्ण भारतीय तंत्रावर आधारलेली, पाण्याचे न्याय्य वाटप करणारी, सहकार्याची भावना रुजविणारी, जगाला पाण्याचे न्याय्य वाटप व व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करणारी फड पध्दती जपून ठेवण्याचे कार्य सरकारने लोकसहभागातून केले पाहिजे.

## संदर्भ सूची


1) केदार, धोंडू नंदन मु. ताहाराबाद यांच्याकडील वंशावळी अभिलेखातील माहिती.

2) गवळे ना,लो. पांझरा खोऱ्यातील फड पध्दत समस्या व उपाययोजना - सिंचन सहयोग, धुळे आयोजित कार्यशाळा जुलै 1997.

3) ठाकरे वसंतराव सिंचनाची फड पध्दती - प्रकाशन - सिंचन सहयोग, धुळे.

4) धाराशिवकर मुकुंद, खानदेशातील मध्ययुगीन जल व्यवस्थापन - सिंचन सहयोग, धुळे आयोजित चर्चासत्र - ऑक्टो 2003.

5) नामदे ना.भा., पांझरा खोऱ्यातील फड पध्दती - दुसरा सिंचन आयोग आणि सिंचन सहयोग, धुळे, आयोजित चर्चासत्र 1997.

6) महाराष्ट्र जल व सिंचन आयोग अहवाल - 1999.

7) शिर्के सुरेश - जलसंपत्ती शांततेसाठी वापरावी (13 ते 15 जुलै 2004 मध्ये ढाका येथे झालेल्या तिसऱ्या दक्षिण आशियाई पाणी परिषदेचा आढावा) सकाळ वृत्तपत्र 17 नोव्हें. 2004.

8) सुर्यवंशी अरुण फड पध्दत - पुढील वाटचाल - सिंचन सहयोग, धुळे आयोजित कार्यशाळा (साक्री, ऑक्टो 2003)

9) Gazette of India, Maharashtra State, Dhule District- 1974.

10) Phad system Irrigation in Maharashtra State WALMI Publication, Aurangabad, Pub. No. 45, March 1991.


✦✦✦

## परिशिष्ट 1

### पांझरा नदीवरील फड बंधारे

| अ.क्र | बंधाऱ्याचे नाव | तालुका/जिल्हा | सिंचन क्षेत्र (हेक्टर) | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1. | दुतोंड्या | साक्री/धुळे | 107 | पांझरा धरणाच्या वरच्या बाजूला |
| 2. | वालडू | साक्री/धुळे | --- | |
| 3. | नदीपार | साक्री/धुळे | 68 | पांझरा धरणाच्या बुडीत क्षेत्रात |
| 4. | बोरबंद | साक्री/धुळे | 62 | |
| 5. | पानथळ | साक्री/धुळे | 64 | |
| 6. | सामोडा | साक्री/धुळे | 129 | |
| 7. | शेनपूर | साक्री/धुळे | 77 | |
| 8. | धाडणे | साक्री/धुळे | 115 | |
| 9. | कासारे | साक्री/धुळे | 132 | |
| 10. | मालपूर | साक्री/धुळे | 98 | |
| 11. | कोकले/गोंदास | साक्री/धुळे | 114 | |
| 12. | नांदवन | साक्री/धुळे | 170 | |
| 13. | शेवाळी | साक्री/धुळे | 22 | |
| 14. | भाडणे | साक्री/धुळे | 105 | |
| 15. | रायवट | धुळे/धुळे | 128 | |
| 16. | कानडा | धुळे/धुळे | 89 | |
| 17. | माना | धुळे/धुळे | 147 | |
| 18. | अकलाड | धुळे/धुळे | 64 | |
| 19. | खेडे | धुळे/धुळे | 159 | |
| 20. | मोराणे | धुळे/धुळे | 92 | |
| 21. | वार | धुळे/धुळे | 150 | |
| 22. | धुळे | धुळे/धुळे | 161 | रहिवासी क्षेत्रामुळे बंद |
| 23. | निमखेडी | धुळे/धुळे | 77 | |
| 24. | जापी | धुळे/धुळे | 164 | |
| 25. | न्याहळोद | धुळे/धुळे | 324 | सोनवद धरणाच्या पूरक कालव्यात रुपांतरित. |
| 26. | मोहाडी | धुळे/धुळे | 135 | |
| 27. | मांडळ | धुळे/धुळे | 199 | |
| 28. | मुडी | धुळे/धुळे | 167 | |
| 29. | वालखेडा | शिंदखेडा/धुळे | 163 | |
| 30. | बेटावद | शिंदखेडा/धुळे | 141 | |
| | एकूण | | 3623 | |

स्रोत - सिंचनाची फड पध्दती - वसंतराव ठाकरे, प्रकाशन - सिंचन सहयोग, धुळे.

संकीर्ण

# "नव्या पेटंट कायद्यातील बदलांचे संभाव्य परिणाम"

✦ दिपक भामरे.

*प्रपाठक, वाणिज्य विभाग, एस.एस.व्ही.पी.एस. कला व वाणिज्य महाविद्यालय, धुळे.*

**प्रास्ताविक**

भारतीय पेटंट कायदा 1970 मध्ये, जागतिक व्यापार संघटनेच्या करारानुसार बदल करावे लागतील ही बाब सन 1994 मध्ये करार करतांनाच लक्षात आली होती. कारण जागतिक व्यापार संघटनेच्या करारानुसार व्यापार विषयक बौद्धिक संपदा रक्षण करार (Trade Related Intellectual Property Rights) सर्व सदस्य देशांवर बंधनकारक होता, अपवाद फक्त कालमर्यादे च्या संदर्भात होता. विकसीत देशांनी त्यांचे पेटंट विषयक कायदे 1 जानेवारी 96 पर्यंत व्यापार विषयक बौद्धिक संपदा रक्षण या कराराशी सुसंगत करावयाचे होते. तर भारतासारख्या विकसनशिल देशात जेथे "वस्तुपेटंट" दिले जाते त्यांना जानेवारी 05 पर्यंत अंतिम मुदत देण्यात आली होती साहजिकच या कालमर्यादेचा विचार करून भारतीय पेटंट कायद्यात तिसऱ्यांदा दुरूस्ती करण्यात येऊन संसदेच्या दोन्ही सभागृहात ती मान्य करण्यात आली. तेव्हापासून पेटंट कायद्यातील दुरूस्तीच्या संदर्भात तीव्र प्रतिक्रिया सकारात्मक व नकारात्मक दृष्टीकोनातून व्यक्त करण्यात येत आहते. या पार्श्वभूमीवर या लेखामध्ये जा.व्या.सं., व्यापार विषयक बौद्धिक संपदा रक्षण, पेटंट संज्ञेचा अर्थ, भारतीय पेटंट कायदा 1970 चा अर्थ त्याचे आतापर्यंत झालेले दुष्परिणाम पेटंट कायद्यातील बदलांचे संभाव्य परिणाम इ. विविध पैलुंवर चर्चा केली आहे.

**जागतिक व्यापार संघटना व भारत :-**

माहिती व तंत्रज्ञानाच्या व्यापक जाळ्यामुळे संपूर्ण जगाने विशाल बाजारपेठेचे स्वरूप धारण केले, अशा परिस्थितीत व्यापार जगतातील व्यवहार सुरळीतपणे चालु राहण्यासाठी जा.व्या.सं. च्या माध्यमातुन जागतिक पातळीवर

अनेक प्रयत्न केले जात आहेत. यापूर्वी हे प्रयत्न गॅट मार्फत केले जात होते. सन 1947 ते 1973 पर्यंत गॅट अंतर्गत आंतरराष्ट्रीय व्यापार/ वस्तु व आयात शुल्क इत्यादी संबंधीत विषयावरच चर्चा होत असे. सन 73 ते 86 या कालावधीत गॅटचे कार्य शांततेत सुरू होते. मात्र 86 साली उरूग्वे येथील गॅटच्या चर्चेत कृषी, सेवा, गुंतवणूक व बौद्धिक संपदा इ. 4 विषय चर्चेसाठी घेण्यात आले त्यावर सुमारे 8 वर्षे चर्चा करण्यात येऊन सन 94 मध्ये व्यापार विषयक बौद्धिक संपदा रक्षण कराराला मान्यता देण्यात आली.

15 जाने 94 रोजी भारताने गॅट करारावर सही करून आपली अर्थव्यवस्था जागतिक पातळीवर नेण्यासाठी प्रयत्नपूर्वक सुरूवात झाली. 1 जाने 95 मध्ये गॅट कराराचे रूपांतर जागतिक व्यापार संघटनेत झाले तेव्हा पासून जा. व्या. सं. ने जागतिक पातळीवर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणे निधी, जागतिक बँकेच्या माध्यमातून हेतुपुरस्सर पाउले उचलली. सन 94-95 मध्ये जा. व्या. सं. चे सदस्यत्व असलेल्या एकूण राष्ट्रातील बहुसंख्य राष्ट्रे ही विकसनशील व अविकसित होती. साहाजिकच त्याच्या देशातील बाजारपेठा, मजुरवर्ग, विपुल नैसर्गिक साधन संपत्ती इत्यादीचा लाभ विकसीत देशांना करून घेता येईल या दृष्टिने अनेक बदल जा. व्या. सं. हेतुपुरस्सर करण्यात आले त्यापैकी एक बदल म्हणजे व्यापारविषयक बौद्धिक संपदा रक्षण करार होय, या करारानुसार बौद्धिक संपदा अधिकार पुढील सात विभागात मांडण्यात आलेला आहे ते विभाग पुढीलप्रमाणे

1. प्रकाशन संदर्भातील अधिकार
2. व्यापारचिन्ह (ट्रेडमार्क्स )संदर्भातील अधिकार
3. भौगोलिक वैशिष्ट्ये दर्शक अधिकार
4. औद्योगिक संकल्पन अधिकार
5. व्यापार गुपित (Trade secret)अधिकार
6. रेखांकन संकल्पन अधिकार.
7. पेटंट संदर्भातील अधिकार

अशा प्रकारे व्यापार विषयक बौद्धिक संपदा रक्षण अधिकाराची वरील 7 प्रकारात विभागणी करण्यात येऊन प्रत्येक बौद्धिक संपदेचे अटी व दर्जांकन निश्चित करण्यात आले व त्यानुसार प्रत्येक जा.व्या.सं. सदस्य देशाने आपल्या देशातील पेटंट कायद्यात बदल विशिष्ट मुदतीत करणे आवश्यक ठरले. भारताला देखील जा.व्या.सं. चा सदस्य देश असल्यामुळे असे बदल करणे बंधनकारक होते. तसे बदल भारतीय पेटंट कायद्यात केल्याने त्याचे तीव्रपडसाद सर्वदूर उमटले पेटंट अध्यादेशाच्या संभाव्य बदलाचा परिणाम लक्षात घेण्याअगोदर पेटंटचा नेमका अर्थ, पाहू या.

**ब. पेटंट संकल्पनेचा अर्थ**

पेटंट म्हणजे "एखाद्याने केलेल्या संशोधनावरील त्याचा हक्क अबाधित राखणे होय, त्याच्या संशोधनाची चोरी होणार नाही याची हमी देणे होय". थोडक्यात पेटंट म्हणजे स्वामित्व अधिकार.

मनुष्य प्राण्यास बुद्धि असल्याने तो चौकस होऊन, नित्य नवीन गोष्टींच्या शोधामागे असतो. माणसाने जिज्ञासु वृत्तीने नवीन शोध लावावेत व त्या द्वारे जनमानसाचे/सामान्यांचे जीवन अधिकाधिक सुखी करण्यासाठी प्रयत्न करावे या साठी शोधकर्त्याला प्रोत्साहन दिले पाहिजे. तसेच त्याने केलेल्या संशोधनामुळे समाजाबरोबरच त्याचा आर्थिक फायदा झाला पाहिजे या दृष्टिकोनातून स्वामित्व (पेटंट) अधिकार दिला जातो मात्र असा अधिकार संबंधीत व्यक्तीला प्राप्त होण्यासाठी पुढील अटींचे पालन करणे आवश्यक आहे.

1. ज्या शोधासाठी पेटंट मिळावयाचे त्या शोधात नावीन्य हवे (Innovation).

2. शोधातील नाविन्य सहज लक्षात येता कामा नये (Non-obvious).

3. त्या शोधाचा व्यापारी तत्त्वावर उपयोग होऊन समाजाचा/राष्ट्राचा आर्थिक लाभ झाला पाहिजे.

वरील अटींची पूर्तता झाल्यास पेटंट (स्वामित्व) अधिकार विशिष्ट कालावधीसाठी मक्तेदारी स्वरूपात प्राप्त होतो. त्यामुळे विशिष्ट कालावधीत तो शोध स्वत: एकटा वापरू शकतो किंवा त्याच्या परवानगीने दुसऱ्या व्यक्तीला वापरता येतो किंवा स्वत:च वापरता दुसऱ्याला विकू शकतो/ तसेच पेटंट धारक परवाना देखिल देऊ शकतो किंवा त्या शोधाचा वापर न करण्याचेही ठरवू शकतो. थोडक्यात शोध लावण्यासाठी लागलेले श्रम, वापरलेला पैसा, बुद्धि व वेळ इ. भरपाई करून संशोधन कार्यास चालना देण्यासाठी पेटंट (स्वामित्व) अधिकार जगात सर्वदूर देण्यात येत असले तरी त्याचा तपशील, अटी व व्याप्ती देशपरत्वे भिन्न असल्यामुळे भारतीय पेटंट कायदा, त्याचा तपशील व दृश्यपरिणाम इत्यादी मुद्यांवर चर्चा करू या.

### क. भारतीय पेटंट कायदा 1970

टेकचंद समिती व न्यायमूर्ती अय्यंगार समितीच्या शिफारशी लक्षात घेऊन 1970 साली भारतीय पेटंट कायदा मंजूर करण्यात आला त्याची वैशिष्टये पुढील प्रमाणे -

1. भारतात वस्तुंना पेटंट दिले जात नाही तर 'प्रक्रियेसाठी' दिले जाते.

2. भारतीय पेटंट कायद्यामार्फत 5 ते 7 वर्षे संरक्षण दिले जाते.

3. परंपरागत ज्ञानासाठी पेटंट दिले जात नाही (उदा. हळदी, कडूनिंब इ. वापर)

4. भौगोलिक विशेषत्वामुळे विशिष्ट गुणधर्म प्राप्त झालेल्या वस्तुंचे पेटंट भारतात दिले जात नाही (उदा. बासमती तांदूळ, दार्जीलिंगच्या चहा वगैरे)

5. भारतात अन्नधान्य व औषध क्षेत्रात उत्पादनाचे पेटंट लागु होत नाही.

6. भारतात मानवी जीवनाशी संबंधीत कोणत्याही वस्तु/उत्पादनाचे पेटंट दिले जात नाही.

7. भारतात सरकारला वाटल्यास पेटंट धारकाने संबंतीत पेटंट हक्क/परवाना देण्याची सक्ती करण्याचा अधिकार आहे.

8. भारतात पेटंट अधिकाराचे उल्लंघन केल्सास, पेटंट धारकास ते पुराव्यासह कोर्टात सिद्ध करावे लागते.

भारतीय पेटंट कायद्याच्या स्वरूपामुळे भारतीय उद्योग क्षेत्राला विशेषत: औषध उद्योगाला अधिक फायदा झाला. भारतीय पेटंट कायदा 29 वस्तुंच्या पेटंटची अनुमती देत नाही (ज्यात शेतमाल व औषधांचा समावेश आहे.) भारतात उत्पादनाच्या पेटंटपेक्षा 'प्रक्रियात्मक' पेटंट औषध उद्योगांना दिले जात असल्यामुळे भारतीय पेटंट कायद्याचे औषध उद्योगावरील झालेले दृश्यपरिणाम पुढील प्रमाणे.

1. औषध निर्मितीच्या उद्योगात जगात भारताचा चुतर्थ क्रमांक लागतो.

2. जगात तयार होणाऱ्या औषधापैकी 8 ते 10 % औषधे भारतात तयार होतात.

3. भारतात औषधा संबंधीत संशोधन व विकास केंद्रांची संख्या सुमारे 1200 आहे.

4. भारतीय पेटंट कायद्याच्या प्रक्रियात्मक हक्कामुळे भारतीय औषध कंपन्या विदेशातून

आलेल्या औषधाची नक्कल (copy) करून कमी वेळेत व कमी खर्चात अशी औषधे भारतात तयार करून सर्वसामान्य नागरिकांना उपलब्ध करून दिली जातात.

5. स्वातंत्र्यपूर्व काळात देशातील औषध उद्योगावर बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्चस्व होते ते चित्र बदलले असून आज अनेक भारतीय (300 पेक्षा अधिक) औषध कंपन्याचे वर्चस्व औषधांच्या बाजारपेठेत आढळून येते. इतकेच नव्हे तर अनेक औषध कंपन्या परदेशात देशापेक्षा अधिक उलाढाल करतात (रॅनबॅक्स कंपनी).

6. आज भारतात 10 हजार पेक्षा अधिक औषधे सहज उपलब्ध असून आपण औषध उद्योगात स्वावलंबी होऊन अधिक निर्यात करीत आहोत.

7. भारतीय पेटंट कायद्यातील तरतुदीमुळे शासन स्वामित्व (Royalty) देऊन ती औषधे तयार करण्याची अनुमती दुसऱ्या कंपन्यांना देते त्यामुळे अनेक औषधे अनेक कंपन्या तयार करतात त्यामुळे स्पर्धा वाढून इतर देशापेक्षा कितीतरी स्वस्त किंमतीला भारतात औषधे उपलब्ध होतात.

उदा. भारतात सिप्रोफ्लोक्सॅसीन 500 मि.ग्रॅ. च्या 10 गोळ्याचे पॅकेट रू.29 पाकिस्तानात रू.425, इंडोनिशियात रू.393 इंग्लंडमध्ये रू185 तर अमेरिकेत रू, 2342.5 मिळते.

8. भारतात पेटंट कायदा लागु होण्या अगोदर औषधनिर्मिती करणाऱ्या कंपन्याची संख्या 2240 होती ती 2000 अखेर 30,000 इतकी झाली व 2004 अखेर जवळपास 42000 ते 45000 इतकी असेल असा अंदाज आहे.

9. जागतिक व्यापार संघटनेच्या सदस्य स्वीकारण्याच्यावेळी औषध उद्योगाची निर्यात केवळ 4000 कोटी होती ती आज 14000 कोटी झाली आहे.

10. भारतीय औषध कंपन्यांनी 1970 मध्ये 10% असलेला बाजारातील हिस्सा आज 60% पर्यंत वाढविला आहे.

थोडक्यात भारतीय पेटंट कायद्यातील विशिष्ट तरतुदीमुळे औषध उद्योगाबद्दल वरील आशादायक चित्र आढळून येत असले तरी या कायद्याच्या त्रुटी/उणीवा मुळे किंवा नियंत्रण (देखरेख) यंत्रणेच्या अभावामुळे भारतीय औषधी उद्योगाची दुसरी नकारात्मक बाजू पुढीलप्रमाणे आढळून येते.

1. 1970 च्या पेटंट प्रक्रिया तरतुदींमुळे भारतात औषधे निर्मिती करणाऱ्या कंपन्यांची संख्यात्मक वाढ झाली.

2. पेटंट कायद्याच्या नियंत्रणाच्या अभावामुळे निकृष्ट दर्जाच्या औषधांची निर्मिती मोठ्या प्रमाणात होते. तसेच औषधांमध्ये आढळून येणारी घटकद्रव्ये ही आरोग्याला घातक ठरू शकतात.

3. भारतीय औषध कंपन्यानी पेटंटमधील पळवाटाचा वापर करून केवळ नक्कल करण्यावर भर दिला. स्वत:मात्र नवीन औषधावर संशोधन करून नवीन औषधाचे उत्पादन केले नाही.

4. जागतिक आरोग्य संघटनेने 2001 मध्ये केलेल्या पहाणीनुसार जगात एकूण 40 हजार कोटी रू. च्या बनावट औषधाची विक्री होते त्यापैकी 35% बनावट औषधे भारतात तयार होतात.

5. भारतीय औषधांच्या बाजारपेठेत जगभर बंदी घातलेली औषधे सुद्धा सहज विकली जातात कारण औषधांची सुरक्षितता तपासण्यासाठी आवश्यक सोय नाही त्यामुळेच पॅरासिटीमॉल, निमसुलाईड इ. औषधाची भारतात सहज विक्री होते.

6. भारतीय बाजारपेठेत औषधाची विक्री मूळ नावांपेक्षा वेगळ्या नावामुळे होते त्यामुळे औषधाच्या भेसळीचे प्रमाण वाढत आहे.

7. वाढत्या औषध कंपन्यांमुळे भारतीय औषध उत्पादक संघटनेचे वर्चस्व प्रस्थापित होत असल्याने सरकारचे औषध किमंतीवरील नियंत्रण कमीतकमी होऊन किंमतींवर नियंत्रण नसलेल्या औषधाची संख्या वाढते आहे. उदा - 1970 मध्ये भारतात तयार होणाऱ्या सर्व औषधाच्या किंमतीवर नियंत्रण होते आज 2002 अखेर सरकारचे फक्त 32 प्रकारच्या औषधाच्या किंमतीवर नियंत्रण आहे. याचाच अर्थ असा की भारतात अनेक औषध कंपन्यातून तयार होणाऱ्या औषधाच्या किमंतीवर सरकारचे नियंत्रण नसल्यामुळे औषधाच्या किंमतीत गेल्या 10 वर्षात 200 ते 300 टक्केपर्यंत वाढ झाली.

8. भारतातील पेटंट कायद्यामुळे उत्पादनावर आधारित नियंत्रण प्रणाली कार्यरत आहे त्यामुळे नव्या उत्पादनात घट होते मात्र दुसऱ्या बाजूला औषधांची मात्रा /प्रमाण व आवेष्टनाच्या आकारात वाढ होते. उदाहरणार्थ क्रोसिन गोळीत पॅरॉसिटीमॉल घटक आहे. कंपनीला क्रोसिनशिवाय दुसरे उत्पादन बाजारात आणता येत नाही म्हणून कंपनी अस्तित्वात असलेल्या चिन्हांत बदलकरून क्रोसीन 125, क्रोसिन 250, क्रोसिन 500 इ. मात्रेचे उत्पादन बाजारात आणले त्यामुळे ग्राहकांच्या मनात प्रचंड गोंधळ निर्माण होतो आहे.

9. सार्वजनिक संस्थाना पुरविण्यात येणारी औषधे खुल्या बाजारात विकु नयें असे स्पष्ट संकेत असतांना सुद्धा ती औषधे खुल्या बाजारात मोठ्या प्रमाणात विकली जातात.

10. इतकेच नव्हे तर त्रयस्थ पक्ष(Third Party)परवान्याचा वापर करून उत्पादन शुल्क औषध कंपन्या मोठ्या प्रमाणात चुकवितात व सरकारची फसवणूक करतात.

अशाप्रकारे भारतीय पेटंट कायदा 1990 चा चांगले/वाईट परिणाम विशेषत: औषध उद्योगावर झालेले आहे व होत असतानाच आपण जा.व्या.सं.चे सदस्यत्व स्वीकारल्यामुळे पेटंट कायद्यात बदल करणे हा एकच पर्याय आपणासमोर असल्यामुळे 26 डिसें. 2004 रोजी अध्यादेश काढून दुरूस्ती सुचविली व त्यावर चर्चा होऊन पेटंट अध्यादेशात जा.व्या.सं. च्या व्यापार विषयक बौद्धिक संपदा रक्षण करारानुसार नेमकेबदल कोणते झाले/करण्यात आले हे लक्षात घेणे जरूरीचे आहे.

**ड. भारतीय पेटंट कायद्यातील बदल**

जागतिक व्यापार संघटनेच्या शर्तीनुसार ठराविक मुदतीत (मार्च 2005) भारतीय पेटंट कायदा 1990 मध्ये दुरूस्ती करणे अपरिहार्य असल्यामुळे अखेर त्या कायद्यात तिसऱ्यादा दुरूस्ती करण्यात आली कारण या अगोदर सन 1999 व 2002 मध्ये निर्देशानुसार विक्रीचे विशेषाधिकार संबंधीत कंपनीला देण्याची व सुक्ष्मजीव व मृदुसामग्री (Software) संबंधीत शोध पेटंटच्या कक्षेत ओढून पेटंट कालमर्यादा वाढविण्यात आली होती. साहजिकच या दुरूस्तीमुळे सर्वदूर तीव्र स्वरूपाच्या प्रतिक्रिया व्यक्त करण्यात येऊ लागल्या. उदा - नव्या पेटंट अध्यादेशामुळे औषध कंपन्याच्या विकासावर विपरीत परिणाम होऊन औषधांच्या किमंतीत प्रचंड वाढ होईल, औषध घेणे गरिबांना परवडणार नाही, औषध कंपन्या बंद होतील, रोजगाराच्या संधी कमी होतील वगैरे तर दुसऱ्या बाजूला या दुरूस्तीला विरोध करण्यासाठी भाजपने राजकीय द्वेषाने प्रेरित होऊन विधायकाला विरोध केला तरी डाव्यापक्षाच्या पाठिंब्यांवर वरिल अध्यादेश दोन्हीसभागृहात मंजुर करण्यात आला. यातील प्रमुखतरतुदी (करण्यात आलेला बदल) पुढील प्रमाणे आहे.

1. नव्या पेटंट दुरूस्तीमुळे भारत 'प्रक्रिया पेटंट' ऐवजी 'उत्पादन पेटंटच्या युगात प्रवेश करणार यामुळे ज्या वस्तुचे पेटंट एखाद्या देशी/विदेशी कंपनीच्या ताब्यात असेल त्याच कंपनीला संबंधीत

वस्तुचे उत्पादन/विक्री करता येईल.

2. व्यापार विषयक बौद्धिक संपदा रक्षण करारातील कलम 27 नुसार पेटंट अन्न, औषधे रसायने शेती या व्यतीरिक्त अणुशक्ती, जीवतंत्रज्ञान प्रमाणेच मृदुसामग्री क्षेत्रांना लागु करण्यात येणार आहे.

3. व्यापार विषयक बौद्धिक संपदा रक्षण च्या कलम 33 प्रमाणे सर्वप्रकारच्या संशोधन क्षेत्रातील शोधासाठी संरक्षणाचा कालावधी 20 वर्षांचा करण्यात आला आहे.

4. पेटंट परवाना कोणत्याही परिस्थितीत सरकारला दुसऱ्या कंपनीला देता येणार नाही.

5. पेटंट कायद्याचे उल्लंघन झाले आहे हे सिद्ध करण्याची जबाबदारी पेटंटधारकांवर नसून त्याने ज्याच्यावर आरोप केला अशा आरोपीची असेल.

**इ. पेटंट कायद्यातील बदलाचे संभाव्य परिणाम**

1. पेटंट दुरूस्ती मुळे प्रक्रिया पेटंट ऐवजी उत्पादन पेटंट हे शोध लावणाऱ्यास दिले जाईल यामुळे खर तर इतर साऱ्याचे उत्पादनावरचे सर्व अधिकार आपोआप रद्द होऊन, स्पर्धात्मक प्रवृत्ती कमी होऊन एक प्रकारे बहुराष्ट्रीय कंपनीच्या मक्तेदारीस प्रोत्साहन मिळेल.

2. पूर्वी अविकसीत/विकसनशिल राष्ट्रे तंत्रज्ञानाची नविन शोधाची आयात करून स्वत:च्या राष्ट्राचा आर्थिक विकास करीत होती, आता पेटंटच्या नव्याअध्यादेशामुळे तंत्रज्ञानाच्या शोधासाठी करोडो डॉलर स्वामित्वाच्या (Royalty) स्वरूपात लागतील त्यामुळे गरीब राष्ट्राच्या विकासात अडथळे निर्माण होऊन अशी राष्ट्रे अप्रगत रहातील तर दुसरीकडे श्रीमंतराष्ट्र अधिक श्रीमंत होतील.

3. नवीन पेटंट दुरूस्ती मुळे वस्तू व्यातिरिक्त, जीवजंतु/बियाणे इ. चे पेटंट होणार त्याचा विपरित परिणाम पारंपरीक आदिवासी व शेतकरी वर्गावर होऊन त्यांना स्वत:च्या शेतातील धान्याच्या बियाणे म्हणून वापर करतायेणार नाही केल्यास ती जैवीक चोरी ठरून त्याबद्दल संबंधीत कंपनीला योग्य प्रमाणात स्वामित्व द्यावे लागेल.

4. पेटंट कायद्यामुळे बियांणासाठी सुद्धा पेटंट दिले जाईल अशा परिस्थितीत पेटंट धारकांच्या संमतीशिवाय बियाणे बाजारात उपलब्ध होणार नाहीत ह्यामुळे कोणी काय पिकवावे ही बाब पेटंटधारकाच्या इच्छेवर अवलंबून राहण्याची शक्यता झाल्यास भारतासारख्या शेतीप्रधान देशाच्या अर्थव्यवस्थेवर व शेतकऱ्यांच्या व्यक्तीगत जीवनावर विपरीत परिणाम होईल.

5. पेटंटच्या बदलत्या अध्यादेशामुळे जीवतंत्रज्ञान व विविध वनस्पती व त्याच्या परंपरागत गुणधर्मासाठी लढा द्यावा लागेल. इतकेच नव्हे तर देशाच्या स्वयंनिर्भरतेवर मोठ्या प्रमाणात आघात होऊन परावलंबित्व वाढण्याची शक्यता नकारता येणार नाही.

6. भारतात आतापर्यंत उत्पादन प्रक्रियेसाठी पेटंट अधिकार असल्यामुळे विशिष्ट उत्पादनाची थोडी वेगळी प्रक्रिया करून निर्मिती व विक्री करता येत होती त्यामुळे अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांची औषधे भारतात तयार करून कमी किमंतीत विकली जात असे इतकेच नव्हेतर निर्यात देखील होत असे.

आतामात्र उत्पादन पेटंट मुळे औषधीनिर्मितीची मक्तेदारी वाढून विशेषत: जीवनोपयोगी किंवा एड्स, कर्क या सारख्या रोगांवर औषधे बनविण्याचा परवाना मिळण्यास अडचणी येतील व अशी औषधे महाग होतील.उदा.-कर्क रोगाच्या उपचारासाठी स्विडीश नोव्हारटीस कंपनी ग्लिबेकचे उत्पादन करते त्याच सॉल्टच्या आधारे भारतीय कंपनी जे औषध तयार करते त्या औषधांना एका महिन्यासाठी आठहजार रूपये लागतात.

पेटंटमुळे अशी औषधे भारतात तयार होणार नाही व ही औषधे स्विडीश कंपनी कडून खरेदी करावी लागतील. 1 महिन्यासाठी त्यावर 1 लाख 20 हजार खर्च येईल ही वस्तुस्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे.

7. पेटंट कायद्याचा औषध बाजारपेठेवर विपरित परिणाम होऊन 1200 कोटी रू. उलाढाल कमी होईल.

8. उत्पादन पेटंटमुळे लहानमोठ्या जवळपास 2/3 (20 हजार) औषध निर्मीती कंपन्या बंद पडतील व ह्याचा परिणाम रोजगारावर होऊन रोजगारीचे प्रमाण कमी होईल तर दुसऱ्या बाजुला बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी सहन करण्याशिवाय ग्राहकांकडे पर्याय राहणार नाही.

9. पेटंट कायद्यातील बदलामुळे उत्पादकाला/संशोधनकर्त्याला 20 वर्षापर्यंत सुरक्षितता/स्वामित्त्व मिळेल. पेटंट धारकाचा हा अधिकार सामाजिक दृष्टिने घातक असून मानवाधिकारावर अतिक्रमण करणारा ठरेल.

10. पेटंट धारक कोणावरही पेटंट चोरल्याचा/गैरवापराचा आरोप करू शकेल अशा परिस्थितीत ज्याच्यावर आरोप केला त्या आरोपीने स्वत: सिद्ध करावे की तो स्वत: गुन्हेगार नाही, ही बाब नैसर्गिक न्याय तत्वाला बाधा आणणारी असुन त्यामुळे निरपराध व्यक्तींना/कंपनीला देशाला मोठ्या प्रमाणावर वेळ व पैसा खर्च करावा लागेल.

**समारोप**

पेटंट कायद्यात बदल होणार म्हणून गेले 10 वर्षापासून देशभरातील विविध स्तरांवर चर्चा केली जात होती. अशा परिस्थितीत राष्ट्रपतीनी 26 डिसेंबर 04 रोजी पेटंट विधेयकात दुरूस्ती करून करारास अपेक्षीत असे बदल केले.

वस्तुत: पेटंट कायद्याला सरसकट विरोध करणे योग्य नाही कारण पेटंट अध्यादेशातील दुरूस्तीचे परिणाम लक्षात येण्यास 2/4 वर्षाचा कालावधी लागेल या बदलामुळे सर्वच बाबी नकारात्मक होणार नाही तर काही परिणाम हे सकारात्मक होणार. उदा- भारतातील श्रम बाजारपेठ स्वस्त असल्यामुळे बाह्यस्रोतांच्या(Outsource) माध्यमातून रोजगारात निश्चित वाढ होईल. देशातील आयुर्वेदिक औषधांच्या बाजारपेठेस चालना मिळेल. भारतीय बुद्धिमत्ता व संशोधनवृत्ती जागतिक पातळीवर या अगोदर सिद्ध झाल्या ने व्यापार विषयक बौद्धिक संपदा रक्षण कराराचा बाऊ (कराराची भिती न बाळगता) न करता हा बदल म्हणजे जागतिक पातळीवर आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी आहे हे लक्षात घेऊन बदलत्या अध्यादेशाचे स्वागत करण्यातच शहाणपण आहे.

**संदर्भसूची**


1. Indian Patent Act 1970 - Indian Law Book Series.

2. Kulkarni S.K., "World Economic Environment" Phadke Publisher - Kolhapur.

3. गोपाळ संजय, 'आपण प्यादे बनणार' - आंदोलन मासिक ऑगस्ट 2003.

4.(संपादकीय) ''डाव्याची उजवी कामगिरी'' महाराष्ट्र टाईम्स - 25 मार्च 05.

5 दीवे राजेंद्र, '' नवा भारतीय पेटंट कायदा व औषधाच्या किंमती - योजना, एप्रिल 2005

6. पेटंट गुलामीचा विळखा -आंदोलन मासिक फेब्रुवारी 2005.


◆◆◆

# मराठी अर्थशास्त्र परिषद
# एकोणतिसावे वार्षिक अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे एकोणतिसावे वार्षिक अधिवेशन दिनांक 25 नोव्हेंबर ते 27 नोव्हेंबर 2005 या दरम्यान विद्या प्रतिष्ठानचे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, विद्यानगरी, बारामती येथे आयोजित करण्यात आले असून त्यामध्ये फक्त परिषदेच्या सदस्यांनाच सहभागी होता येईल. अधिवेशनाच्या संयोजकांकडून परिषदेच्या सदस्यांना निमंत्रण व माहिती पत्रक पाठविण्यात आले आहे. प्रतिनिधी शुल्क **रूपये सहाशे फक्त** असून ते मनीऑर्डरने/डिमांड ड्राफ्टने ''**मराठी अर्थशास्त्र परिषद एकोणतिसावे अधिवेशन, बारामती**'' या नावाने स्थानिक कार्यवाहांकडे पाठवावे. नव्याने परिषदेचे सदस्य होऊ इच्छिणाऱ्यांनी आपली सदस्यत्वाची वर्गणी (वार्षिक साधारण सदस्य वर्गणी रू. 250 किंवा आजीव सदस्य वर्गणी रू.1200) बारामती येथेच प्रतिनिधी शुल्काबरोबर पाठवावी. या रकमेची रीतसर पावती यथावकाश संबंधितांकडे परिषदेच्या कार्यालयाकडून पाठविली जाईल.

परिषदेतील (चौथ्या चर्चासत्रासाठी) आयत्या वेळेचा विषय खालीलप्रमाणे राहील.

**''जैवतंत्रज्ञानाचे आर्थिक व सामाजिक परिणाम''**

या विषयावर शोध निबंध मागविले जात नाहीत.

अधिवेशनासंबंधी आवश्यक तपशिलासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**मनीषा काकडे**
**स्थानिक कार्यवाह**
**विद्याप्रतिष्ठानचे कला, विज्ञान व वाणिज्य**
**महाविद्यालय, विद्यानगरी, बारामती, जि. पुणे.**

**चारूदत्त गोखले**
**कार्यवाह-खजिनदार**

# ही तर कंगालावस्था, महागाई नव्हे

**मागील वर्षी नायगरची सुगी फार भयानक नव्हती, परंतु आज तो देश इतका भुकेकंगाल का झाला ?**

✦ शि. ना. माने

*भूतपूर्व अध्यक्ष मराठी अर्थशास्त्र परिषद,*

"दारिद्र्याविषयी बरेच काही पुरेशा प्रमाणात सुव्यक्त (सुस्पष्ट) आहे", असे विश्वविख्यात व सर्वसन्मानित अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांनी त्यांच्या 1982 साली प्रकाशित झालेल्या 'Poverty and Famines' या अभिजात पुस्तकात म्हटले आहे. त्याचा पुढीलप्रमाणे खुलासा करताना ते म्हणतात "अनघड (सरल) दारिद्र्य ओळखण्यासाठी व त्याची पूर्वपीठिका जाणून घेण्यासाठी कष्टप्रद प्रमाणे (criteria), कौशल्यपूर्ण मापन किंवा वेधक विश्लेषण यांची कोणाला गरज असण्याचे कारण नाही." परंतु त्या पुस्तकात सेन यांनी मांडलेला प्रबंधच सुव्यक्त नाही. तो संदिग्ध आहे : जास्तीत जास्त वाईट दुष्काळ, खाद्यान्नात लक्षणीय घट झाली नसताना पडले आहेत, असा त्यांचा युक्तिवाद आहे. तोच जास्त सुस्पष्ट करण्याची येथे गरज आहे.

आपल्या प्रबंधाचे सोदाहरण स्पष्टीकरण करण्यासाठी त्यांनी आफ्रिकेच्या साहेल प्रदेशात 1968 ते 1973 या काळात अधिकतर गंभीर स्वरूप धारण करणाऱ्या दुष्काळाची निवड केली. साहेलची भूमी वाळवंटी व काहीशी रखरखीत आहे. साहेल प्रदेशात सहा देशांचा समावेश होतो. मॉरिटॅनिया, माली, अप्पर व्होल्टा (आजच्या बर्किना फॅसो), नायगर इत्यादी देशांना तीस वर्षांपूर्वीच्या दुष्काळाने जबरदस्त फटका बसला.

परिपूर्ण दुष्काळ नसला, तरी खाद्यान्न संकटाच्या मगरमिठीत परत एकदा नायगर सापडला आहे. परिणामी पशुधनाची आपद्जन्य विक्री (distress sales), मोठ्या प्रमाणावरील स्थलांतर व वंचितता अशा 1970-79 या दशकाच्या पूर्वार्धातील संकटांनी चालू वर्षात नायगरला ग्रासले आहे. त्याला नुकताच सामना कराव्या लागलेल्या सामुदायिक भुकेचे (mass hunger) स्पष्टीकरण करण्यात सेन यांचा प्रबंध किती प्रमाणात यशस्वी ठरतो ?

नायगरच्या चालू संकटाविषयी बरेच काही सुस्पष्ट दिसते. मागील वर्षी पावसाळा लवकर संपला; टोळधाड नियंत्रणाबाहेर गेली. अशा परिस्थितीत देखात खाद्यान्नाची टंचाई झाली तर तिच्यामुळे कोणी आश्चर्यचकित होण्याचे कारण काय? मात्र मागील नोव्हेंबरमधील नायगरमधील सुगी केवळ मध्यम होती. परंतु ती अनर्थकारी नव्हती. पावसाळा लवकर संपला. खाद्यान्न व कृषि संघटनेच्या (FAO) अंदाजानुसार तृणधान्यांचे उत्पादन मागील पाच वर्षांच्या सरासरीपेक्षा केवळ 11 टक्क्याने घटले होते. 2000-2001 मधील सुगीपेक्षा 22 टक्के ते जास्तच होते. आपणास माहीत असेल की 2000-01 हे वर्ष निर्धोकपणे पार पडले होते. त्या वर्षी टोळधाडीमुळे नायगरच्या खाद्यान्नापेक्षा त्यांच्या चाऱ्या चे जास्त नुकसान झाले. परिणामी त्या प्रदेशातील शेजारच्या तटवर्ती अधिकतर हरित कुरणांकडे मेंढपाळ व पशुधनाचे कळप यांचे स्थलांतर सुरू झाले.

**क्रयशक्तीहीनता**

नायगरच्या आपदेचे जास्त सुस्पष्ट कारण (खाद्यान्नांच्या) परिमाणात किंवा राशींत नसून ते किंमतींत आहे. विशेषत: मेंढपाळांसाठीचे मूल्य-तुल्यता दर दोन किंमतींवर अवलंबून असतात. तो ज्याची विक्री करतो (पशुधन) त्याची किंमत व तो ज्याची खरेदी करतो (खाद्यान्न) त्याची किंमत. या वर्षी नायगरमध्ये दुसऱ्याच्या किंमतींनी शिखर गाठले; पहिल्याची किंमत वेगाने कोसळली. एका अहवालानुसार मिलेट व सोर्घमची (ज्वारीवर्गीय धान्ये) किंमत मागील पाच वर्षांतील सरासरीच्या 75-80 टक्क्याने वाढली. मागील जूनपर्यंतच्या सहामहिन्यांत एक मात्रा मिलेटची खरेदी करण्यासाठी एकऐवजी दोन बकऱ्यांची विक्री करणे भाग पडले. मूल्य-तुल्यता दरातील नेमक्या याच निष्ठुर विरूपणामुळे मेंढपाळांवर गुडघे टेकण्याची पाळी आली. तसेच खरेदी करावयाच्या खाद्यान्नाचा अभाव नसतानाही क्रयशक्तीचा अभाव सहन करण्याची दुर्दैवी पाळी मेंढपाळांवर येईल, असा सेन यांचाही युक्तिवाद होता. येथे खरा प्रश्न असा आहे की नायगरच्या मेंढपाळांविरूद्ध किंमती अशाप्रकारे व एवढ्या वेगाने का वाढल्या ?

खाद्यान्न किंमतींतील धारदार (तीक्ष्ण) वाढ जशी मोठ्या विदेशी मागणीमुळे तशीच अल्प स्वदेशातील पुरवठ्यामुळे झाली असावी. परंपरेनुसार सुगीपूर्वीच्या खाद्यान्न संपुष्टात आलेल्या महिन्यात नायगरचे शेतकरी स्वत:च्या देशात तृणधान्ये पिकविण्यापेक्षा ते तुलनेने जास्त ओलिताखालील तटवर्ती शेजारच्या देशांत पिकविणे जास्त सुलभ (Cheaper) असलेल्या देशांतून त्या तृणधान्यांची आयात करतात. या प्रदेशांच्या खाद्यान्न सुरक्षेची जबाबदारी स्वीकारलेल्या एका आंतरसरकारी मंडळानुसार या वर्षात खाद्यान्नाचा प्रवाह मोठ्या प्रमाणावर विरूद्ध दिशेत वाहतो (निर्यात) आहे. म्हणजेच घाना, बेनन, नायजेरिया इत्यादी देश नायगर प्रदेशात खाद्यान्नाची खरेदी करीत आहेत.

अंशत: याचे कारण असे की या देशांच्या सुग्या निराशाजनक होत्या. परंतु नायजेरियाच्या बाबतीत सरकारी धोरण सदोष असल्याचे मत खाद्यान्न व कृषि संघटनेने नोंदविले आहे. नायजेरियाने तांदूळ व गहू यांच्या आयातीवर नियंत्रणे लादली आहेत. त्या देशाने पिठाच्या गिरण्यांतील कामगार (millers) व कुक्कुटपालन करणाऱ्या शेतकऱ्यांचे संरक्षण व प्रवर्तन करणारी धोरणे लागू केली आहेत. या दोन धोरणांमुळे देशातील मिलेट व सोर्घम यांची मागणी वाढली आहे. ही दोन खाद्याने पीठ तसेच कोंबडीखाद्य या पर्यायी स्रोतांचा ही पुरवठा करतात ही गोष्ट येथे ध्यानात घ्यावी लागते. परिणामी नायजेरियाची जी तृणधान्ये एरवी नायगरकडे गेली असती त्यांचे नायजेरियातच सेवन करण्यात आले.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट अशी की नायगरच्या तुलनेत नायजेरियाचे दरडोई उत्पन्न दोनपट व लोकसंख्या दहापटीपेक्षा जास्त आहे. नायगरच्या मेंढपाळांच्या क्रयशक्तीचे खराबीकरण करण्यास नायजेरियाच्या शक्तिशाली बाजाराचा फटका सहाय्यकारी ठरला असावा. सेन त्यांच्या उपरोक्त पुस्तकात म्हणतात, "खाद्यान्नाच्या बाजारावरील प्रभुत्वाच्या लढ्यात एका गटाला दुसऱ्या गटाच्या समृद्धीमुळे निश्चितपणे काही सहन करावे लागते. प्रत्येक व्यक्ती स्वहित जपते. त्यात जी मागे राहाते तिला दुष्टाच्या जाचाचे लक्ष्य व्हावे लागते". (निरंकुश वा नियंत्रित बाजाराविषयीचा सेन यांचा दृष्टीकोन येथे ध्वनित होतो).

या वर्षी बर्किना फॅसो व माली यांच्याप्रमाणे नायजेरियाने नायगरबरोबरच्या व्यापारी संधींचे (treaties) उल्लंघन करून त्याला होणाऱ्या निर्यातीवर निर्बंध लादले. अशा निर्बंधांनी दुष्काळाला वारंवार हीन लेखण्याचे व पुष्टी देण्याचे दुय्यम काम केले आहे. दुष्काळाचा इतिहास हेच सांगतो. उदाहरणार्थ, भारतातील प्रांतांमधील तृणधान्यांच्या निर्यातीवरील बंदीने बंगालला 1943 मधील मोठ्या दुष्काळात विघातक अशा वाढत्या किंमतींच्या संकटता लोटले.

ही झाली मूल्य-तुल्यता दराची खाद्यान्न किंमतींची एक बाजू. मूल्यतुल्यता दराची दुसरी बाजू (पशुधनाची किंमत) काय म्हणते ? पशुधनाच्या किंमती घसरल्या. त्याचे एक कारण असे की उत्तरेकडील कुरणांचा ऱ्हास झाला. परिणामी पशुधन रोड झाले. परंतु प्रकरण तेथेच थांबले नाही. प्रतिकूल मूल्यतुल्यता दर स्वतःची गती निर्माण करतो. तृणधान्यांचा वाढणाऱ्या किंमती मेंढपाळांना त्यांच्या अधिकतर पशुधनाची विक्री करण्यास प्रवृत्त करतो. या आपद्जन्य विक्री प्राण्यांची किंमत अधिकतर प्रमाणात घटविण्यास चालना देतात. घटणाऱ्या किंमतीलाही आणखी जास्त पशुधनाची विक्री करणे मेंढपाळांना भाग पडते. येथे सेन यानी त्यांच्या पुस्तकात उपस्थित केलेल्या सैद्धांतिक शक्यतेची नोंद घेणे जरूर आहे. ती शक्यता अशी की मेंढपाळांच्या पशुधनाचा पुरवठा वक्र मागील बाजूकडे कलतो. दुसऱ्या शब्दात, पशुधनाची तौलनिक किंमत जशी घटते, तसे अर्थशास्त्राची मूलतत्त्वे ध्वनित करतात त्याप्रमाणे, भूकपीडित मेंढपाळ थोडे नव्हे तर (उलट) जास्त प्राणी बाजारात नेतो.

जर सामुदायिक भूक पुरेशा खाद्यान्नाच्या अभावाचा परिणाम असती, तर पुढील उपाय सुस्पष्ट ठरला असता : तो म्हणजे जास्त खाद्यान्न. नायगरला शिधावाटपांची जहाजातून खाजगी करणे, विमानातून ते वाहून नेणे व ते ट्रक मध्ये भरून नेणे ही आपत्कालीन कामे खरोखर आवश्यक व निकडीची आहेतच. परंतु ती आवश्यकता व ती निकड जोपर्यंत तेथील भूक व कंगालावस्था तीव्र व विस्तृत असतील तोपर्यंत जाणवेल. उलट (सेन प्रतिपादन करतात त्याप्रमाणे) खाद्यान्नाच्या टंचाईपेक्षा क्रयशक्ती कोसळल्याने जर सामुदायिक भूक निर्माण होत असेल, तर तिला (सामुदायिक भुकेला) प्रतिबंध करण्यासाठी खाद्यान्नाची विमानवाहतूक निरर्थक ठरते. येथे गरज आहे ती नष्ट झालेल्या क्रयशक्तीचा जीर्णोद्धार करण्याची. त्यासाठी यथोचित वेतनावर सार्वजनिक कामांची तरतूद करण्याची गरज आहे. बाजार मागणीचा आदर करतो, गरजेचा नव्हे. परंतु त्या बाजारात गरजुंना जरूर पुरेसा मदतीचा हात द्या, आणि बाजार बाकी सर्व बघून घेईल.

(द इकनॉमिस्ट मधील लेखाचा अनुवाद ऑगस्ट 20-26, 2005)

✦✦✦

ग्रंथपरीक्षण

# भारताचा आर्थिक ताळेबंद

(लेखक : प्रभाकर रघुनाथ जोशी, पृष्ठसंख्या 246, ग्रंथाली प्रकाशन किंमत रू. 180. प्रकाशन वर्ष : डिसें. 2002)

✦ दि.व्यं. जहागिरदार

*माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद,*
*संचालक सेंटर फॉर इकॉनॉमिक अ‍ॅन्ड सोशल स्टडीज, अमरावती.*

**भा**रताचा आर्थिक ताळेबंद, नव्या शतकातील आव्हाने, हे प्रभाकर रघुनाथ जोशी यांनी जागतिकीकरण, मुक्त अर्थव्यवस्था आणि खाजगीकरणाच्या पार्श्वभूमीवर हे पुस्तक लिहिले आहे. गेल्या 40 वर्षांमध्ये लेखकास अग्रणी अशा वित्तसंस्थांमध्ये कामाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला, तसेच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सारख्या संस्थेत त्यांनी अध्यापनाचेही कार्य केले. आर्थिक विषयांवरील अभ्यास, संशोधन आणि प्रत्यक्ष व्यवहाराचा अनुभव याचे फलित म्हणजे हा ग्रंथ होय.

या पुस्तकात एकूण दहा प्रकरणे असून तीन परिशिष्टे आहेत. 'नव्या शतकातील आर्थिक आव्हाने' या पहिल्याच प्रकरणात त्यांनी भारतासमोरील काही महत्त्वाची आव्हाने विशद करून भारतीय अर्थव्यवस्थेच्या काही महत्त्वपूर्ण पैलूंवर प्रकाश टाकला आहे. विकास कार्यातील संभाव्य धोक्यांचाही उल्लेख केला आहे. या प्रकरणातून भारताच्या आर्थिक विकासाची स्थिती निश्चित समाधानकारक आहे असे वाटते. मात्र, भारताची आर्थिक दैन्यावस्था बघितली की दूरवरचा विचार करायला कोणी तयार नाही अशी खंतही लेखक व्यक्त करतात. गेल्या 8-10 वर्षातील भारतीय अर्थव्यवस्थेची स्थिती आर्थिक दैन्यावस्थेची नाही ! भारताने विकासासाठी काय करावयास हवे हे सांगतांना लेखक भावनिक पातळीवर वावरतांना दिसतात. दुसऱ्या प्रकरणात दारिद्र्य, बेरोजगारी आणि मानवी विकास या मुद्यांचे विवेचन केले आहे. दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमाची, त्याच्या फलश्रुतीची व बेरोजगारीच्या प्रश्नाची आकडेवारीच्या सहाय्याने चर्चा केली आहे. मानवी विकास अहवालाचा आधार घेऊन मानवी विकासाबाबत चांगली चर्चा व अत्यंत

उपयुक्त माहिती या प्रकरणात वाचावयास मिळते. महिलांचा विकास प्रक्रियेतील सहभाग, पुरूषांच्या तुलनेत कमी आहे. पंचवार्षिक योजनांमध्ये अमाप पैसा खर्च करूनही दारिद्र्य व बेकारी या समस्या कायम आहेत. या समस्या सोडविण्यासाठी, गुंतवणूकीस चालना देणे, लोकसंख्या वाढ नियंत्रित करणे, शिक्षणावर भर देणे या उपायांसोबत उत्तम व्यवस्थापनावर भर देण्याची गरज लेखकाने प्रतिपादली आहे. सध्याच्या आर्थिक सुधारणांच्या पार्श्वभूमीवर व्यवस्थापन कौशल्यावरील भर यथोचित वाटतो.

'शेती क्षेत्राची वाटचाल' या तिसऱ्या प्रकरणात इ.स. 1950 ते 1965,1666 ते 1991 आणि 1991 नंतर अशा तीन टप्प्यात शेती विकासाचा आढावा घेतला आहे. शेतीला आवश्यक असणारे वित्त, खते, शेतमालाचे विपणन, अनुदाने, शेतमालाच्या किंमती इ. प्रमुख समस्यांचाही उहापोह केला आहे. शेतीच्या इतक्या महत्त्वाच्या समस्यांचा विचार झाला असला तरी प्रत्येक समस्येला इतके विविध आयाम आहेत की त्या आयामांचा विचार येथे होऊ शकला नाही. बहुधा पृष्ठ मर्यादांमुळे असे झाले असावे. शेती उत्पन्नावर कर बसविण्याची गरज लेखकाने सुचविली आहे. 'भारताची उद्योग गाथा' या चौथ्या प्रकरणात आर्थिक सुधारणांच्या काळापर्यंत झालेल्या औद्योगिक क्षेत्रातील विकासाचे विवेचन केले आहे. सार्वजनिक क्षेत्राचा आढावा घेतांना, सार्वजनिक उद्योगांनी भरीव कामगिरी केली नाही असे लेखकाला वाटते. ज्या प्रमाणात तेथे भांडवल गुंतवल्या गेले त्या मानाने त्यांची कामगिरी तोकडी पडली. विशेषत: कुशल व्यवस्थापनाचा तेथे अभाव आहे. 1991 नंतर खाजगीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. सार्वजनिक उद्योगातील निर्गुंतवणूक, जागतिक व्यापार संघटना, सार्वजनिक क्षेत्रातील आजारी गिरण्या इ. प्रश्नांचीही या प्रकरणात चर्चा केली आहे. विशेष म्हणजे 1991 नंतर खाजगी क्षेत्रातील उद्योगांच्या विकासावर अधिक प्रकाश पडणे आवश्यक होते. खाजगी क्षेत्रात सर्व आलबेल आहे का ? विदेशी कंपन्यांचा भारतीय उद्योगातील शिरकाव, भारतीय कंपन्यांनी विदेशी कंपन्यांशी केलेली हातमिळवणी, लघु उद्योगांची होत चाललेली पिछेहाट, श्रमिक चळवळ इ. महत्त्वाच्या विषयांवर लेखकाची भूमिका कोणती आहे हे वाचायला नक्कीच आवडले असते. 'बदलती वित्त व्यवस्था : गुंतवणूक व्यवहार' या पाचव्या प्रकरणात 1) बँका आणि वित्त व्यवस्था आणि 2) भांडवली बाजार यंत्रणा अशा दोन विषयांचे विवेचन केले आहे. 1991 नंतर वित्तीय सुधारणांच्या संदर्भातील बदलाचे विवेचन करून, औद्योगिक कंपन्यांना कर्ज रोखे खुल्या बाजारात मुक्तपणे विक्रीस काढता येऊ लागल्याने, भारतात औद्योगिक भांडवलाची मुक्त किंमत निर्धारण करण्याचे युग सुरू झाले असे लेखकाचे मत आहे. प्रस्तुत प्रकरणात शेअर बाजार यंत्रणा समर्पकपणे व सोप्या पद्धतीने विशद करण्यात आली आहे. शेअर बाजारांच्या संख्येत झालेली वाढ, संगणकांचा विपुल वापर, भारतीय प्रतिभूती विनिमय प्रमंडळाची (सेबा) नियंत्रणे इ. बाबी स्पष्ट करून भारतीय वित्त व्यवस्थेसमोरील आव्हानांचाही थोडक्यात उहापोह लेखकाने केला आहे. या आव्हानांपैकी महत्त्वाचे आव्हान हे जोखीम व्यवस्थापनाचे आहे. वित्त व्यवस्था स्पर्धात्मक बनविणे हे ही एक आव्हान आहे. भारतीय वित्त यंत्रणा अन्य आशियाई देशांच्या तुलनेत अधिक सक्षम असल्याचा निर्वाळा लेखकाने दिला आहे.

सहाव्या प्रकरणाचे शीर्षक आहे - 'निर्यात, परदेशी भांडवल आणि भारतीय चलन' 1991 पूर्वीच्या तुलनेत 1991 नंतर निर्यात नियंत्रणे बरीच दूर झाल्याने अर्थव्यवस्थेला त्याचा फायदा झाला असे लेखकाने नमूद केले आहे.. अनेक उद्योजकांनी

आंतरराष्ट्रीय प्रमाणक संघटनेकडून (ISO) प्रमाणपत्रे मिळविलीत. निर्यात वृद्धीसाठी विशेष आर्थिक केंद्रांची स्थापना झाल्यामुळे निर्यातीत वाढ होण्यास मदत झाली. या केंद्रांना कामकाजाचे भरपूर स्वातंत्र्य असते. भारताच्या निर्यातीचा एकूण जागतिक निर्यातीमधील हिस्सा 9 प्रतिशत पेक्षा कमी आहे. हा हिस्सा वाढविण्यासाठी भारताने विशेष निर्यात निती आखावी असे लेखकाला वाटते. या निर्यात नितीचा उहापोह येथे अपेक्षित होता. भारतात प्रत्यक्ष परदेशी गुंतवणूक वाढत आहे. चीनच्या तुलनेत भारतात होणारी ही प्रत्यक्ष परदेशी गुंतवणूक अल्प आहे. भारतात होणाऱ्या प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीमुळे भारताला जागतिक वित्त संस्थांकडून पूर्वी इतकी आर्थिक मदत घेण्याची गरज उरलेली नाही. विनिमय मूल्याच्या वा दराच्या बदलांचा अंदाज घेऊन विविध चलनात पैसा उभा करण्याची गरज लक्षात घेता भारताने तरलता व्यवस्थापनाकडे लक्ष देऊन तसे व्यवस्थापन अवगत करण्याची आवश्यकता आहे. भारतीय चलन चालू खात्यावर परिवर्तीत केल्यामुळे विदेशी विनिमयाच्या बाबत पूर्वी होणाऱ्या हवाला व्यवहारांवर नियंत्रण आले आहे. भारताला भांडवली खात्यावरही रूपया परिवर्तनीय करावा लागेल. लेखकाने याबाबत विविध मतमतांतरांचा फारसा आढावा घेतला नाही. 'व्यवस्थापन चळवळ व भारत' हे सातवे प्रकरण पूर्वीच्या प्रकरणांपेक्षा वेगळे, व निराळे आहे. व्यवस्थापनाच्या क्षेत्रातील लेखकाचा अभ्यास व विषयाकडे पाहण्याची दृष्टी येथे लक्षात येते. औद्योगिक घराण्यांनी चालविलेल्या उद्योगांमधील व्यवस्थापनशास्त्र हे कुठल्याही सिद्धान्ताप्रमाणे न चालणारे पण व्यवहारात उपयोगी पडणारे व्यवस्थापन आहे. उदा. अंबानी, बजाज, बिर्ला इ. उद्योगांचे व्यवस्थापन. प्रशिक्षित तज्ज्ञ व्यवस्थापकांद्वारे चालणारे उद्योग म्हणजे हिंदुस्थान लिव्हर्स, लार्सन अँड टुब्रो इ. अशा व्यवस्थापनांचे लेखकाने कौतुक केले आहे. भारतात व्यवस्थापन प्रशिक्षण देणाऱ्या विविध संस्था आहेत. आरोग्य, नागरी प्रशासन इ. साठी देखील उपयुक्त प्रशासन पद्धती भारतीय व्यवस्थापन संस्था (I.I.M.) सारख्या अग्रणी संस्थांनी शोधली आहे. भविष्य काळात बँक, विमा, शिक्षण इ. क्षेत्रासाठी अधिक प्रगत व्यवस्थापन संस्था स्थापन होतील. आर्थिक सहकार आणि विकास संघटना ((O.E.C.D.) या संस्थेने 1998 साली कंपनी कारभाराचे महत्त्व ओळखून जी समिती स्थापन केली होती तिने 1999 मध्ये अहवाल सादर केला होता. सभासद राष्ट्राने स्वतःच्या देशातील स्थिती विचारात घेऊन स्वतःची कारभार संहिता तयार करावी. ही या समितीची एक शिफारस फार महत्त्वाची आहे. लेखकाला असे वाटते की, भारताने ही स्वतःची व्यवस्थापन तंत्र व शैली विकसित केली पाहिजे.

'लोकसंख्यावाढ, शिक्षणक्षेत्र आणि अर्थविवेक' या आठव्या प्रकरणात संबंधित विषयांची चर्चा केली आहे, शिक्षण क्षेत्रावरील लिखाण मात्र फार त्रोटक वाटते. उच्च शिक्षणात भारताने प्रगती केली पण प्राथमिक शिक्षणात देश मागासलेला आहे. हे विधान तपासून पाहिले पाहिजे. त्याबाबत अधिक विश्लेषण हवे, शेरेबाजी नसावी. भारताचा अर्थविवेक हा मुद्दा स्पष्ट करताना अर्थविवेक म्हणजे नेमके काय हे स्पष्ट होणे जरूरीचे आहे. आकडेवारीवरून अर्थविवेक हरविला आहे असा लेखकाने निष्कर्ष काढला आहे. मुक्त अर्थव्यवस्था, जागतिकीकरण व भारत हे नववे प्रकरण महत्त्वाचे आहे. जागतिकीकरण, मुक्त अर्थव्यवस्था यावर विस्तृत चर्चा आज सर्वदूर चालू आहे. जागतिकीकरणाचे साधक बाधक विवेचन झाले असून लेखकाचा जागतिकीकरणाला असणारा पाठिंबा दिसून येतो. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला

विरोध करणाऱ्यांच्या विरोधाला लेखकाने समर्पक उत्तरेही दिली आहेत. पण विरोधकांच्या भूमिकेत तथ्य कमी आणि व्यक्त केलेली भीती निराधार आहे असे लेखकाने म्हटले आहे. भारताने व्यवहारी भूमिका घेऊन अन्यायाविरूद्ध लढले पाहिजे ही लेखकाने घेतलेली भूमिका योग्य वाटावी अशीच आहे. (विरोधकांना तरी आणखी काय हवे होते ?) शेवटच्या 'बदलती जागतिक समीकरणे व भारताचा प्रतिसाद' या प्रकरणात गेल्या शतकातील बदलांचा आढावा घेऊन जागतिक स्तरावरील स्थित्यंतराची दखल घेतली आहे. भारताने या स्थित्यंतरांना थोड्या उशीरा प्रतिसाद दिला आहे. भारतीय समाजाने आपसातील मतभेद विसरून एकजुटीने परिस्थितीशी सामना केला पाहिजे ही लेखकाची भूमिका प्रत्येकालाच मान्य होणारी आहे. लेखकाचा सकारात्मक दृष्टीकोन ही या पुस्तकाची निश्चितच जमेची बाजू आहे.

प्रभाकर रघुनाथ जोशी यांच्या या पुस्तकामुळे जागतिकीकरणाच्या संदर्भात लिहिलेल्या पुस्तकांमध्ये एका चांगल्या पुस्तकाची भर पडली आहे. पुस्तकाची भाषा सोपी, सर्वसामान्यांना समजेल अशी व प्रवाही आहे. लेखकाला व्यवस्थापन शास्त्रात रूची आहे. त्या क्षेत्रात त्यांचा अधिकार आहे. या पुस्तकातील सातव्या प्रकरणावर (व्यवस्थापन चळवळ व भारत) त्यांनी स्वतंत्र पुस्तक मराठीतून लिहावे ही इच्छा व्यक्त करून मराठीत संग्राह्य पुस्तक लिहिल्याबद्दल लेखकाचे अभिनंदन करावेसे वाटते.

✦✦✦

## मराठी अर्थशास्त्र परिषद
## आजीव सदस्य सूची (डिरेक्टरी) विषयक आवाहन

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सभासदांची सूची प्रसिद्ध करण्याचा मानस आहे. त्यासाठी अर्जाचा नमुना एप्रिल-जूनच्या अंकात पृष्ठ क्र. 97 वर दिलेला आहे. आतापर्यंत फक्त 60 आजीव सदस्यांनी अर्ज भरून पाठविला आहे. या अंकात अर्जाचा नमुना पुन्हा पान क्र. 191 वर दिला आहे. तो पूर्ण भरून त्यासोबत आपले एक रंगीत पारपत्राच्या आकाराचे (पासपोर्ट साईज) छायाचित्र पाठवायचे आहे. सूचीच्या छपाईसाठी खर्चासाठी रू. 100/- ची मनिऑर्डर किंवा मराठी अर्थशास्त्र परिषद या नावाने काढलेला 100/- रू. चा. बँक निकष (ड्राफ्ट) कार्यवाह खजिनदारांकडे कृपया पाठवावा ही विनंती.

आपण पोस्टाने अर्ज पाठवू शकला नाहीत तर बारामती येथे होणाऱ्या 29 व्या अधिवेशनाच्या वेळी प्रत्यक्ष घेऊन यावा ही विनंती.

हे त्रैमासिक चारूदत्त गोखले, जळगाव यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता आदर्श प्रिंटींग प्रेस, नागपूर -440012. येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, 'अक्षय' प्लॉट नं. 10, प्रोफेसर्स कॉलनी जिल्हा उद्योगकेंद्राचे मागे, जळगाव - 425001 येथे प्रसिद्ध केले.

# मराठी अर्थशास्त्र परिषद

आजीव सदस्यांसाठी

कृपया खालील पत्रक भरून( मनीऑर्डर अथवा बँक ड्राफ्ट -रू. 100 सोबत)
कार्यवाह, मराठी अर्थशास्त्र परिषद यांच्या पत्त्यावर पाठवावे.

पारपत्राच्या आकाराचे छायाचित्र इथे चिकटवावे.

आजीव सभासद क्र.........................

जिल्हा - ..................................

विद्यापीठ क्षेत्र-.............................

1) सभासदाचे संपूर्ण नांव (पहिले आडनांव) : ...............................................

2) जन्मतारीख : ...............................................

3) संस्था/कार्यालय/महाविद्यालयाचा पत्ता : ...............................................

4) पत्रव्यवहाराचा पत्ता : ...............................................
...............................................
...............................................

5) दूरध्वनी क्र.. : कार्यालय .................निवास.................

भ्रमणध्वनी (Mobile) : .............................

6) शैक्षणिक पात्रता : ...............................................

7) पीएच. डी. प्रबंधाचा विषय : ...............................................
...............................................
...............................................

8) संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता आहे काय ? केंव्हापासून ? : ...............................................

9) विशेषीकरण (Specialisation) : ...............................................

10) परिषदेचे पदाधिकारी/कार्यकारी सदस्य म्हणून आपण कार्य केले आहे का ? असल्यास : पद .................. वर्ष................
कालावधी ..................................

11) इतर विशेष माहिती : ...............................................
...............................................................................